मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था
(महाराष्ट्रशासन पुरस्कृत)
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,
३, महापालिका मार्ग,
धोबीतलीव, मुंबई – ४००००१
रजि नं. एक १६०९४ (मुंबई)
दूरध्वनी : २२६५३९६६ / फॅक्स : २२६३१३२५
Email rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क्र./ २०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

ह्या प्रकल्पांतर्गत उपलब्ध होणारे ग्रंथ व नियतकालिके प्रतिमुद्राधिकार अधिनियमाची मुदत उलटलेले असल्याने सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध आहेत. ही सामग्री विविध ग्रंथालयांनी जतन करून ठेवल्यामुळेच आज आपल्याला उपलब्ध होत आहे.

सदर पुस्तके अथवा नियतकालिके जशी उपलब्ध होत जातील तसे त्यांचे संगणकीकरण करून जनतेला ती उपलब्ध करून देण्यात येतील. ह्या ग्रंथांच्या/ नियतकालिकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना आपण खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

०१ सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती ह्या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.

०२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.

०३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्थेची मुद्रा आपणास काढता येणार नाही.

०४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी ह्या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून ह्या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. ह्यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था ह्यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

श्रीराम

सत्कार्योत्तेजक सभा—धुळें

इतिहास आणि ऐतिहासिक

मासिक  पुस्तक

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
जाले आहेत पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥

वर्ष २ रें } आश्विन व कार्तिक शु. १ शके १८४० { अंक २३ व २४

विषयानुक्रम

हें पुस्तक धुळें येथें शंकर श्रीकृष्ण देव यांनीं आपल्या श्रीआत्माराम छा० छापून धुळें येथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी ट.ह.सह रु.२] राजशक २४५ [फुटकळ अंकाची किं.०४

चिटणीसाचा अगत्याचा खुलासा

दुसऱ्या वर्षाचे हे शेवटचे दोन अंक काढून तीन ग्रन्थ पुरे करीत आहोंत. या मासिकाच्या पायीं यंदाच्या सालीं सभेला पांच सहाशें रुपये नुकसान सोसावें लागलें. इतिहासाचें प्रकाशन, स्वराज्यप्रिय महाराष्ट्रांत, नेहमीं च नुकसानींत होत आलें आहे ! सर्व प्रकाशकांचा असाच अनुभव आहे. हें जाणून च सभा या कार्याला प्रवृत्त झाली, तेव्हां तक्रार करण्याला जागा नाहीं. हे कांहीं कोणावर सभा उपकार करीत नाहीं. लोकांना जी गोष्ट नको असते ती त्यांच्यावर लादणाराचें नुकसान हें व्हावयाचें च. भवितव्याकडे डोळे लागल्यामुळें मागील इतिहासावरून महाराष्ट्राचें चित्त उडत चाललें आहे, असें वाटतें. नाहीं पेक्षां, या नुकसानीची दुसरी कोण काय मीमांस करणार ? असो.

तिसऱ्या वर्षी जें नुकसान येईल तें सोसण्याचा विचार दोघा तिघा मित्रांनीं चालविला आहे. तो त्यांचा विचार कायम झाला म्हणजे मार्गशीर्षाचा अंक वेळेवर निघून वर्गणीदारांकडे व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल. ज्या कोणा वर्गणीदारांना मासिक बंद करणें असेल त्यांनीं सभेला व्ही. पी. च्या खर्चांत न टाकतां कृपा करून आगाऊ कळवावें. ज्यांना नवीन वर्गणीदार होऊन सभेवर उपकार करावयाचे असतील त्यांना हीं संधी बरी आहे, कारण जुनीं प्रकरणें पुरीं झाल्यामुळें तिसऱ्यां वर्षाच्या आरंभापासून नवीन प्रकरणें सुरू होणार आहेत.

या जोड अंकांत पुरे झालेले तीन हि ग्रन्थ ग्राहकांनीं बांधवावे.

चिटणीस

धुळें १८४० कार्तिक शु. १ स. सभा

इतिहाससंशोधनाची अलीकडील प्रगती

आमच्या पुढें ह्या खेपेस (१) किंकेडकृत मराठ्यांचा एक इतिहास, (२) वैद्यांचा महाभारताचा उपसंहार व (३) भारतेतिहाससंशोधकमंडळाचें पांचवें संमेलनवृत्त, असे तीन ग्रंथ आहेत. पैकीं पहिला ग्रंथ आम्हांस अत्यंत दुर्बल भासतो. एक तर, करण व अकरण यांचे शब्दशः शेकडों प्रमाद या पुस्तकांत आहेत. दुसरें, उत्तरप्रसंग पूर्वप्रसंगा पासून कसा व कां निघाला, ह्या परंपरेचा

सत्कार्योत्तेजक सभा—धुळें

श्री

इतिहास आणि ऐतिहासिक

भाग पहिला

ऐतिहासिक विविध विषय

खंड पहिला

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या श्रीआत्माराम छापखान्यात छापून धुळे येथें प्रसिद्ध केला.

१८४० कार्तिक शुद्ध १

किंमत पांच रुपये

अनुक्रमणिका

ऐतिहासिक विविध विषय

अनुक्रमणिका

[२४]

महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास

(लेखकः—वि. का. राजवाडे)

महाराष्ट्रांतील लोकांचें ह्मणजे विद्वानांचें लक्ष्य देशाच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, भाषिक व वाङ्मयिक इतिहासा कडे लागण्याचा प्रारंभ होऊन सुमारें पन्नास वर्षे लोटलीं. ह्या अवधींत इतिहास ह्मणून ज्यांना सार्थ ह्मणता येईल असे ग्रंथ तर निर्माण झाले नाहींत च; परंतु इतिहास हें थोर नांव धारण करण्याचें औचित्य हि एका सुध्दां ग्रंथानें दाखविलेलें नाहीं. कारण उघड होतें. इतिहास ज्यांच्या वरून रचावयाचा तीं साधनें च तयार नव्हतीं. अर्थात् दृष्टि इतिहासरचने वरून उठून, इतिहाससाधन-संशोधना कडे वळली. पन्नास वर्षें साधनसंशोधनांत गेल्या वर आतां सहज च अशी उमेद वाटूं लागली आहे कीं देशाचे, भाषेचे, राजकारणाचे, धर्मांचे वगैरे भरींव इतिहास वाचावयास मिळावे. उमेद रास्त व शुभसूचक आहे. तींत वैगुण्य एवढें च आहे कीं, उद्भवलेल्या इच्छेचें क्षेत्र, मेजमाप, आकार व स्वरूप यांचें यथायोग्य ज्ञान विद्वान ह्मणून ज्यांना ह्मणतात त्यांच्यांत हि फार तुटपुंजें आढळून येतें. उदाहरण महाराष्ट्रसाहित्यपरिषदेचें च घ्या. (१) भाषेचा इतिहास वाङ्मयाच्या इतिहासा हून निराळा असतो, हें च अद्याप परिषदेंतील प्रमुखाग्रणींना नीट कळलें असल्याचें दिसत नाहीं. विविधज्ञान-विस्तारांत रा. विष्णुपंत महाजनी यांनीं जी शब्दरचना योजिली आहे ती वरून त्यांच्या मतें भाषेच्या इतिहासांत आवडत्या कवींचीं चरित्रें येतात असें स्पष्ट निदर्शनास येतें. ह्मणजे मनांत वाङ्मयाचा इतिहास आणि लिहि-ण्यांत व जाहिरात देण्यांत भाषेचा इतिहास असा घोटाळा रा. महाजनी व साहित्यपरिषद यांच्या हातून झालेला आहे. ह्या अव्वल दर्जाच्या घोटाळ्याला दुसऱ्या एका घोटाळ्याची जोड मिळालेली आहे. (२) परिषदेला जो इतिहास हवा आहे तो शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेला हवा कीं लौकिक पद्धतीनें लिहिलेला

हवा याचा निर्देश परिषदेनें किंवा महाजनीनीं केला नाहीं. शास्त्रीय इतिहास ह्मणजे काय व लौकिक इतिहास ह्मणजे काय ह्याची फोड पुढें होणार असल्या मुळें ह्या दुसऱ्या घोटाळ्याचा केवळ नामनिर्देश करून पुढें चालतों. (३) जाहिरात कोणत्या इतिहासाची द्यावी याचें च मुळीं ज्ञान परिषदेला नाहीं. आणि (४) इतिहासार्थ जें ३०० रुपयांचें बक्षिस परिषदेनें ठेविलें आहे तें इतकें अकिंचित्कर व क्षुद्र आहे कीं त्यानें परिषदेच्या विद्वत्तेचा उथळपणा ढळढळीत प्रतीयमान होतो. अशीं हीं चार व्यंग्यें परिषदेच्या उमेदींत, जाहिरातींत व महाजनींच्या लेखांत आहेत. त्यांची विस्तारानें फोड पुढील परिच्छेदांत करतों.

२ प्रथम जाहिरात कोणत्या इतिहासा संबंधानें द्यावयाला हवी होती एतद्विषयीं:—गेल्या १५०० वर्षांत महाराष्ट्रांत विचारप्रदर्शन एकट्या मराठी भाषेंत च तेवढें झालें असा प्रकार नाहीं. विचारप्रदर्शन दोन भाषांत झालेलें आढळतें, संस्कृतांत व मराठींत. व्याकरण, गणित, न्याय, वेदान्त, धर्म, ज्योतिष, साहित्य, इत्यादि विषयांचें प्रदर्शन संस्कृतांतून झालेलें आहे, व भारत, रामायण, भागवत, भगवद्गीतादि गीता, पुराणें, आख्यानें, नाटकें, पोवाडे, लावण्या, गाणीं, कहाण्या, भक्तिमार्गी पदें, अभंग, ओंव्या, बखरी चरित्रें, इत्यादि प्रायः अनुवादक प्रदर्शन मराठींतून झालेलें आहे. हीं दोन्हीं प्रदर्शनें मिळून महाराष्ट्रांतील गेल्या १५०० वर्षांतील विचारप्रदर्शन होय. इतिहास लिहावयाचा ह्मणजे ह्या दोहींचा मिळून लिहिला पाहिजे; पृथक् लिहिला असतां देशांतील विचारप्रदर्शनाचा परिपूर्ण परामर्श घेतला असें ह्मणतां येणार नाहीं. देशांत दोन भाषा प्रचलित होत्या. केवळ मराठी ग्रंथकार ह्मणून ज्यांना संज्ञा आहे त्या पैकीं ठळकठळक जे होते त्यांनीं सुध्दां दोन्ही भाषांत रचना केलेली आहे. दासोपंत, रामदास, वामन, मोरोपंत, हीं दुभाषेवाल्यांचीं मोठमोठीं उदाहरणें आहेत. तेव्हां एकट्या मराठींतून झालेल्या विचारप्रदर्शनाचा इतिहास लिहिण्यानें वस्तूचा सर्वांगीण परामर्श होत नाहीं. वस्तूचा स्वभाव च मुळीं दुभाषी आहे. ह्या दुभाषेपणाचीं कारणें मोठीं मनोरंजक आहेत, कारण तीं सामाजिक आहेत. ह्या देशांत समाज चतुर्विध आहे, (१) आर्य, (२) आर्यसंकर, (३) अनार्यसंकर व (४) अनार्य. पैकीं पुरातनकाला पासून आर्य आपलें विचारप्रदर्शन संस्कृतांतून करीत आले आहेत व आर्यसंकर प्राकृतांतून करीत आले आहेत. शकपूर्व ५०० पासून शकोत्तर ५०० पर्यंतच्या काळांत संस्कृत व महाराष्ट्री

अश्या दोन भाषांतून विचारप्रदर्शन झालेलें मशहूर आहे. तदनंतर अनार्य-संकर व अनार्य ह्यांच्या संसर्गानें महाराष्ट्रीभाषेचा लोप होऊन मराठी भाषा जन्मास आली. आर्यसंकर, अनार्यसंकर व क्वचित् अनार्य मराठी भाषा बोलूं लागले. शक ५०० पासून शक ७०० पर्यंत मराठी भाषा स्थिर होत होती. ती स्थिर झाल्या वर असें आढळून आलें कीं मराठी भाषेची व्याप्ती समाजांतील तीनचतुर्थांश वर च नव्हे तर नऊदशांश भागा वर झालेली आहे. ब्राह्मणां खेरीज इतर बहुतेक सर्व लोक मराठी भाषा बोलत आहेत असें आढळून आलें. इतकें च नव्हे तर, ब्राह्मणांतील खेडाळू अविद्वान् व ब्राह्मणांच्या स्त्रिया आर्यसंकरांच्या बहुसंख्याक सान्निध्यानें अष्टौप्रहर व्यवहारांत मराठी भाषा बोलूं लागल्या. घरीं, दारीं व बाजारांत सर्वत्र मराठीची छाप बसली. फक्त विद्वान् ब्राह्मणांत संस्कृत उरली. ह्या क्रांतीचा असा परिणाम झाला कीं, विद्वान् ब्राह्मण स्वतः खेरीज इतर सर्व हिंदूंना, स्वतःच्या स्त्रियांना सुध्धां, शूद्र समजूं लागले. म्लेच्छ समजूं लागले नाहींत. हें नशीब च. म्लेच्छ अस्पष्ट शब्दे, या अर्थानें मनांतून स्वस्त्रियाना हि विद्वान् ब्राह्मण म्लेच्छ ह्मणत नसतील असें ह्मणवत नाहीं. या भाषाभेदा मुळें विचारप्रदेशांत ब्राह्मणांची व ब्राह्मणेतरांची ओळख बुजूं लागली. इतिहास, पुराणें, वगैरे आर्यसंस्कृतीला आपण पारखे होतो कीं काय असें भय ब्राह्मणेतरांना हि पडलें. आर्यसंकर व अनार्यसंकर हे यद्यपि संकर होते तत्रापि त्यांना आर्यसंस्कृतीचा अभिमान व प्रेमा होता च. त्यांची ब्राह्मणांच्या कानींकपाळीं ओरड सुरु झाली. ह्या द्विविध कारणांच्या जोडगोळीनें मराठीभाषेंत भारतादि पुराणेतिहासांचे अनुवाद होऊं लागले. तात्पर्य, मराठी भाषेंत ब्राह्मणेतरां करिता व अविद्वानां करितां ब्राह्मणांच्या च द्वारें सारस्वत निर्माण झालें. शास्त्रप्रांतांत उच्च ब्राह्मणांची, उच्च क्षत्रियांची व उच्च वैश्यांची संस्कृतभाषा चालू च होती. महाराष्ट्रांतील द्विभाषात्वाचा असा हा इतिहास आहे. महाराष्ट्रांत विचारप्रदर्शन दोन भाषांत होत आहे. पैकीं मराठीभाषेंतील प्रदर्शन संस्कृतभाषेंतील इतिहासादिप्रदर्शनाची केवळ छाया आहे. मराठींत विचाराचें स्वतंत्र प्रदर्शन प्रायः नाहीं. असा प्रकार असल्या मुळें, केवळ मराठी भाषेंतील सारस्वताचा इतिहास लिहिण्यानें महाराष्ट्रांतील सबंध विचारप्रदर्शनाचा इतिहास लिहिलाशा होत नाहीं. शास्त्रीय विचारप्रदर्शनाचें चित्र अलग पडतें, किंबहुना स्मृतिआड होतें, व परिणाम निराशाजनक होतो. मराठींत

गणित, ज्योतिष, धर्म, वेदान्त, मीमांसा, साहित्य, इत्यादि शास्त्रीय व भरींव सारस्वत नाहीं हें कबूल करावें लागतें व स्वतःची व स्वतःच्या राष्ट्राची गणना ह्या एकदेशीय व अस्वाभाविक विभागणीनें मागसलेल्या राष्ट्रांत करून घेणें नाहक कपाळीं येतें. एकदेशीय विभागणीचा परिणाम काय होतो तो पहा. गणितांत श्रीपति, भास्कराचार्य व गणेशदैवज्ञ; धर्मशास्त्रांत आपदेव, हेमाद्रि, विज्ञानेश्वर, नारायणभट्ट व अपरार्क; साहित्यांत भवभूति, शेप व त्रिविक्रमभट्ट; संगीतांत शार्ङ्गधर; वेदान्तांत अमलानन्द, मुकुंद व बोपदेव; इत्यादि शेकडों नामांकित शास्त्रग्रंथकार संस्कृतांत लिहिणारे महाराष्ट्रांत झाले. यांचा व यांच्या ग्रंथांचा उल्लेख ज्या वाङ्मयेतिहासग्रंथांत नाहीं तो इतिहासाचा ग्रंथ कसला व त्याच्या पासून बोध कोणता ? सबब देशांतील वाङ्मयाचा इतिहास लिहिणें च असेल तर तो दोन्ही भाषांतील वाङ्मयांचा लिहिला पाहिजे, संस्कृत वाङ्मयाचा हि लिहिला पाहिजे व मराठी वाङ्मयाचा हि लिहिला पाहिजे. केवळ एका वर च भर देऊन भागणार नाहीं. तात्पर्य, **शक ५०० पासून शक १८०० पर्यंतचा महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा इतिहास** असें जाहिरातीतील विषयाचें नामकरण असतें ह्मणजे वस्तुनिर्देश यथायोग्य झाला असें ह्मणतां आलें असतें.

३ महाराष्ट्रांत वाङ्मय मुख्यतः दोन भाषांत आहे, ह्या बाबीची फोड येथपर्यंत थोडक्यांत केली. आतां भाषेचा इतिहासः—विविधज्ञानविस्ताराच्या १९१८ च्या जूनच्या अंकांत रा. महाजनी, साहित्यपरिषदेचे अग्रणी, यांनीं ५६ व्या पृष्ठावर जें टिपण छापलें आहे त्याचा मथळा "**मराठी भाषेचा इतिहास**" असा देऊन टिपणांत "**मराठी वाङ्मयाचा इतिहास**" अशी शब्दयोजना केली आहे. या शब्दयोजनेचा अर्थ एक च होणें शक्य आहे. तो हा कीं भाषेचा इतिहास व वाङ्मयाचा इतिहास दोन नाहींत, एक च आहेत. परंतु हें मत चुकीचें आहे. भाषेच्या इतिहासाचा प्रांत निराळा व वाङ्मयाच्या इतिहासाचा प्रांत निराळा. मराठी भाषेचा जन्म केव्हां झाला; ती ज्या पूर्वभाषां पासून उत्पन्न झाली त्यांच्या हून तिचा स्वभाव निराळा कसा; शब्द, स्वर, आघात, सुबंत, तिङंत, वाक्यरचना, प्रयोग, प्रत्यय, आगम, इत्यादि मराठीभाषेचे अवयव पूर्वभाषां पासून कसे व कोणत्या नियमांनीं निघाले; ही परंपरा सूक्ष्म व साद्यन्त देऊन, शिवाय जुनी मराठी, मध्य मराठी व अर्वाचीन मराठी यांची परंपरा देणें

अनुक्रमणिका

ह्मणजे मराठी भाषेचा इतिहास लिहिणें होय. इतकें हि करून मराठी भाषेचा इतिहास परिपूर्ण झाला असें ह्मणवत नाहीं. बंगाली, नेपाळी, सिंव्हली, हिंदी, गुजराथी वगैरे भाषांशीं व भाषां हून मराठीचें सादृश्य व वैदृश्य स्थलोस्थलीं कोणत्या बाबतींत आहे, ह्याचा हि ऊहापोह केल्या विना या इतिहासाला इतिहासत्व येत नाहीं. एवढ्यानें हि मराठी भाषेचा इतिहास संपला असें समजूं नये. नागपुरी वऱ्हाडी खानदेशी पुणेरी गोवानी कोंकणी मालवणी गंगथडी वगैरे प्रांतिक, आणि ब्राह्मणी कुणबाऊ कातकरी लाडी परभी वगैरे जातिक भेद जे मराठी भाषेचे मदहूर आहेत त्यांची परंपरा व स्वभावरेखाटणी मराठी भाषेच्या इतिहासांत अंतर्भूत करावी लागते. असा इतिहास रचिला ह्मणजे मराठी भाषेचा सर्वांगीण इतिहास सिद्ध झाला. परिषदेची जाहीरात व महाजनींच्या विविधज्ञानविस्तारांतील लेखाचा मथळा पाहून परिषदेला व महाजनींना एतत्स्वरूपक इतिहास हवा असावा असा आमचा तर्क झाला. परंतु मथळ्या खालील परिष्कार पहातां त्यांना भाषेचा इतिहास नको असून वाङ्मयाचा इतिहास हवा आहे असा समज झाला. हा तरी समज बिनचूक असेल असें ह्मणवत नाहीं. कदाचित् भाषेचा थोडासा त्रोटक इतिहास व वाङ्मयाचा थोडासा त्रोटक इतिहास जाहिरातवाल्यांना इष्ट असावा, असा गर्भितार्थ निघणें हि शक्य आहे. तात्पर्य येथें हि जाहिरातवाल्यांना लेखनीय वस्तूचा बोध यथायोग्य करतां आला नाहीं, हें स्पष्ट आहे. भाषेचा इतिहास च जाहिरातवाल्यांना इष्ट होता असें धरून चाललें, तर "महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास" असा जाहिरातीचा मथळा हवा होता.

४ परिषदेच्या व महाजनींच्या जाहिरातीचे व लेखाचे मथळे कोणते हि व कसे हि असोत, भाषेच्या इतिहासाचे असोत किंवा वाङ्मयाच्या इतिहासाचे असोत, ते आपण सध्यां एकी कडे ठेवूं व वस्तुनिर्देश ज्यांनीं यथारूप होतो ते खालील मथळे स्वीकारून चालू. "महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास" व "महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा इतिहास" हे दोन मथळे घेऊन, हे रचण्यास काय मेहनत व किती द्रव्य लागेल त्याचा अंदाज करूं. अंदाज दोन मुद्द्यां वर करणें भाग आहे. भाषांचा इतिहास असो कीं वाङ्मयाचा इतिहास असो, ते रचण्याच्या पद्धती दोन असतात, (१) एक शास्त्रीय व (२) दुसरी लौकिक. साध्या किंवा सरळ किंवा सुंदर किंवा

बाळबोध किंवा चमत्कृतिजनक पदपद्धतीनें जे लहानमोठे इतिहास सामान्य जनांच्या ह्मणजे विद्यार्थी व सुखवस्तू लोकांच्या उपदेशार्थ किंवा मनोरंज- नार्थ किंवा उत्तेजनार्थ लिहिले जातात त्या इतिहासांना लौकिक इतिहास ह्मणतात. ह्या लौकिक इतिहासांची निर्मिती शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेल्या इतिहासांच्या पश्चात्क व पाया वर शक्य असते. प्रथम शास्त्रीय इतिहासाची रचना जेव्हां होत्ये तेव्हां तदनंतर लौकिक इतिहासांची रचना शक्य असते. शास्त्रीय इतिहास विद्वानां करितां तज्ञांनीं तयार केलेले असतात. शास्त्रीय इतिहासांत पदपद्धतीच्या सौष्टवा कडे लक्ष्य देण्यास सवड नसते व जरूर हि नसते, किंबहुना शास्त्रीय इतिहास व रचनामाधुर्य यांचें विळयाभोपळ्या एवढें सख्य असतें असें ह्मटलें असतां वावगें होणार नाहीं. कारण, शास्त्रीय इतिहासांत वस्तूच्या अखिल अंगांची तपशीलवार गणना, वर्गीकरण, काल- निर्णय, स्थलनिर्णय, परंपरा, इत्यादिविषयक सूक्ष्म चर्चा परम कष्टाळूपणानें व्हावयाची असते. तींत काव्य करण्याला जागा नसते. आणि काव्य नसल्या मुळें शास्त्रीय इतिहास सामान्य जनांना रुक्ष वाटतात व त्यांच्या प्रेमाचे विषय होत नाहींत. तात्पर्य इतिहासरचना दोन प्रकारची, शास्त्रीय व लौकि- क. पैकीं कोणता प्रकार परिषदेला व महाजनींना अभिप्रेत आहे, हें जाहि- राती वरून किंवा लेखा वरून स्पष्ट होत नाहीं. संशय येतो कीं जाहिरात- वाल्यांना ह्या भेदाचें भान नसावें. ज्ञान नसावें असें आम्ही म्हणत नाहीं. भोंगळ भार्षेत भोंगळ इच्छा भोंगळ जाहिरातींच्या द्वारा प्रदर्शित करण्याची लकब रानटीपणाचें लक्षण समजतात एवढें मात्र खरें. एणेप्रमाणें जाहिरात- वाल्यांच्या लिहिण्यांत बालिश मुग्धपणा असल्या कारणानें त्यांचें मनोगत ताडणें शक्य नाहीं. परिषदेला लौकिक इतिहास अभिप्रेत आहे असें धर- ल्यास, त्या वर एवढें च उत्तर देतां येईल कीं, रुक्ष तपशीलवार व साधार असा शास्त्रीय इतिहास तयार झाल्या विना मनोरंजक व साधार असा लौकिक इतिहास निर्माण होणें अशक्य आहे. आवडत्या कवींच्या काव्यांचे गुणदोष- विवेचन करावें, इत्यादि अल्पस्वल्प उल्लेख महाजनींच्या त्रोटक लेखांत आहेत त्या धरून दिसतें कीं महाजनींना गुणदोषविवेचक टिपणें हवीं आहेत. असलीं टिपणें लौकिक इतिहासाचे हि खरे भाग नव्हत व शास्त्रीय इतिहा- साचे हि खरे भाग नव्हत. हीं टिपणें टीका म्हणून जें साहित्याचें अंग आहे त्याचा भाग होत. आतां दुसरा पक्ष जो शास्त्रीय इतिहासाचा तो परिषदेस अभिप्रेत होईल असें धरल्यास, तो रचण्यास काय मेहनत लागते त्याचा तपशीलवार ऊहापोह करूं.

अनुक्रमणिका

५ आमच्या ह्मणण्या प्रमाणें लेख्य इतिहास एकंदर दोन, (१) महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास व (२) महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा इतिहास. पैकीं महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास विचारार्थ प्रथम घेऊं. महाराष्ट्रीभाषेला प्राकृत ह्मटलें ह्मणजे तिजपासून निघालेल्या अपभ्रंशांना आह्मी प्राकृतिक ह्मणतों. प्राकृतिक भाषा ह्मणजे च नागर मराठी भाषा आणि महाराष्ट्रांतील इतर प्रांतिक व जातिक मराठी भाषा. ह्या सर्व भाषांचा इतिहास ह्मणजे मराठी प्राकृतिक भाषेचा इतिहास. भाषेचा इतिहास ह्मणजे भाषेचे जे शब्द, प्रत्यय, आगम, स्वर, आघात, वगैरे अवयव त्यांचा इतिहास. इतिहास ह्मणजे परंपरा व त्या परंपरेचे नियम. पूर्व भाषे पासून पश्चात्कभाषेचे हे अवयव कसे निघाले हें सांगणें ह्मणजे त्यांचा इतिहास देणें. हें सर्व एक दोन वाक्यांत वर्णन करतां आलें खरें. परंतु हें सर्व कागदा वर वठवावयाला काय मेहनत लागते तें आतां पाहूं. एक सर्वज्ञ मराठीभाषाशास्त्रज्ञ आहे अशी कल्पना करा. त्याला मराठीभाषेच्या वर्तमान, मध्य व प्राचीन अवस्थांचा साक्षात्कार परिपूर्ण झाला अशी हि कल्पना करा. अशा शास्त्रज्ञाच्या मनांत स्वतःचा साक्षात्कार इतरांच्या अनुभवास यावा एतदर्थ उद्योग करण्याचें जर आलें तर तो खालील मार्ग स्वीकारील. प्रथम वर्तमान व भूत नागर, प्रांतिक व जातिक मराठी भाषांतील लेखी व तोंडी अखिल शब्द व प्रत्यय तो जमा करील आणि नंतर अपभ्रंश, महाराष्ट्री, जुनी महाराष्ट्री, संस्कृत, वैदिक व पूर्ववैदिक इत्यादि भाषांतील शब्दांशीं व प्रत्ययांशीं त्यांचा संबंध कसा व कोणत्या नियमांनीं झाला तें दाखवून देईल. हीं दोन कृत्यें करतांना त्याला इतर विद्वानांचें साहाय्य त्या त्या भाषांतिल शब्द व प्रत्यय टिपण्या करितां अवश्य घ्यावें लागेल. कारण एका सर्वज्ञ तज्ज्ञाच्या हि हातून हें सर्व प्रायः शारीरिक व बऱ्या च मानसिक श्रमाचें काम संभवनीय कालावधींत होणार नाहीं. अर्धशिक्षितांच्या हातून हें श्रमाचें काम पेलणार हि नाहीं व रेटणार हि नाहीं. काम फार दगदगीचें आहे. तें चोख झालें पाहिजे. चोखपणा उच्च शिक्षणा शिवाय व शास्त्रीय अभ्यासाच्या संवयी शिवाय येत नाहीं. साहाय्यकांची योग्यता या दर्जाची पाहिजे. कामाचा विस्तार हि अवाढव्य आहे. मराठींतील शब्दसमुद्र अफाट आहे. आमचा अंदाज आहे कीं मोलस्वर्थच्या कोशांत वर्तमान व भूत मराठी भाषेंतील शब्दसमुद्राचा सुमारें निम्मा भाग आला असेल नसेल.

सबब अखिल शब्दसमुद्र आलोडण्या करितां साहाय्यकांना वर्तमान व भूत मराठी लेखी व तोंडी वाङ्मय डोळ्यांत तेल घालून धुंडाळलें पाहिजे आणि नवीन शब्द किंवा प्रत्यय किंवा स्वर आढळला कीं साक्षेपानें टिपून ठेविला पाहिजे. कोश रचण्याची मेहनत ज्यांनीं केली आहे त्यांना ह्या श्रमाची कल्पना होईल. साहाय्यकांचें हें काम चालू असतां शास्त्रज्ञाचें सांपडलेल्या शब्दांची पूर्वभाषेंत परंपरा ठरविण्याचें नाजूक काम चालत च असतें. हें काम सर्वांत अवघड. केवढा हि व्युत्पन्न झाला, तरी भेटल्या शब्दाची व्युत्पत्ति ऊर्फ इतिहास चुटकी सरसा त्याला देतां येईल असा अर्थ नाहीं. ऐतिहासिक व्युत्पत्तीची गती भूता वरून वर्तमाना वर अनुलोम असते. यास्काच्या निरुक्तांतील काल्पनिक व्युत्पत्ती प्रमाणें वर्तमाना वरून भूता वर, अशी असेल, अशी हि असेल व अशी देखील असेल, अश्या प्रकारची धरसोडीची, प्रतिलोम, अनिश्चित व अकिंचित्कर नसते. धरसोडीची प्रतिलोम व्युत्पत्ति यास्काचार्यांनीं गाफीलपणानें केली अशी असमंजस कल्पना करण्याचें धाष्टर्य मात्र करणें युक्त नाहीं. यास्काच्या कालीं वेदभाषा हि इतकी जुनी झाली होती कीं तत्कालीन सामान्य वैदिकांना तिचा अर्थ कळतनासा झाला होता. वेदपूर्व भाषा ऊर्फ पूर्ववैदिक भाषा तर इतकी प्राचीनतम झाली होती कीं यास्काचार्यांच्या कालीं तिचा मागमूस हि राहिला नव्हता. तेव्हां वैदिक शब्दाची अनुलोम व निश्चित व्युत्पत्ति ऊर्फ इतिहास देण्याला यास्काचार्यांना साधन च नव्हतें. अश्या कचाट्यांत व्युत्पत्ती करण्याचें काम यास्काला करावयाचें असल्या मुळें एका च शब्दाच्या दहा दहा प्रतिलोम व्युत्पत्या करून असमाहित समाधान मानून स्वस्थ बसणें त्याला अपरिहार्य झालें. किंवा असा हि विकल्प करतां येईल कीं ज्या पूर्ववैदिक भाषेपासून वैदिक भाषा निघाली तीं तून वैदिक शब्दांची व्युत्पत्ति लावण्याचें साधें व सरळ कृत्य यास्काला इतिहासपद्धतीच्या अज्ञानास्तव माहित नव्हतें. कांहीं हि असो, मराठीव्युत्पत्तिकाराला ही यास्कीय दुरवस्था प्राप्त नाहीं. कारण, मऱ्हाठीच्या पूर्वीच्या अपभ्रंश व महाराष्ट्री या दोन भाषा मराठी व्युत्पत्तिकाराला ऊर्फ शब्देतिहासकाराला ऊर्फ भाषेतिहासकाराला साहाय्य करण्यास अद्याप हि अवशिष्ट आहेत. शिवाय संस्कृत व वैदिक या सख्ख्या किंवा चुलत भाषा हि उपलब्ध आहेत. सबब प्रतिलोम अनिश्चित व्युत्पत्ति करण्याचें संकट मराठी भाषेच्या व्युत्पत्तिकारावर कोसळण्याचा संभव सुद्धां नाहीं.

सुदैवानें ह्या बाबींत यास्का पेक्षां मराठीभाषेच्या इतिहासकाराचा रस्ता सरळ आहे. यद्यपि अशी सुस्थिती ह्या एका बाबीं संबंधानें असली, तत्रापि दुसऱ्या एका बाबींत मराठी निरुक्तकाराचा रस्ता अडचणींच्या घोर व निबिड अरण्यांतून जातो. पूर्ववैदिक वाङ्मय बिलकुल नसल्यामुळें यास्काला ग्रंथ-वाचनाचे व वैदिक शब्दांचे पूर्ववैदिक पूर्वशब्द धुंडण्याचे श्रम नव्हते. मराठी निरुक्तकाराला महाराष्ट्री, संस्कृत व वैदिक ह्या तीन चार भाषांतील अफाट वाङ्मयाच्या निबिड अरण्यांतील कोणत्या महाराष्ट्री, संस्कृत किंवा वैदिक झुडुपा पासून आपल्या जवळील कोणत्या मराठी धलप्या कातलेल्या आहेत याचा बिनचुक पत्ता लावावयाचा असतो. भलती धलपी भलत्या च झाडाची असावी, किंवा एक च धलपी अनेक झाडांची असावी किंवा अनेक धलप्या एक च झाडाच्या असाव्यात, अशी त्रिविध शंका मराठी निरुक्तकाराला गांगरवून सोडते. यास्काप्रमाणें, असें हि असेल, तसें हि असेल, असें धरसोडीचें उत्तर देऊन भागत नाहीं. उत्तर निश्चित हवें असतें; कारण तें शक्य आहे हें माहीत असतें. उदाहरणार्थ दहा पांच मराठी शब्द घेतों, ह्मणजे आह्मी काय ह्मणतों तें सहृदयांच्या प्रतीतीस येईल.

(१) मराठी पाणीं शब्दः—जलार्थक पाणीं शब्द संस्कृत पानीयं शब्दाचा अपभ्रंश सर्वमान्य आहे. परंतु, तरवारीचें पाणीं या प्रयोगांतील पाणीं शब्द कोणत्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश असावा ? किंवा लक्षणेनें चकाकी वरून तरवारीच्या चकाकीला पाणीं शब्द लावला तर नसेल ? असा विकल्प आला. लक्षणेनें वाटेल तें गाढव वाटेल त्या घोड्या पासून निघूं शकेल ह्मणून निरुक्तींत हा लक्षणेचा रस्ता प्रमाणिक धरीत नाहींत. सबब चकाकी—अर्थक पाणी शब्दाची व्युत्पत्ति निराळी असावी असा तर्क. धातुपाठांत पू शोधने असा धातू आहे. तरवारीला पाणी देणें ह्मणजे तरवार अग्नीनें शुद्ध करणें. पू—पावनीयं= पाअणीअँ=पाणीं. जलार्थक पाणी शब्द पा धातू पासून निघाला आहे व उज्ज्वलनार्थक पाणी शब्द

पू धातू पासून निघाला आहे, हा निर्णय. दोन्ही शब्द अगदीं निराळे आहेत व शास्त्रीय कोशांत ते निराळे आहेत असें सांगितलें पाहिजे.

(२) फारः—हा शब्द स्फार शब्दा पासून व्युत्पादितात. परंतु फारकरून ह्या अव्ययांतील फार शब्द कसा व्युत्पादावयाचा ? करून याचें फार हें कर्म करतां येत नाहीं. सबब फारकरून हें अव्यय ह्मणून एक शब्द समजणें रास्त आहे. संस्कृतांत प्रायस्कृत्वा असें अव्यय आहे. प्रायस्कृत्वा=फारकरून. प्रायस्कृत्वा स न आयास्यति=फारकरून तो येणार नाहीं. तात्पर्य मराठींत दोन फार आहेत, स्फार पासून निघालेला एक व प्रायः पासून निघालेला दुसरा.

(३) भीकः—भिक्षा पासून भीक सर्वमान्य आहे. परंतु, मी त्याला भीक घालीत नाहीं, या वाक्यांतील पर्वा-अर्थक भीक शब्द कोठून आला ? येथें लक्षणेला फार च ताणावी लागेल तेव्हां भिक्षे पासून पर्वे पर्यंत उडी जाईल. संस्कृतांत भयार्थक भीषा शब्द आहे. भीषा=भीख=भीक. मी त्याला भीक घालीत नाहीं ह्मणजे मी त्याला भीत नाहीं. भीक ह्मणजे भय, पर्वा, इत्यादि. दोन्ही शब्द निराळे, उच्चार मात्र एक. कोशांत निराळे दाखवणें प्राप्त आहे.

(४) भरणें:—भृ पासून भरणें सर्वमान्य आहे. परंतु, मला रागें भरला, या वाक्यांतील भरला शब्द कसा काढावयाचा ? रागें भरला ह्मणजे कठोर शब्द बोलला. रागावणें हा शब्द रागें भरणें या शब्द-प्रयोगाहून निराळा. रागें भरणें या प्रयोगांत बोलण्याची क्रिया दर्शविलेली असते. ती रागावणें या शब्दांत नियत नसते. समाधानः—संस्कृतांत भृ भर्त्सने असा धातू आहे. त्यापासून कठोरशब्दार्थक भरणें. क्रोधेन मां परिभृणाति=क्रोधानें मला रागें भरतो.

रागें तृतीया. भर्त्सनार्थक भरणें शब्द पूरणार्थक भरणें शब्दा हून निराळा.

(५) बोलणें:—माणूस बोलतो, या वाक्यांतील बोलणें शद्ब संस्कृत वल्ह धातू पासून निघाला आहे, हें सर्व मान्य. परंतु धंदा बोलतो, या वाक्यांतील बोलणें धातू कोणत्या संस्कृत धातूचा अपभ्रंश असावा? धंदा बोलतो ह्मणजे धंदा भरभराटीस येतो असा अर्थ आहे. समाधानः-संस्कृतांत पुल् वृद्धौ असा धातू आहे. पोलति=वोल्लइ=बोले. भाषणार्थक बोल निराळा व वृध्द्यर्थक बोल निराळा.

(६) काढणें:—कृष् पासून काढ सर्वमान्य. परंतु, थांब, त्याचें काढतों, तुझें काढतों, या वाक्यांतील काढ कसा निष्पादावयाचा? येथें काढणें ह्मणजे मार देणें असा अर्थ आहे: समाधानः-क्रथ् मारणें असा संस्कृत धातू आहे व त्याचें कर्म षष्ठयन्त असतें. तस्य क्राथयामि=त्याचें काढतों. कर्षणार्थक काढ निराळा व मारणार्थक काढ निराळा. क्राथय्=काढ.

(७) पाडणें:—पातय् पासून पाड सर्वमान्य. परंतु, फळ्या पाडणें, फाकी पाडणें, तुकडे पाडणे, यांतील पाड कसा निष्पन्न झाला? येथें पाडणें ह्मणजे कापणें असा अर्थ आहे. समाधानः—संस्कृत पाटय् पासून हा पाड निघाला आहे. फलकान् पाटयति=फळ्या पाडतो.

(८) चोरणें:—चुर् पासून चोर सर्वमान्य. परंतु आंग चोरणें, चोरून जाणें, या वाक्यांतील चोर कोठला? येथें चोरणें ह्मणजे छपून लपून जाणें असा अर्थ आहे. समाधानः—संस्कृतांत त्सर छद्मगतौ असा धातू आहे. त्सरणं चोरणें. अंगत्सरणं=आंगचोरणें. त्स=च

(९) जा:—संस्कृत या पासून मराठी जा सर्वमान्य. परंतु,

अनुक्रमणिका

येत नाहीं जा !, मर जा!, या वाक्यांतील जा कोठला ? समाधानः—संस्कृत द्यै न्यक्करणे धातू आहे. त्याचें आशीर्लिङाचें द्वितीयपुरुषीं एकवचनीं रूप द्यायाः होतें. द्यायाः, नैष्यामि=जाजा ! येत नाहीं. एथें जाणें या क्रियापदाचा अर्थ तिरस्कार असा आहे. गमनार्थक जा निराळा व तिरस्कार्थक जा निराळा. द्य=ज

(१०) दगडः—दृषद्=दखड=दगड अशी परंपरा अश्मार्थक दगड शब्दाची सर्वमान्य, परंतु अरे दगडा, तूं मूर्ख आहेस, एथें दगड शब्द कसा व्युत्पादवायाचा ? कां लक्षणेनें काम मागवावयाचें ? समाधानः—संस्कृतांत असा प्रयोग असेः—रे दग्ध ! मूर्खोऽसि=अरे दगडा, मूर्ख आहेस. दग्ध=दगढ=दगड=डगडदग्ध ह्मणजें निंद्य. निंद्यार्थक दगड निराळा व अश्मार्थक दगड निराळा.

(११) दुढ्ढाचार्यः—हा शब्द प्रतिलोम गतीनें व्युत्पादूं गेलों असतां अनेक तर्क करतां येतील. परंतु ते सर्व अनैतिहासिक व अनिश्चित होतील. मूळ संस्कृतांत जेव्हां ह्या मराठी शब्दाचा पूर्वशब्द आपाततः वाचनांत भेटेल तेव्हां च ह्या शब्दाची व्युत्पत्ति निश्चित ठरविणें शक्य आहे. संस्कृतांत दोग्धृ ह्मणून शब्द आहे. त्याचा अर्थ भाडोत्री कवी असा आहे. भाडोत्री ह्मणजे भिकार कवींत जो श्रेष्ठ त्याला दोग्ध्राचार्य ह्मणत. दोग्ध्राचार्य=दोढ्ढाचार्य=दुढ्ढाचार्य. दुढ्ढाचार्य ह्या शब्दाचा मराठींत अर्थ ढोंगी वगैरे आहे. कानडी दोड्डु (मोठा) पासून दुढ्ढ व्युत्पादण्यांत स्वारस्य नाहीं.

अशीं आणीक हजारों उदाहरणें देतां येतील. सांगण्याचें तात्पर्य इतकें च कीं मराठी निरुक्ती यास्कीय निरुक्ती सारखी स्याद्वादी नाहीं, अद्वैतवादी आहे. शेरीज, निरुक्तीचें हें कृत्य हुकमी नाहीं, वैदिक, संस्कृत, महाराष्ट्री, अर्ध-

अनुक्रमणिका

मागधी, वगैरे ग्रंथ वाचतां वाचतां पूर्वभाषांतील शब्दांची पश्चात्कभाषांतील ह्मणजे मराठींतील शब्दांशीं सांगड घालून द्यावयाची असते. ह्मणजे ही सांगड घालतांना प्रथम (१) जुन्या व नव्या मराठींतील एकोनएक शब्दांची ओळख निरुक्तकाराला पाहिजे. व (२) नंतर पूर्वभाषांतील शब्द भेटला असतां त्याची गांठ मराठींतील योग्य शब्दाशीं घालून देण्याची हातोटी साधली पाहिजे. ही हातोटी केवळ अनुभवानें येणारी आहे. हजारों चुक्या कराव्या, शेकडोंदा भलत्या पूर्वशब्दाचीं भलत्या च मराठी शब्दाशीं लग्नें लावून द्यावीं व नंतर खरीं वधूवरें सांपडलीं असतां खोटीं लग्नें निर्लज्जपणें मोडून टाकावीं, असे टक्के-टोणपे खातां खातां शब्दशास्त्राचें जोसपण आंगीं बाणत असतें, एऱ्हवीं नाहीं. यद्यपि जोसपण आंगीं बाणलें तत्रापि मराठींतील वाटेल त्या शब्दाचें महाराष्ट्री किंवा संस्कृत गणगोत कोणी हि जोशी ताटकन व बिनचूक सांगू शकत नाहीं. पूर्वभाषांतील ग्रंथ वाचीत असतांना स्मृति, उपस्थिति, व कल्पकता या त्रयीची ज्या मानानें कृपा होईल त्या मानानें मराठी शब्दांच्या संस्कृत गणगोताचें टिपण करून ठेवावयाचें असतें. अशीं टिपणें ज्यानें दोन चार तपें केलीं त्याला निरुक्ताचार्यांच्या पदवी वर न्यायानें हक्क सांगतां येतो. एवं-गुणविशिष्ट निरुक्तकार व पूर्वप्रोक्तगुणविशिष्ट पांच चार विद्वान साहाय्यक जेव्हां शब्दमृगांची पारध दहापांच वर्षे करतील, तेव्हां मराठीभाषेच्या इतिहासाचीं प्राथमिक दोन उपकरणें तयार होतील. पहिलें अंग शब्दकोश व दुसरें अंग व्युत्पत्ति. हीं दोन उपकरणें तयार झाल्या वर नंतर भाषेच्या इतिहासाची गोष्ट काढावयाची.

६ मराठी भाषेचा इतिहास ह्मणजे काय ? हा इतिहास ह्मणजे एक बंड च आहे. त्याचे अनेक भाग व उपकरणें आहेत. पाल्हाळ न लावतां आणि लांबलचक वाक्यें व परिच्छेद ह्यांची रचना करण्यांत वेळ न घालवितां, संक्षेपानें त्यांचें थोडक्यांत परिगणन करतों. भाषा ह्मटली ह्मणजे तिचे खालील अवयव सर्वसामान्य असतातः—(१) उच्चार, (२) उच्चाराच्या खुणा ऊर्फ अक्षरें, (३) शब्द, (४) वाक्य, (५) आगम, आदेश, प्रत्यय इत्यादि, (६) स्वर व आघात. हे सहा अवयव मातृभाषेंतून अपत्यभाषेंत कोणत्या रूपान्तरानीं उतरले व अपत्यभाषेच्या जन्मा पासून अद्यतन हयाती पर्यंत त्या रूपान्तरांत कोणकोणते फेरफार झाले या बाबीची नियमबद्ध हकीकत सांगणें ह्मणजे मराठी भाषेचा इतिहास लिहिणें. मातृभाषेला दुसरीं अपत्यें व चलतेमामे असल्यास त्या सोदरांच्या व चुलत्यामामांच्या रूपांहून विव-

अनुक्रमणिका

क्षित अपत्याचें रूप कोणत्या बाबींत समविषम आहे व कां आहे याचा हि ऊहापोह भाषेच्या इतिहासांत करण्यापासून त्या भाषेचें रूप ठळकपणें व वैशिष्ठयानें ध्यानांत येण्यास मार्ग होतो. तसें च ज्या समाजांत, संस्कृतींत व हवापाण्यांत मातृभाषा जन्मली व वाढली त्या समाजाहून, संस्कृतीहून किंवा हवापाण्याहून निराळ्या परिस्थितींत अपत्यभाषा जन्मल्यामुळें व वाढल्यामुळें अपत्याचें रूप कसें व किती बदललें वगैरे प्रश्न हि या च इतिहासांत पडतात. असला हा इतिहास निर्माण करतांना खालील तीन प्रकरणें सिद्ध होतात:– (१) आदेशप्रक्रिया जीस यूरोपांत Phonetiks ह्मणतात ती, (२) वर्तमान व भूत व्याकरण, व (३) वाक्यरचनेचा इतिहास. (१) आदेशप्रक्रियेंत पूर्व-भाषेंतून पश्चात्कभाषेंत शब्दादिरूपान्तरें कशीं व कोणतीं होतात तें निरूपण केलेलें असतें. (२) व्याकरणांत भाषेच्या वर्तमान व भूत रूपाचें पृथक्करण केलेलें असतें. आणि (३) वाक्येतिहासांत गद्यपद्यवाक्यांची रचना वेळोवेळ कसकशीं वाढत व बदलत गेली हें दाखविलेलें असतें. तात्पर्य, मराठी भाषेचा इतिहास रचावयाचा ह्मणजे खालील पांच प्रकरणांची निर्मिती करावयाची:—

(१) कोश ऊर्फ निघंटु,
(२) निरुक्त,
(३) व्याकरण,
(४) आदेशप्रक्रिया आणि उच्चार व अक्षरें यांचा इतिहास,
(५) वाक्यप्रक्रिया.

(१) पैकीं भाषेचा विस्तार कळण्या करितां अखिल भूत व वर्तमान शब्दांचा कोश ऊर्फ निघंटु तयार करणें भाग पडतें. मराठींतील अखिल शब्दजात ज्यांत आलें आहे असा निघंटु मराठींत नाहीं. मोलस्वर्थचा कोश व रघुनाथशास्त्री गोडबोले यांचा हंसकोश ह्या दोहोंत मिळून मराठींतील सरासरी निम्मे शब्द संग्रहीत झाले आहेत. सबब, मराठीभाषेतिहासकाराला अखिल शब्दांचा निघंटु तयार करणें अवश्य झालें आहे. (२) निघंटु सिद्ध होत असतांना व झाल्या वर अखिल शब्दांची व्युत्पत्ति पूर्व-भाषेंतून दाखवून देणें हें दुसरें कृत्य आहे. व्युत्पादनाला च शब्दांचा इतिहास ह्मणतात. संस्कृतांत व्युत्पादनाला निरुक्त ह्मटलें आहे. मराठींत व्युत्पत्तीचे कांहीं अत्यन्त प्राथमिक प्रयत्न झाले आहेत. राजवाड्यांनीं हजारो शब्दांच्या ऐतिहासिक व्युत्पत्त्या यद्यपि दाखवून दिल्या आहेत. तत्रापि आणीक हजारो

व्युत्पत्त्या दाखवून द्यावयाच्या राहिल्या च आहेत. तेव्हां हें हि उपकरण मराठीभाषेच्या इतिहासकाराला इतिहास लिहिण्या पूर्वी सिद्ध करून घेतले पाहिजे. त्या शिवाय पुढील इमारत शक्य नाहीं. (३) इतिहासाचें तिसरें उपकरण व्याकरण हें होय. या उपकरणांत वाक्यांतील शब्दरूपांचें व शब्दाचें पृथक्करण केलेलें असतें. हें पृथक्करण संस्कृतांत पाणिनीनें अनुपम केलेलें आहे. तसें पृथक्करण अद्याप मराठीभाषेचें झालेलें नाहीं. दादोबा, गोडबोले, दामले वगैरेंचीं व्याकरणें अत्यंत अशास्त्र व अपूर्ण आहेत. त्यांतल्यां त्यांत दामल्यांचें व्याकरण इतर दोघांच्याहून बरेंसें आहे. अशी दुःस्थिति असल्यामुळें शास्त्रीय मराठी व्याकरण रचणें अपरिहार्य आहे. पाणिनीय पद्धती व ऐतिहासिक पद्धती ह्या दोन्ही पद्धतींचें साहाय्य घेऊन मराठीभाषेचें व्याकरण रचिलें पाहिजे. इतिहास कोणत्या बाबींचा द्यावयाचा हें वर्तमानकालीन व भूतकालीन व्याकरणा शिवाय इतिहासकाराला सांगतां यावयाचें नाहीं. (४) अक्षरें, उच्चार व आदेश यांचा इतिहास पाणिनीनें दिला नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. त्याला वैदिक व संस्कृत हीं दोन भाषेचीं रूपें माहीत होतीं व ह्या दोहींचीं रूपसिद्धि त्यानें केली आहे. परंतु वैदिक भाषेंतून संस्कृत भाषेंत शब्द येतांना त्यांच्यांत फेरबदल कोणत्या नियमांनीं झाले, हें सांगण्याचें स्वप्न सुद्धां त्याच्या ग्रंथांत नाहीं. वैदिक ही पूर्वभाषा व संस्कृत ही पश्चात्क भाषा असें हि स्पष्ट त्यानें कोठें सांगितलेलें आढळत नाहीं. संस्कृताहून वैदिक निराळी एवढें त्याला माहीत आहे. भाषा व छंदस् हे दोन शब्द तो योजतो आणि दोहींना तो समकालीन समजतो. जुनी ज्ञानेश्वरी मराठी व वर्तमान चिपळूणकरी मराठी समकालीन समजून नव्या मराठींतल्याहून जुन्या मराठींत रूपसिद्धि अमक्या तऱ्हेनें निराळी होते असें जसें आधुनिक मराठी वैय्याकरणानें कालानपेक्ष बोलावें तसा च प्रकार पाणिनीचा झाला आहे. हें कालदुर्लक्ष्य त्यानें मुद्दाम केलें असें आमचें मत आहे. कारण पाणिनिपूर्वकालीन उपनिषदांतून शब्दांची व्युत्पत्ति ह्मणजे इतिहास जुन्या भाषेंतून केल्याचीं उदाहरणें आहेत. काला कडे ह्मणजे इतिहासा कडे दुर्लक्ष्य केल्या मुळें, पाणिनीच्या निरुपम कृतींत मोठा च दोष घुसला आहे. गम् चें गच्छ् होतें व अस्मत् चें अहं होतें एवढें च फक्त पाणिनि सांगतो; परंतु गच्छ् व अहं हीं रूपें पूर्ववैदिक भाषेंतील असावींत किंवा हे आदेश असे कां होतात, याचा शोध करण्या कडे त्यानें लक्ष्य दिलेलें नाहीं. सार्वधातुका

अनुक्रमणिका

मागें इश् चें पश्य् होतें व आर्धधातुकां मागें इश् च रहातें, एवढें च सांगून पाणिनि गप्प बसतो. परंतु असें कां होतें, हें सांगण्याच्या खट-पटींत तो पडला नाहीं. कारण ऐतिहासिक दृष्टीला त्यानें मुद्दाम मारून टाकिली होती. ही ऐतिहासिक दृष्टि वररुच्यादि प्राकृत वैय्याकरणांना बरी च आलेली होती. ह्या प्राकृत वैय्याकरणांच्या ग्रंथांना व्याकरण हें नांव यद्यपि देतात, तत्रापि त्यांच्या ग्रंथांत प्राकृत भाषांच्या व्याकरणाच्या ऊहापोहा पेक्षां आदेश-प्रक्रियेचा च भाग बव्हंशानें असतो. शेषं संस्कृतवत्, असें ह्मणून व्याकर-णाचा भाग ते पाणिनी वर सोंपवितात. तात्पर्य, प्राकृत वैय्याकरण हे, वस्तुतः, आदेशप्रक्रियाकार ह्मणजे Phoneticians आहेत व एका अर्थानें प्राति-शाख्यकारांचे वंशज आहेत. ह्या प्राकृत आदेशप्रक्रियाकारांचें व्यंग असें आहे कीं आदेशांचें संपूर्ण क्षेत्र आक्रमण करण्याचा सायास त्यांनीं केला नाहीं व महाराष्ट्र्यादिभाषांतील अनेक शब्दांचे संस्कृतांतील पूर्वशब्द त्यांना दाखवून देतां आले नाहींत. महाराष्ट्र्यादि भाषांचे संपूर्ण कोश हि त्यांनीं तयार केले नाहींत. संपूर्ण कोश नसल्यामुळें संपूर्ण व्युत्पत्ति हि त्यांच्या हातून झाली नाहीं. संपूर्ण व्युत्पत्ति हाताशीं नसल्यामुळें संपूर्ण आदेशप्रक्रिया त्यांना शक्य नव्हती. मराठींत अशी अपूर्णता न रहावी अशी आपणा आधुनिकांची इच्छा असणार हें उघड आहे. ही इच्छा केवळ इच्छा च राहिली नसून तिला थोडेंबहुत मूर्त स्वरूप हि आलेलें आहे. ग्रियर्सन, भांडारकर, व ब्लोश ह्या तिघांनीं जर्मनी, महाराष्ट्र व फ्रान्स या तीन देशांत मराठीच्या आदेश-प्रक्रिये संबंधानें शोध प्रसिद्ध केले आहेत. सर्वांत भांडारकरांचे प्रयत्न सर्वांच्या पूर्वींचें आहेत. तिन्हीं प्रयत्न अपुरे आहेत, त्यांना परिपूर्णता आणण्याची नवी खटपट होणें अगत्याचें आहे. ब्लोश यांनीं आपला ग्रंथ छापून अद्याप दोन वर्षें हि झालीं नसतील. परंतु, हे तिन्ही प्रयत्न परभाषां-तून झाले आहेत. त्या मुळें आपल्याला त्यांची माया कमी. मराठीच्या आदे-शप्रक्रिये वर मराठींत अद्याप ग्रंथ नाहीं. तो झाला ह्मणजे मराठी भाषेच्या व्युत्पत्तीच्या नियमांचें ज्ञान होईल व त्या भाषेच्या इतिहासाच्या सिद्धीला साहाय्य होईल. (५) उच्चार, अक्षरें व शब्द यांचा प्रपंच झाल्या वर, वाक्यांचा प्रपंच ओघानें च येतो. वाक्यांतील शब्दांचे अन्योन्यसंबंध व प्रयोग यांच्या स्वभावांत वेळोवेळ कोणकोणते फरक झाले हें इतिहासाच्या ह्या भागांत प्रथम सांगून, नंतर वाक्यांतील शब्दरचना संस्कृताप्रमाणें समस्त आहे कीं

अनुक्रमणिका

इंग्रजी प्रमाणें व्यस्त आहे कीं तुर्की प्रमाणें श्लिष्ट आहे कीं चिनी प्रमाणें अगदीं सुटी व एकपदी आहे व ती तशी पूर्वभाषेंतून पश्चात्कभाषेंत कशी झाली ह्या बाबीचें ऐतिहासिक निरूपण करावयाचें असतें. वाक्य दोन प्रकारचें, गद्य व पद्य. पैकीं पद्यवाक्याच्या विचाराला छंदःशास्त्र ह्मणतात. पूर्वभाषेंतून पश्चात्कभाषेंत गद्याच्या व पद्याच्या पद्धती कश्या उत्पन्न झाल्या व त्यांची पश्चात्कभाषेंत वाढ कशी झाली, हा विषय गद्यपद्यवाक्येतिहासाचा असतो. वाक्यविचार झाल्या नंतर वाक्यसमूहा कडे इतिहासकाराला वळावें लागतें. येथें रीति, शैली ऊर्फ पद्धती इचा ऊहापोह होतो. तो ऊहापोह होतांना लालित्य, सौष्ठव, योग्यता, काठोर्य, इत्यादींचा इतिहास देऊन व रीतींचे वेळोवेळचे मासले देऊन व तींत वेळोवेळीं झालेले फेरफार दाखवून भाषेतिहासाची समाप्ति करावयाची असते. ह्या प्रकरणाच्या बैठ्या स्वरूपाला संस्कृतांत साहित्यशास्त्र ह्मणतात. बैठ्या साहित्यशास्त्राचा विचार संस्कृतांत अत्युत्तम झालेला आहे. साहित्याच्या इतिहासाचा मात्र त्या भाषेंत पूर्ण अभाव आहे. तो इतिहास भाषेतिहासाचें अंग ह्मणून मराठींत नव्यानें च निर्माण केला पाहिजे. मराठींतील छंदांचा इतिहास देण्याचा प्रयत्न अन्यत्र एका विस्तृत निबंधांत केला आहे. वाक्येतिहासाच्या बाकीच्या अंगाची ओळख हि मराठीला अद्याप नाहीं.

(७) एणेंप्रमाणें मराठीभाषेचा इतिहास रचावयाचा ह्मणजे खालील पांच ग्रंथ तयार करावयाचे:—

१ कोश ऊर्फ निघंटु,
२ निरुक्त,
३ व्याकरण,
४ आदेशप्रक्रिया,
५ वाक्येतिहास ऊर्फ साहित्याचा इतिहास.

पैकीं निघंटु व व्याकरण हीं दोन भाषेचीं बैठी रूपें असल्यामुळें, तीं इतिहासांत पडत नाहींत, इतिहासाच्या उपकरणांत पडतात. हीं दोन उपकरणें आधीं च मराठींत तयार असतीं, तर तीं नव्यानें सिद्ध करून घेण्याची यातायात न पडती. तशी सोय नाहीं, ह्मणून इतिहासचिकीर्षूला तीं स्वतः तयार करून घेतलीं पाहिजेत. शब्देतिहास ऊर्फ निरुक्त, आदेशप्रक्रिया व साहित्येतिहास हीं तीन प्रकरणें तर त्याच्या श्रमाचे ऐन विषय होत. तेव्हां हीं पाच हि प्रकरणें मराठीभाषेतिहासकाराला निर्माण करावयाचीं आहेत.

अनुक्रमणिका

एखाद्या भाषाशास्त्रज्ञाच्या हाता खालीं चार पांच साहाय्यक विद्वान निदान पांच चार वर्षें जेव्हां खपतील, तेव्हां हीं पांच प्रकरणें मनाजोगतीं सिद्ध होतील. ह्या मेहनतीला खर्च काय येईल त्याचा अंदाज दुसऱ्या एका प्रकरणाचा ऊहापोह झाल्या नंतर पुढें करूं.


(८) कोश, निरुक्त, व्याकरण व आदेशप्रक्रिया हीं जीं चार प्रकरणें सांगितलीं त्यांत फक्त शब्दाचा विचार होतो, शब्दशक्ति म्हणून जी बाब आहे तिचा विचार बिलकुल होत नाहीं. म्हणजे ह्या चार प्रकरणांत भाषेच्या बहिरंगाचा ऊर्फ शरीराचा फक्त विचार होतो. अंतरंगाचा म्हणजे शक्तीचा ऊर्फ अर्थाचा बिलकुल विचार करावयाचा नसतो. पांचवें प्रकरण जें वाक्यप्रक्रियेचें तिचा साहित्य म्हणून जो भाग आहे त्यांत शब्दाचा हि विचार होतो व शब्दशक्तीचा हि विचार होतो. लालित्य, पारुष्य, सौष्ठव व इतर बाहिरलंकार केवळ शब्दाचे म्हणजे बहिरंगाचे होत. आणि ध्वनि, व्यंजना, लक्षणा, व इतर अंतरलंकार केवळ अर्थाचे होत. म्हणजे साहित्याच्या प्रांतांत आपण शिरलों म्हणजे भाषेच्या बहिरंगा पेक्षां अंतरंग जो अर्थ त्याचें च प्रस्थ प्रधान असलेलें आढळून येतें. शब्द म्हणजे टरफल व अर्थ म्हणजे मगज असा भेद साहित्यप्रांतांत एथें प्रथम नजरेस येतो. एथें च वाङ्मय म्हणून ज्याला म्हणतात त्या प्रांताचा प्रारंभ होतो. मनुष्यजातीच्या मुखांतून जें जें म्हणून सार्थ व संपूर्ण विधान शब्दरूपानें भूत, वर्तमान व भविष्य कालीं बाहेर पडलें, पडतें व पडेल तें तें सर्व वाङ्मय होय. वाङ्मयांत अर्था कडे सर्व लक्ष्य असतें, शब्दा कडे बिलकुल नसतें. वाङ्मय दोन प्रकारचें, (१) तोंडी व (२) लेखी. अक्षरांचा शोध लागल्यावर लेखी वाङ्मयाचा उदय होतो व तत्पूर्वी सर्व वाङ्मय तोंडी असतें. अक्षरांचा शोध भारतवर्षांतील आर्यांना लागण्या पूर्वी आर्योचें सर्व वाङ्मय तोंडी होतें हें वाङ्मय ह्या शब्दा वरून च सिद्ध होतें. असलें हें तोंडी व लेखी वाङ्मय पुनः दोन प्रकारचें असतें, (१) ऐहिक व (२) पारलौकिक. इहलोकांतील खटाटोपाशीं ज्याचा अनन्यसंबंध असतो तें ऐहिक व परलोकांतील विषयांशीं ज्याचा अनन्यसंबंध असतो तें पारलौकिक. ऐहिक वाङ्मयाचे तीन भाग आहेत, (१) ज्ञानवर्धक, (२) व्यवहारवर्धक व (३) प्रसारक. आंतर व बाहिर सृष्टीचा शोध ज्या वाङ्मयानें प्रकाशित व प्रदर्शित होतो त्या वाङ्मयाला ज्ञानवर्धक ऊर्फ शास्त्रीय वाङ्मय म्हणतात. व्यावहारिक म्हणजे व्यवहारवर्धक कलांचें

प्रकाशन किंवा प्रदर्शन ज्या वाङ्मयानें सिद्ध होतें तें व्यवहारवर्धक ऊर्फ **कलात्मक** वाङ्मय होय. आणि समाजांतील लहान मोठ्या व बालवयस्क व्यक्तींना शास्त्रज्ञानाचें व कलाज्ञानाचें बालबोध किंवा मनोरंजक किंवा मूलतत्वात्मक ज्ञान ज्याच्या द्वारा होतें त्या वाङ्मयाला कला व शास्त्र यांचें **प्रसारक** वाङ्मय ही संज्ञा आहे. **प्रसारक वाङ्मय** दोन प्रकारचें, (१) **बालोपयोगी** व (२) **बालेतरोपयोगी**. कनिष्ठ शाळा, मध्यमशाळा व उच्च पाठशाळा यांतील चार वर्षां पासून पचवीस वर्षां पर्यंतच्या शालेय बालांमध्यें ह्मणजे अज्ञांमध्यें शास्त्रांच्या व कलांच्या मूलतत्वांचा प्रसार **बालोपयोगी प्रसारक वाङ्मय** करतें. आणि शालेय अवस्थेच्या पलीकडे गेलेल्या बालेतर अज्ञांना शास्त्रज्ञान व कलाज्ञान यांची कणशः बरवर माहिती ज्याच्या द्वारा होण्याची सोय केलेली असतें त्या वाङ्मयाला **बालेतरोपयोगी प्रसारक वाङ्मय** हें यथार्थ अभिधान आहे. हें बालेतरोपयोगी प्रसारक वाङ्मय ज्ञानप्रसाराचें काम मनोरंजक प्रबंधांच्या द्वारा करतें. काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, गोष्टी, पवाडे, लावण्या, पदें, नीतिनिबंध, मनोरंजक चरित्रें, आल्हादकारक इतिहास, शास्त्रांच्या व कलांच्या माहितीचीं चटकदार चित्रालंकृत चोपडीं, सामान्य वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें, हीं सर्व ह्या बालेतरोपयोगी प्रसारक वाङ्मयाच्या सदरांत पडतात. पैकीं उच्च दर्जाचीं काव्यें, नाटकें, कादंबऱ्या, पदें, निबंध, नीतिप्रबंध, यांना विदग्ध वाङ्मय ऊर्फ सारस्वत हें नामाभिधान आहे. ह्या विदग्ध वाङ्मयाचें ऊर्फ सारस्वताचें कार्य महशूर आहे. शास्त्रें व कला यांचें आकलन करण्याची सोय कोणत्या हि कारणांनीं ज्यांना नाहीं त्यांना सभ्य, नीतिमान व नागर बनविण्याचें काम विदग्ध वाङ्मय करीत असतें. ह्या विदग्ध वाङ्मयाचा असाधारण धर्म ह्मटला ह्मणजे तें चमत्कृतिजनक शब्दांनीं व वाक्यांनीं अवतीर्ण झालेलें असतें. आणि ही चमत्कृति बालेतर अज्ञांचें चित्त वेधून घेऊन मम्मटानें ह्मटल्या प्रमाणें स्त्रियांच्या गुलगुल गोष्टीच्या धर्ती वर अज्ञांना शास्त्रांच्या व कलांच्या कणांचा आस्वाद घेण्यास प्रवृत्त करते. ध्वनि, व्यंजना, लक्षणा, अर्थालंकार, व रीति ऊर्फ Style इत्यादि रूपांचें सोंग घेऊन चमत्कृति चित्ताकर्षण करते व स्मृत, उत्प्रेक्षा, प्रत्यक्षीकरण इत्यादि रूपांनीं श्रोत्यांचें किंवा वाचकाचें हृदय उत्तेजित करते. आकर्षक व उत्तेजक असल्यामुळें ह्या विदग्ध वाङ्मया वर सामान्य जनांची निरतिशय भक्ति बसते

व ह्या वाङ्मयाचे जे अत्यन्त कुशल कारागीर असतात त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाण्यांत सामान्य जन दंग होतात. शिवाय समाजांत सामान्य जनांची च बहुसंख्या असल्यानें, विदग्धवाङ्मयकारांचा व्हावा त्याहून बेसुमार बोलबाला होतो. अशी वाजवीहून फाजील चहा समाजांत विदग्धवाङ्मयाची यद्यपि असलेली दिसते, तत्रापि एवढें विसरतां येणें मुष्कील आहे कीं हें वाङ्मय किती झालें तरी प्रसारक आहे, शास्त्रीय वाङ्मया प्रमाणें निर्मायक नाहीं किंवा कलिक वाङ्मया इतकें उपयोगी नाहीं. ऐहिक वाङ्मयाचा एकंदर विस्तार व वर्गीकरण एवंस्वरूपक आहे.

(९) पारमार्थिक वाङ्मयात परमार्था संबंधानें विचार केलेला असतो. त्याचे तीन प्रकार, (१) शास्त्र, (२) कला व (३) प्रसार. पारलौकिक शास्त्रज्ञान ह्मणजे अध्यात्मविद्या. पारलौकिककलाज्ञान ह्मणजे भक्ति, तंत्र, यज्ञयाग, इत्यादि. व पारलौकिकप्रसारकवाङ्मय ह्मणजे बाल व बालेतर यांच्यांत अध्यात्मशास्त्र व भक्ति वगैरेंचें ज्ञान पसरविणारें सुबोध किंवा कथात्मक किंवा मूलतत्वात्मक वाङ्मय.

(१०) ऐहिक व पारलौकिक अश्या तोंडी व लेखी वाङ्मयाचा असा हा प्रांत आहे. ह्या द्विविध वाङ्मयाचा जो इतिहास त्याला वाङ्मयाचा इतिहास ह्मणतात. सारस्वताचा ऊर्फ विदग्धवाङ्मयाचा इतिहास हा वाङ्मयेतिहासाचा एक अंश आहे व तो हि अत्यन्त महत्वाचा भाग आहे अशांतली बाब नाहीं. वाङ्मयाचा हा जो प्रांत रेखाटला त्याचा नकाशा एणें प्रमाणें:—



ह्या पंचविध वाङ्मयाचा इतिहास लिहावयाचा ह्मणजे त्याचे, अर्थात्, पांच खंड होतील. ते एणें प्रमाणें:--

(१) शास्त्रेतिहास
(२) कलेतिहास
(३) बालोपयोगीशास्त्रकलाज्ञानप्रसारकवाङ्मयेतिहास
(४) विदग्धवाङ्मयेतिहास अथवा चमत्कृतिजनकवाङ्मयेतिहास
(५) परलोकसंबंधकवाङ्मयेतिहास

यूरोपीयन भाषांतून पंचवीस तीस वर्षां पूर्वीं जे लहानमोठे वाङ्मयेतिहास झाले त्यांच्यांत शेंकडा नव्वद भर विदग्धवाङ्मया वर दिलेला आढळतो. शास्त्र, कला, बालशिक्षण, व परलोक, या वाङ्मयाच्या ज्या चार मोठमोठ्या शाखा त्यांचा परामर्श हे इतिहास फार च अल्पस्वल्प घेत, किंबहुना मुळींच घेत नसत. पांचपंचवीस वर्षां पूर्वींचे हे असले यूरोपीयन इतिहास पाहून, आमच्या इकडील लोकांची हि वाङ्मयेतिहासाची कल्पना यूरोपीयन इतिहासकारांच्या प्रमाणें अर्धवट बनली. कवींचीं चरित्रें, त्यांच्या काव्यांचे गुणदोषविवेचन व त्यांचें गुणग्रहण हा वाङ्मयाच्या इतिहासाचा मुख्य प्रांत होय, अशी अपक्व कल्पना साहित्यपरिषदेची व महाजनींची हि असलेली दिसते. परंतु ती अपूर्ण व अर्धवट आहे, हें वरील प्रपंचा वरून ध्यानांत येईल. वाङ्मयाचा इतिहास वाङ्मयाचा सर्व प्रांत व्यापून राहिला पाहिजे. केवळ विदग्धवाङ्मया वर भूक भागवून रहाणें सध्यांच्या काळांत शक्य नाहीं व इष्ट हि नाहीं.

(११) वाङ्मयाचा इतिहास असा प्रयोग आपण केलेला आहे. त्यावरून उघड च होतें कीं वाङ्मय व इतिहास ह्या दोन वस्तु भिन्न आहेत. इतिहास ही वस्तु वाङ्मयांत प्रधानत्वें करून पडत नाहीं. असें जर आहे ह्मणजे इतिहास हा जर वाङ्मयाचा अस्सल भाग नाहीं, तर मग इतिहास कशांत पडतो ? इतिहास ही काय चीज आहे ? ह्या प्रश्नाला उत्तर असें आहे कीं इतिहास ही वाङ्मयाची वृत्ति आहे. काल हा जसा बुद्धीची वृत्ति आहे, तसा इतिहास हा बुद्धीचें प्रदर्शक जें वाङ्मय त्याची वृत्ति आहे. अखिल वाङ्मय काला वर पसरलेलें आहे ह्मणजे त्या वर कालाचें आवरण आहे. कालाचे दोन किंवा अधिक टापू घेऊन त्या अवधींत वाङ्मयाचीं कोणतीं स्थित्यन्तरें झालीं तें इतिहास कथन करतो. इतिहास ह्मणजे वाङ्मयाची गतकालीन हकीकत. ही हकीकत दोन तऱ्हांनीं सांगतां येते. शास्त्रीय पद्धतीनें

अनुक्रमणिका

सांगण्याची पहिली तऱ्हा व ज्ञानप्रसारहेतूनें सांगण्याची दुसरी तऱ्हा. गणन, कार्यकारणसंबंधदर्शन व वर्गीकरण ह्या दृष्टीनें वाङ्मयाची स्थित्यन्तरें सांगणें ह्मणजे वाङ्मयाचा शास्त्रीय इतिहास रचणें. आणि अज्ञ बालांच्या किंवा अज्ञ प्रौढांच्या माहिती करतां मनोरंजक शब्दांनीं वाङ्मयाची बालबोध किंवा चमत्कृतिजनक हकीकत सांगणें ह्मणजे सामान्यजनप्रिय इतिहास तयार करणें. पैकीं कोणती तऱ्हा आपणाला अभिप्रेत आहे या बाबीचा खुलासा महाजनीनीं स्पष्ट केलेला नाहीं. लोकप्रिय इतिहासाची रचना शास्त्रीय इतिहासाच्या पाया वर होणारी ह्मणजे तत्पश्चात्क होणारी ज्या अर्थी आहे, त्या अर्थी शास्त्रीय इतिहास साहित्यपरिषदे सारख्या विद्वन्मंडळाला मुख्यतः अभिप्रेत असावा, अश्या दृष्टीनें महाराष्ट्रांतील वाङ्मयाच्या इतिहासाचा व्याप कियन्मर्यादाक आहे त्याची शहानिशा करतों.

(१२) शक ५०० पासून शक १८४० पर्यंतच्या १३४० वर्षांत महाराष्ट्रांत महाराष्ट्रांतील लोकांनीं खालील भाषांतून वाक्प्रदर्शन केलें, (१) संस्कृत, (२) मराठी, (३) फारसी, (४) ब्रज, व (५) इंग्रजी. पैकीं संस्कृतांत शास्त्रें, कला व विदग्धवाङ्मय ह्या तीन शाखांचें प्रदर्शन झालेलें आहे. मराठींत शास्त्रीय किंवा कलिक किंवा बालशिक्षक वाङ्मय फारसें नाहीं, फक्त पारलौकिक व किंचित् ऐहिक विदग्ध वाङ्मय झालेलें आहे. फारसींतून व ब्रजभाषेंतून अत्यंत अल्प प्रदर्शन झालेलें आहे, परंतु झालेलें आहे. आणि इंग्रजींतून सध्यां अर्थशास्त्र व प्राचीन शोध यांच्या संबंधानें शास्त्रीय प्रदर्शन होत आहे. भाषावार महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा हा असा व्याप आहे.

(१३) महाराष्ट्रीयांनीं पांचभाषांचा उपयोग कां केला ? एका मराठी वर भूक भागत नव्हती कीं काय ? ह्या चमत्काराचीं कारणें सामाजिक व राजकीय आहेत. मुसुलमानांचें व इंग्रजांचें राज्य या देशांत झाल्या वर महाराष्ट्रीयांनीं फारसी व इंग्रजी भाषांतून विचारप्रदर्शन केलें. हट्ट धरून मराठींतून च विचार प्रगट केले असते तर मोठी अभिमानाची व ईर्ष्येची गोष्ट झाली असती. परंतु किंचित् अनन्यगातिक ह्मणून, किंचित् सोईचे भोक्ते ह्मणून व बहुचित् प्रसंगा प्रमाणें वागणारे ह्मणून महाराष्ट्रीयांनीं ह्या दोन राजभाषांचा उपयोग केला. ब्रजभाषेचा उपयोग केवळ कौतुकानें झालेला आहे. मऊ, गाण्याला सोईस्कर व श्रोत्यांना नावीन्यास्तव कौतुकास्पद ह्मणून मराठी कवींनीं

ब्रजभाषेचा क्वचित् क्वचित् आश्रय केलेला आढळतो. बाकी राहिल्या मराठी व संस्कृत. पैकीं शास्त्रीय वाङ्मय सारें संस्कृतांतून होण्याचें कारण असें आहे कीं ब्राह्मणांची मूळ भाषा जी संस्कृत तींतून च सर्व शास्त्रीय वाङ्मय होत आलेलें होतें व शास्त्रां संबंधानें नवीन रचना करावयाची ह्मणजे मागील संस्कृत शास्त्रीय ग्रंथांच्या पाया वर च ती करणें भाग पडे. आहे व नाहीं हे दोन शब्द वगळले असतां कोणत्या हि शास्त्रांत बाकी सर्व शब्द सांकेतिक व पारिभाषिक असणार. तेव्हां संस्कृतात च रचना करणें परंपरेस्तव व स्वभाषात्वास्तव ब्राह्मणांना सोईचें पडे. असंस्कृतज्ञ जे शूद्रातिशूद्र त्यांची संख्या बेसुमार वाढल्या वर त्यांच्यांत ब्राह्मणसंस्कृतीचा प्रसार करण्यास त्यांच्या भाषेंत रचना करणें अवश्य झालें. नाहीं तर पाखंडमतांचा किंवा इस्लामाचा स्वीकार शूद्रातिशूद्र करतील ही आपत्ति ओढवत होती. तेव्हां शूद्रातिशूद्र जेणें करून आर्यसंस्कृतींत राहतील तें इतिहास, पुराणें वगैरे वाङ्मय मराठी भाषेंतून कैवारानें निर्माण करणें प्राप्त झालें. शूद्रांना शास्त्रज्ञान नको होतें व तें त्यांना पेलण्या सारखें हि नव्हतें. त्यांना फक्त शिक्षणात्मक वाङ्मय हवें होतें व तें च त्यांना त्या कालीं पेलण्या जोगें होतें. ज्योतिष, गणित, वेदान्त इत्यादि शास्त्रांतील शिक्षणोपयोगी ग्रंथांचें अनुवाद मराठींत झालेले आहेत त्यांतल्या त्यांत सुलभ पंचीकरणी वेदांता वर भर अतोनात. घटपटाच्या खटपटीचा एक हि ग्रंथ मराठींत नाहीं व नको हि होता. झाला असता तर कोणी वाचतेना अथवा खरें ह्मटलें असतां ऐकते ना. मराठींत वेदान्ता वर जे ग्रंथ आहेत त्यांत शास्त्रीय परिभाषालंकृत ग्रंथ शपथेला एक हि नाहीं. सर्व ग्रंथ बालबोधक व शिक्षणात्मक आहेत; आणि ते सडकून आहेत.

(१४) महाराष्ट्रांतील ह्या पंचभाषिक वाङ्मयातून एका च कोणत्या तरी भाषेंतील वाङ्मयाचा इतिहास देण्यानें परामर्शाचें कृत्य अपूर्ण राहील हें उघड आहे. जितक्या भाषांतून आपण विचारप्रदर्शन करीत आलों आहों तितक्या साऱ्या भाषांतील आपण निर्माण केलेल्या वाङ्मयाची हकीकत देण्या वांचून गत्यंतर नाहीं. आतां सोईखातर केवळ संस्कृतांतून किंवा केवळ मराठींतून किंवा केवळ इंग्रजींतून जें वाङ्मय आपण निर्माण केलें त्याचा एकट्या च इतिहास दिला असतां चालेल. परंतु ह्या एकट्याचा इतिहास महाराष्ट्रांतील साऱ्या वाङ्मयाचा इतिहास नव्हे हें स्पष्टपणें नमूद करून ठेविलें पाहिजे.

(१५) महाराष्ट्रसाहित्यपरिषदे सारख्या विद्वन्मंडळाला एकदेशीय इति-

हास अभिप्रेत नसून सार्वदेशीय इतिहास अभिप्रेत असेल अशी समजूत करून घेतली तर वावगे होणार नाहीं. परिषदेला (१) सार्वदेशीय इतिहास हवा व तो (२) शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेला हवा, अशी कल्पना करून, महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा शोध आजपर्यंत किती झाला आहे व अद्याप व्हावयाचा किती राहिला आहे त्याचा अंदाज करूं.(१)महाराष्ट्रांतील संस्कृत वाङ्मयाच्या (१) वेद, (२) इतिहास पुराणें, (३) व्याकरण, (४) कोश, (५) साहित्य, (६) वेदांत,(७) ज्योतिष, (८) गणित, (९) धर्म,(१०) काव्य, (११) मीमांसा, (१२) न्याय तर्क, (१३) व संकीर्ण, वगैरे शाखांतील वाङ्मयाचें संशोधन इंग्रजीभाषेंतून बहुतेक सर्व झालेलें आहे. संशोधनीयग्रंथ आतां फार च थोडे राहिले असतील. म्हणजे महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा इतिहास लिहिण्यास साधनें बहुतेक परिपूर्ण अशीं इतिहासकाराच्या हाताशीं आहेत. (२) महाराष्ट्रातील मराठी वाङ्मयाचा शोध चांगला झाला आहे.परंतु त्यांत आणीक भर टाकणें जरूर आहे.आमच्या मतें सुमारें निम्मे वाङ्मय सांपडलें असून अद्याप निम्मे शोधून काढावयाचें आहे. निवृत्ति, ज्ञानेश्वर, मुकुंदराज, नामदव, एकनाथ, मुक्तेश्वर वगैरेंच्या अस्सल संहिता अद्याप मिळाल्या नसून त्या मिळविण्याचा प्रयत्न करणें कोणत्या हि शास्त्रीय इतिहासकाराला अवश्य आहे. शिवाय मराठी कवींचीं म्हणजे प्रायः साधुसंतांचीं विश्वसनीय चरित्रें अस्सल कागदपत्रें शोधून काढून तयार केलीं पाहिजेत. हा सर्व खटाटोप परिपूर्ण करण्यास पांच चार संशोधक निदान पांच वर्षें खपले पाहिजेत. (३) फारसी व व्रज वाङ्मय थोडे असून त्याचें संशोधन इतकें क्लिष्ट नाहीं. (४) अलीकडे इंग्रजीतून रानडे, गोखले, टिळक, कुंटे, दीक्षित, तेलंग, भांडारकर, पंडित, भाऊ दाजी, गणपतराव जोशी, काळे, केतकर, मुधोळकर, इत्यादींनीं जें शास्त्रीय लहानमोठें शोधकर्म केलें आहे त्याचा परामर्श घेणें हि केवळ खेळ नाहीं. ह्या साऱ्याचा विस्तार इतका मोठा आहे कीं ह्या कामीं पांच चार संशोधक पांच चार वर्षें खपले पाहिजेत. तेव्हां महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेला इतिहास निर्माण होईल. असा शास्त्रीय पद्धतीनें लिहिलेला विश्वसनीय इतिहास तयार झाल्या वर नंतर नानाप्रकारचे लहान मध्यम व मोठे बालबोध विश्वसनीय इतिहास लिहिणें सुलभ व शक्य होईल. नाहीं पक्षीं मांबळ्या सभांच्या क्षुद्र उत्तेजनानें अर्धवट लेखकां कडून इतिहासाचीं भोळीं चोपडीं निर्माण होण्याचा परिपूर्ण संभव आहे.

अनुक्रमणिका

(१६) आतां शेवटीं खर्चाचा बेहेडा काय होतो तो पाहूं. निर्मातव्य इतिहास दोन, (१) महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा इतिहास व (२) महाराष्ट्रांतील वाङ्मयाचा इतिहास. असें समजा कीं हे दोन्ही इतिहास शास्त्रीय पद्धतीनें लिहिण्याची ऐपत पांच पंचवीस वर्षांच्या सरावानें व अभ्यासानें ज्यास अत्युत्तम आली असा एखादा विद्वान् संशोधक सुदैवानें सांपडला व त्याला साहाय्य करणारे पांच विद्वान् मदतगार हि मिळाले. तर ह्या सहांना वेतन काय द्यावें ? त्यांच्या बरोबरीच्या ह्मणजे कर्तबगारीनें व ऐपतीनें बरोबरीच्या इतर लोकांना इंग्रज सरकार जें वेतन देतें तें वेतन ह्या सहांस देणें अन्यायाचें होणार नाहीं. समजा कीं सर्व इसम वयानें पन्नाशीच्या सुमाराचे आहेत. समजा कीं हे सर्व इसम ग्राजूएट असून आपल्या कामांत अनुभवानें उच्चस्थानापन्न झालेले आहेत. इंग्रज सरकार पहिल्या प्रतीच्या सबार्डिनेट जज्जाला किंवा डेप्यूटी कलेक्टराला किंवा प्रोफेसराला किंवा इंजिनेराला किंवा डाक्टराला जो पगार देतें तो पगार ह्मणजे ८०० पासून २००० पर्यंत पगार मुख्य इतिहासचिकीर्षूला व सुमार ५०० रुपये पगार मदतनीसांना मिळणें रास्त आहे.

इतिहासचिकीर्षूचें ५ वर्षांचें १००० रुपयां प्रमाणें वेतन	६०,०००
५ मदतनीसांचें ५ वर्षांचें ५०० रुपयां प्रमाणें वेतन	१५०,०००
हापीस, प्रवास व चिल्हर खर्च	६०,०००
एकंदर खर्च	२७०,०००

ह्या प्रमाणें अडीच तीन लाख रुपयां खालीं ह्या दोन इतिहासांच्या निर्मितीला खर्च पुरणार नाहीं. महाराष्ट्रसाहित्यपरिषद ह्या कामीं कमींत कमी ३०० तीन शें रुपये व जास्तींत जास्त १५०० रुपये बुडविण्याचें धैर्य करते. ह्मणजे महिन्याचा चिकीर्षूला कमींत कमी मेहनताना $\frac{३००}{५\times१२}=३\frac{१}{३}$ रुपये व पांच मदतनीसांना प्रत्येकीं $\frac{१००}{५\times५\times१२}=\frac{१}{३}$ रुपया पडतो, व जास्तींत जास्त $१६\frac{२}{३}$ रुपये व $१\frac{२}{३}$ रुपये पडतो. अश्या लटुपटीच्या बक्षिसांनीं बक्षीस लावणाऱ्यांच्या अकलेचें मात्र खासें प्रदर्शन होतें.

(१७) अडीच तीन लाखाची रक्कम आह्मी भीतभीत च सांगितली आहे. कामाचा विस्तार पहातां आमच्या मतें तीन लाख रुपये ह्मणजे केवळ

सबंग सौदा होतो. (१) भाषांचा इतिहास व (२) वाङ्मयाचा इतिहास ह्या दोन चिमुकल्या नावां खालीं खालील मोठमोठीं प्रकरणें तयार व्हावयाचीं आहेतः—

(१) कोश ऊर्फ निघंटु
(२) निरुक्त
(३) व्याकरण
(४) आदेशप्रक्रिया
(५) साहित्याचा इतिहास
(६) शास्त्रेतिहास
(७) कलेतिहास
(८) बालवाङ्मयेतिहास
(९) विदग्धवाङ्मयेतिहास
(१०) पारमार्थिकवाङ्मयेतिहास

हीं दहा प्रकरणें शास्त्रीय पद्धतीनें तयार करावयाचीं म्हणजे सरसकट प्रत्येकीं २७,००० सत्तावीस हजार रुपये खर्च येतो. एकटा सर्वशब्दंकष असा कोश करावयाला च अडीच लाख रुपये पुरे होतील असें आम्हास वाटत नाहीं. मोल्सवर्थला काय खर्च आला असेल त्याचा अंदाज करा. बाकीच्या प्रकरणांना हि खर्च असा च लागणार. हीं सर्व प्रकरणें किंवा ह्यांतील कोणतें हि एक प्रकरण तीन शें किंवा पंधरा शें रुपड्यांत करून घेण्याच्या गोष्टी बोलणें केवळ हसनीय आहे. आमच्या हि मनांत गेलीं दहा वर्षें हीं दहा प्रकरणें सिद्ध करण्याचें उत्कटत्वानें घोळत आहे व हजार दोन हजार रुपयांत तीं होण्यासारखीं असतीं, तर आजमित्तीस त्यांची पाच चार वर्षां खालीं सिद्धि करून आम्हीं मोकळे होऊन पांच चार वर्षें झालीं असतीं. परंतु, हजार दोन हजारांतलें हें काम नसून अडीच तीन लाखांतलें हें प्रकरण आहे. असा अनुभव आल्या वर व्युत्पत्ति व आदेश ह्यांची थोडी बहूत सिद्धि करून ठेवण्यांकडे आम्हीं लक्ष्य दिलें व कोणी साहायक निर्माण होतों कीं काय याची प्रतिक्षा करीत बसलों. अलीकडे महाराष्ट्रसाहित्यपरिषदेचें इकडे लक्ष्य लागलेलें पाहून समाधान वाटलें. भाषेचा शास्त्रीय इतिहास किंवा वाङ्मयाचा शास्त्रीय इतिहास किंवा ज्ञानकोश, हीं अघाढव्य कामें व्यक्तींच्या पेक्षां परिषदांची च आहेत. इतकें च कीं, परिषदांच्या लक्ष्यांत कामाची व्याप्ति

आली पाहिजे. रा. महाजनी यांनीं पत्रद्वारा एतत्संबंधक विचारपूस आमच्या कडे केली होती. तेव्हां भाषेच्या इतिहासाला किंवा वाङ्मयाच्या इतिहासाला कमींत कमीं ३०,००० तीस हजारांचा खर्च येईल असें भीतभीत च आम्हीं कळविलें होतें. परंतु, दोनतीन तज्ञ गृहस्थांच्या सल्यानें हिशेब करून पहातां असें आढळून आलें कीं हें काम अडी च तीन लाखा खालीं मना जोगतें उठणार नाहीं. तत्रापि अडीच तीन लाखाची हि शंका च येते. एकटा कोश च अडीच लाख खाऊन जाईल. आमचें स्वतःचें एकट्याचें मत असें आहे कीं उपरि-निर्दिष्ट दहा हि प्रकरणें सिद्ध होण्यास पांच लाखांची रक्कम लागावी. सबब, परिषदेला आमची अशी मनःपूर्वक सल्ला आहे कीं तिनें ही रक्कम राजेरज-वाड्यां कडून किंवा कंपनी बनवून उभारावी आणि अधिकारी तज्ञांच्या करवीं हें महत्कृत्य सफल करून घ्यावें. ह्या दाहा प्रकरणांच्या शास्त्रोक्त छपाईला दोन अडीच लाख रुपये लागतील ते खेरीज. तात्पर्य प्रारंभापासून छपाई वगैरे समाप्ती पर्यंत या कार्याला सहा सात लाख रुपये लागावे असा अंदाज होतो.

(१८) आतां दुसरा एक पक्ष विचाराकरतां घेऊं. हें काम फुकट होईल कीं नाहीं? होणार नाहीं असें आमचें उत्तर आहे. समजा कीं तज्ञांनीं व त्याच्या पांच मदतनीसांनीं पांच दहा वर्षे फुकट खपण्याचें मनांत आणिलें, तत्रापि हपीस, कारकून, प्रवास व चिल्हर साठ हजारांचा खर्च कांहीं केल्या टळणार नाहीं. शिवाय, फुकट काम करणारे तज्ञ व मदतनीस मिळणें बहुतेक अशक्य आहे. परिषदेंतील रावबहादूर, राजेरजवाडे, व्यापारी व सावकार जर तज्ञ व त्याचे मदतनीस यांच्या बरोबरीनें पांच दहा वर्षे पोटाला फडकें बांधून उपास करावयाला किंवा मधुकरी मागावयाला सिद्ध असतील, तर एक वेळ ही कर्मसिद्धी फुकट होण्याचा अर्धा पाऊण संभव आहे. मग महिना तीन रुपयां वारी च काय, पण नुसत्या जेवणा वारी सुद्धां पैशाचे पासरीभर तज्ञ व शास्त्रज्ञ परिषदांच्या घरोघर पाणी भरतील. स्वार्थ-त्याग दोन्हीं पक्षां कडून होण्यांत न्याय आहे. एका च बाजू कडून स्वार्थत्या-गाची अपेक्षा करण्याची संवय लागल्यानें, अपेक्षकांचें व अपेक्ष्याचें सारखें च नुकसान होतें. आजपर्यंत नुकसान किती थोरलें झालें म्हणून सांगावें. महिना पांच आण्या वर दीक्षितां कडून ज्योतिषशास्त्राचा इतिहास लिहून

घेतल्याचा काय परिणाम झाला ? बिचारे दीक्षित दहा पांच वर्षे फुकट खपून भर तारुण्यांत म्हातारे दिसूं लागले व नाहक्क अकालीं मृत्युमुखीं पडले. ज्योतिषाच्या इतिहासा करितां सभांनीं व संस्थानांनीं जें शेवटीं बक्षिस दिलें तें इतकें क्षुद्र होतें कीं त्याच्या आशे वर लहानमोठे मदतनीस ठेवण्याची ऐपत दीक्षितांना कधीं च आली नाहीं व लिहिणें, ग्रंथ तपासणें व गणितें करणें वगैरे सर्व कामें करण्याची दगदग स्वतःवर व अर्भकां वर पडून हा कष्टाळू प्राणी थकून गेला. शिवाय हें हि विचारांत घेतलें पाहिजे कीं मनसोक्त द्रव्यसाहाय्य असतें तर दीक्षितांच्या हातून जितका व्यापक व सूक्ष्म ज्योतिषेतिहास निर्माण होता तितका द्रव्याच्या अभावीं त्यांच्या हातून झाला नाहीं. त्यांत बरींच व्यंगें राहिलेलीं आहेत. अपूर्णतेचा हा दोष दीक्षितांचा नव्हे, लोकांचा, राजांचा, परिषदांचा व परिस्थितीचा आहे, विद्यावृध्यर्थ द्रव्य कां, कसें व कोठें खर्चावें हें समजण्याची अक्कल अद्याप लोकांना, राजांना परिषदांना व सभांना फुटावयाची आहे. खबुतरें, वारवनिता, पेहलवान व तमाशेवाले यांची पारख धनिकांना होऊं सकते; विद्वान्, संशोधक, व विचारस्रष्ट्रे यांना ओळखण्याचीं इंद्रियें अद्याप राजांना व परिषदांना आलेलीं नाहींत. तीं आलीं म्हणजे वागीश्वरांची ओळख धनेश्वरांना पटून शास्त्रें, कला, ज्ञानप्रसार व विदग्धवाङ्मय यांनीं ही भूमि फुलून जाईल.

(१९) हें बोलणें कदाचित् अलंकारिक भासेल सबब वाच्यार्थानें आम्ही परिषदांना, सभांना, संस्थानिकांना व सर्व लोकांना निक्षून पण नम्रपणें असें सांगण्याची परवानगी घेतों कीं आपल्या मनांत महाराष्ट्रांतील प्राकृतिक भाषांचा व अखिल वाङ्मयाचा शास्त्रीय इतिहास निर्माण व्हावा अशी जर महदिच्छा उद्भवली असेल, तर वर लिहिलेल्या प्रमाणें सहा सात लाखाची रक्कम अवश्यमेव उभारा. ह्या दोन्हीं इतिहासांचीं साधनें अर्धीअधीक जमलेलीं आहेत व त्यांच्या जोरा वर हे दोन्ही इतिहास रचण्याची वेळ होऊन गेलेली आहे. इतिहास लिहून घेण्याची ही अमूल्य संधि दवडूं नका. दुर्दैवानें आजपर्यंत आपण अनेक प्रकरणीं अशा संधी अनेक दवडल्या. देशांत प्रखर व निर्भीड बुद्धिमत्तेचें दुर्भिक्ष्य तर खरें च. परंतु बुद्धीचें जें थोडें अल्पस्वल्प पीक कधींमधीं वर डोकें करतें त्याची तरी जोपासना आपण कितीशी केली आहे ! ज्योतिषाचा इतिहास लिहिण्याच्या थकव्यानें आपण दीक्षितांना अकालीं मरूं दिलें. आपल्या हलगर्जीपणाला अलीकडे दुसऱ्या एका बुद्धिवंताच

बळी पडला. मेल्या वर ओकांची आपण स्तुतिस्तोत्रें गाइलींत; पण जीवंत असतांना त्यांच्या (ह्मणजे तुमच्या च) कार्याला तुह्मीं किती मदत केलीत ? ह्या अत्यंत तैलबुद्धीच्या गृहस्थानें सुमारें आठ वर्षें उत्तम शिक्षणोपयोगी छोटी पुस्तकें व एक बराचसा चांगला संस्कृत कोश करून आपली लायकी सिद्ध केली. ही सर्व मेहनत निरपेक्षबुद्धीनें फुकट झालेली होती. हिचें चीज आपण कोणतें केलेंत ? दारिद्र्यानें शरीराचे हाल होऊन हा हि गृहस्थ अकालीं ह्मणजे अगदींच पोरवयांत कर्तृत्वाला अंतरला. ह्या विद्वानाला आपण वेळीं च द्रव्यसाहाय्य केलें असतें तर त्याच्या हातून काहीं नामांकित ग्रंथरचना झाली नसती काय ? आपला तिसरा बळी शांतारामपंत देसायांचा. ह्या विद्वाना एवढा सूक्ष्मदृष्टि वेदान्तज्ञ आमच्या आढळांत साऱ्या भरतखंडांत नव्हता. परंतु द्रव्यद्वारा किंवा मानद्वारा किंवा नुसत्या प्रशंसाद्वारा तरी कोणत्या परिषदेनें यांचें गुणग्रहण केलें ? हा हि गृहस्थ ऐन तारुण्यांत ह्या गुणपराङ्मुख देशाला सोडून गेला. हीं मृतांचीं कथा झाली. जे कसोटीला उतरलेले कर्ते अद्याप जीवंत आहेत व ज्यांनीं आपली लायकी तज्ञांच्या नजरेस आणून दिली आहे अश्यांचा परामर्श आपण किती घेत आहांत ? वासुदेवशास्त्री खऱ्यां इतका पटवर्धनी इतिहासाचा ज्ञाता साऱ्या भूमंडळांत दुसरा नाहीं. त्यांच्या हातून पटवर्धनी काळाचा इतिहास तयार करून घेण्याची कल्पना तरी आपणास शिवली आहे काय ? इतक्या अवाढव्य माहितीचा मनुष्य वारंवार निपजतो काय ? पटवर्धनी इतिहास साद्यन्त तयार करावयाला पन्नास हजाराची रक्कम पुरी पडणार नाहीं. ती शास्त्रीबावांना पोंचविण्याच्या तयारींत आपण आहांत काय ? डाक्टर केतकर विश्वकोश मराठींत रचण्याच्या उद्योगांत आहेत. ह्या उद्योगाला दहा लाख रुपये पुरले तर भाग्य समजावयाचें. भीतभीत यांनीं कंपनीद्वारा एका लाखाची मागणी केली आहे. पैकीं किती रक्कम कोणत्या परिषदेनें पुरविली तें सांगाल काय ? हें जगड्व्याळ कृत्य एका व्यक्तीचें कीं अनेक विद्वानांनीं बनलेल्या परिषदांचें ? परिषदा काय करतात, तर व्यक्ति. मेटाकुटीला कशा येतात तें मौजेनें पहातात. रा. शंकरराव राजवाडे गीतारहस्य यूरोपीयन शास्त्रकल्पनेनें प्रकट करीत आहेत. हें काम विश्वविद्यात्मक आहे. ह्याला श्रम केवढे विलक्षण लागत असतील ते ओळखून त्यांना आपण द्रव्यसाहाय्य करून चुकला च असाल ? प्रोफेसर विजापूरकर राष्ट्रीय शिक्षणाचा ओनामा आज वीस वर्षें आपल्या पुढें गात आहेत. त्यांना आपल्या हस्तें किती

मदत झाली ? रा. देव समर्थग्रंथांचें संशोधन व प्रकाशन गेलीं दीडदोन तपें करीत आहेत. त्यांच्या ह्या षोकाचे आपण वाटेकरी झाला आहात काय? कां त्यांना तसे च शोक करीत ठेवणार ? महाराज सयाजीराव गायकवाड यांनीं बडोद्यास व लॉर्ड कर्झन यांनीं कलकत्यास तुमच्या नजरे खालून जाण्याकरितां विश्व-ग्रंथालयें उघडलीं आहेत. त्यांचा उपभोग घेण्यास आपल्या परिषदेंतील किती वि-द्वान् आजपर्यंत आपण पाठविलेत? कां त्या आलयाचा आश्रय कधीं हि न करण्याची आपण शपथ घेतली आहेत ? साहित्यपरिषद् हें बडे नांव आपण घेतलेंत त्या प्रमाणें महाराष्ट्रवाङ्मयाचें साहित्य आपण आजपर्यंत किती केलेत ? असो. ही प्रश्न-परंपरा किती ह्मणून वाढवावी ? आपला हलगर्जीपणा घोर व अक्षम्य आहे. ह्या हलगर्जीपणाचा परिणाम आजपर्यंत फार घातुक झाला. जिचें साहित्य करण्या करितां आपण जन्मलात त्या मराठी भाषे पासून पट्टीचा एकोनएक विद्वान् पराङ्मुख झाला. वनस्पतिशोधक कीर्तिकर, रोगशोधक राव, प्राचीन-शोधक भांडारकर, पंचांगशोधक दीक्षित, रामायणशोधक वैद्य, वेदशोधक पंडित, अतिप्राचीनेतिहासशोधक टिळक, वेदसमाजशोधक कुंटे, भारती-यार्थशास्त्रशोधक रानडे व जोशी, इत्यादिप्रभृति झाडून चट साऱ्या पट्टीच्या महाराष्ट्रांत जन्मलेल्या बुद्धिमंतांनीं, स्वदेशांत गुणग्रहण करणारें कोणी नाहीं ह्मणून, विचारप्रदर्शनार्थ परभाषाद्वार पाहिलें. ह्या पापाचे धनी बव्हंशानें आपण आहात. स्वदेशांत गुणांचें चीज होत नाहीं एतदर्थ परभाषाद्वार कर-ण्यांत ह्या बुद्धिमंतांनीं हि लहानसहान अपराध केला असें नाहीं. तत्रापि स्वदेशांत स्वभाषाद्वारा गुणग्रहण होत नाहीं ही बाब काहीं विसरतां येत नाहीं. आपण किंवा आपला जन्म होण्या पूर्वींच्या सभा जर गुणग्रहण कर-ण्यास लायक असत्या, तर हे शहाणे परभाषाद्वार कशास पहाते ? अधिगत-परमार्थ जे पंडित त्यांचा जाणून किंवा नेणून अवमान केला किंवा वेळीं च परामर्ष घेतला नाहीं, तर केवढें भयंकर नुकसान होतें तें कीर्तिकरादि पंडि-तांच्या वर्तना वरून आपल्या ध्यानांत आजपर्यंत यावयास हवें होतें व होत-करू विद्वान हातचा परमार्षेत किंवा परलोकास अकालीं जाऊं द्यावयाचा नाहीं असा निश्चय आपण केला पाहिजे होता. तो वेळीं च करण्याची बुद्धि न झाल्यानें आपलीं गेलीं शंभर वर्षें केवळ फुकट गेलीं. जणूं काय आपण मृतवत् झालों. विद्यावंत, बुद्धिमंत व प्रतिभावंत व्यक्तींचा अवमान आपल्या जुन्या संस्कृत धर्मशास्त्रांत जसा तसा च नवीन पाश्चात्य समाजशास्त्रांतहि अत्यंत गर्हणीय व हानिकारक गणला आहे.

अनुक्रमणिका

अधिगतपरमार्थान् पंडितान् मावमंस्थाः

असें संस्कृत वचन आहे व ह्या सारखीं च श्रुतिस्मृतिग्रंथांत अनेक वचनें आहेत. हा संस्कृत उपदेश कदाचित् जुनापुराणा भासेल. सबब, एका पाश्चात्य समाजशास्त्र्याचा उपदेश तरी परप्रत्ययनेयबुद्धींना ग्राह्य वाटण्याचा संभव असेल अश्या समजुतीनें तो एथें दाखल करतों. समाजशास्त्री लिहितोः—

> " In nothing whatever can a nation
> so ill afford to be wasteful as
> in her men and women who
> combine genius with the highly
> developed social nature. What,
> then, shall we say of those people that
> deliberately destroy such elements
> of the population by death, imprisonment
> and other kind of persecution. "

समाजशास्त्र्यानें death, imprisonment व persecution ही तीन च कारणें प्रतिभेच्या नाशाचीं यूरोपांतील दिलीं आहेत. आपल्या ह्या देशांत प्रतिभाक्षयाचें निराळें च कारण आढळून येतें. तें indifference ऊर्फ neglect हें होय. Neglect नें तर प्रतिभेचा नाश बेमालूम होतो. आणि प्रतिभेचा नाश ह्मणजे च राष्ट्राचा नाश.

आतां तरी पुढें । हा चि उपदेश ।
नका करूं नाश । प्रतिभेचा ॥ १ ॥

अनुक्रमणिका

सत्कार्योत्तेजक सभा–धुळें

श्री

इतिहास आणि ऐतिहासिक

भाग दुसरा

मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें

खंड २१ वा

शिवकालीन घराणीं

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या श्रीआत्माराम छापखान्यांत छापून धुळें येथें प्रसिद्ध केला.

१८४० कार्तिक शु. १

किंमत तीन रुपये

अनुक्रमणिका

सत्कार्योत्तेजक सभा–धुळें

श्री

इतिहास आणि ऐतिहासिक

भाग तिसरा

पेशवाईची अखेर

(१७१७–१७४०)

संपादक

गोविंद काशीनाथ चांदोरकर

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या श्रीआत्माराम छापखान्यांत छापून धुळें येथें प्रसिद्ध केला.

१८४० कार्तिक शुद्ध १

किंमत दोन रुपये

अनुक्रमणिका

उपोद्घात

' पेशवाईची अखेर ' हें नांव बखरकारानें दिलें नसून सोयीसाठीं आम्ही दिलें आहे. या बखरीचीं आरंभीचीं ११ पानें व अखेरचें कदाचित् एखादें गेलें असल्यानें मूळचें या बखरीचें कांही नांव असल्यास तें समजण्यास आतां मार्ग राहिला नाहीं.

ही बखर आमच्या एका वकील मित्राच्या साह्यानें खानदेशांतील इनामदार अशा एका सारस्वत 'घराण्याचे कागदपत्रांत मिळाली. शिंद्यांचे पदरीं कांहीं सारस्वत घराणीं नांवारूपास आलीं होतीं त्यापैकींच हे एक घराणें आहे. अशा घराण्याचे संग्रहीं असलेलीं ऐतिहासिक टांचणें महत्वाचीं आहेत हें उघड आहे. तशांत या बखरीचा लेखक आपण कोणते कागदपत्रांच्या आधारें ही बखर लिहीत आहों हें वेळोवेळीं स्पष्ट देत आहे. त्यांत महिपतराव चिटणीस व राबिसनसाहेब यांचीं नांवें वारंवार येतात. चिटणीस व साहेबमजकूर यांच्या जवळील नकला, कित्येक प्रसंगीं अस्सल कागदपत्र, व कदाचित् स्वतःची प्रत्यक्ष माहिती यांचे आधारें ही बखर लिहिली गेली आहे. नानाफडणीसांचे मृत्यूचे वेळीं त्यांचे कुटुंबांचा उल्लेख करतांना 'जिऊबाई हल्लीं आहेत ' (पा. ८४) असें हा लिहितो यावरून शके १७४० नंतर लवकरच ही बखर लिहिली गेली असावी असें दिसतें.

येरंडोली गुळगुळीत कागदावर सळ घालून अत्यंत सुंदर अक्षरांनीं मोडींत ही बखर लिहिली आहे. शाई काळीभोर आहे. लिहिणें एकटाकी आहे, व तें उभे कागदावर एकाच बाजूस आहे. समास अगदीं शास्त्रोक्त सोडले आहेत. अक्षर सर्वत्र एका वळणाचें व एका प्रमाणाचें आहे. पत्रें दुमडलेलीं आहेत. अशी मोठी व्यवस्थेशीर लिहिलेली ही बखर आहे; व ती तशीच बाळगलेलीहि दिसते. मग प्रथमचीं ११ पृष्ठें कां जावीं तें कळत नाहीं.

गोष्टी जशा घडत गेल्या तशाच केवळ कालानुरोधानें देणें व त्याहि पुणें दरबारच्याच देणें, एवढेंच आपलें कार्यक्षेत्र या अखबरनवीसानें मर्या-

दित करून तें उत्तम रितीनें पार पाडलेलें दिसतें. इतिहास म्हणजे निखालस उघड्या नागड्या ऐतिहासिक गोष्टी या बखरींत दिल्या आहेत, त्यांचा आत्मा दिलेला नाहीं. यावरून हा बखरकार राजकारणांतील नसावा असें वाटतें, तथापि त्याची मार्मिकता व त्याचा चौकसपणा क्वचित नजरेस येतो. हरिपंत, नाना, व श्रीमंत बाजीराव सो यांचें स्वभाववर्णन त्यानें बिनचूक रेखाटलेलें आहे. विटाळ झाल्याकारणानें श्रीमंतांची पालखी धुणें, त्रिंबकराव पेठ्ये यांच्या कुटुंबाचे--काशीबाईचें--श्रीमंताच्या मर्जीप्रमाणें न वागणें व माहुलीचे वाड्यांत विधवा गंगाबाई राजमाचीकरीण इच्याशीं श्रीमंतांनीं केलेलें अश्लाघ्य वर्तन, या दिलेल्या हकीकतीवरून या बखरकारास अंतस्थ माहिती बरीच होती असें दिसतें. ' मानाजी अंग्रे मृत्यू पावले त्यांचे पुत्र सेखोजी अंग्रे यांस श्रीमंतांनीं पळत फिरत असता वस्त्र पाठविलीं; हें वाचून ह्या लेखकाचा विनोद व ' सर्जेन मालकम ' च्या सह्या कलमी ' दरखास्ती ' वर सही केल्यानंतरच्या वर्णनात या बखरकारानें बाजीरावास ' श्रीमंत ' हें उपपद लाविलेलें नाहीं, हें पाहून त्याची मार्मिकता हीं नजरेस येतात.

गो. का. चांदोरकर



अनुक्रमणिका

आपले आपण जेर होतील अशी सला दिल्ही त्याजवरून श्रीमंतास भरवसा आला परंतु ये वेळेस बिघाड करावा तर बरसात जवळ येऊन पोचली सिंदे भोसले होळकर यांच्या फौजा दूर राहिल्या निभावणी होणार नाहीं तेव्हां जसें ह्मणतील तसें कबूल करून बरसात जाऊ द्यावी आपलीही फौज आणखीही तयार करावी नंतर बिघाड करावा असा विचार करून सफाईचे बोलणें बोलावयास पोटसाहेब व मोर दिक्षीत व बाळाजी लक्षुमण साहेबाकडे जाऊं लागले

१ बाळोजी कुंजर वैशाख वा। ९ छ २१ जमा दिलावरी पसरपूरचे मुकामीं मृत्य पावले

१ च्यतुरसिंग कागोरीच्या किल्यावर कैदेंत होते तेथेंच मृत्य पावले

१ कढ्या न्हावी प्रतिनिधीचे फार लोभांत आपले पेक्षां त्याचा इतमाम आधिक व सारा कारभार त्याजकडे असे जालें होतें त्याची वर्तणूक नीट नाहीं सबब गोखले याणीं कैद करून कागोरीस पाठविला त्यास किल्यावरून लोटून दिल्हा

१ चिमणाजी नारायण याजवर इतराजी होऊन त्यास कोकणांत रवाना केले त्याचे ऐवजीं रामचंद्र भिकाजी करंदीकर कामांत वागूं लागले

१ श्रीमंताचे तर्फेनें मोर दिक्षीत व बाळाजी लक्षुमण यांणी साहेबाजवळ बोलणी बोलून तहनामा ठरविला त्यांतील हासील वसईचे मुकामी येकूणीस कलमांचा तहनामा जाहला त्याजवर पुणें मुकामीं सातकलमांचा तहनामा जाहला त्याजवर मधें खलेल आला होता तो दूर करावा याकरितां व पहिले तहनामे जाहले आहेत त्यांचे मजबुदीकरितां हलीचे तहनाम्याची कलमें लिहिलीं जात आहेत कलमें

१ गंगाधरशास्त्री कारभारी व वकील नि॥ आनंदराव गाईकवाड यास त्रिंबकजी डेंगळे यांणीं मारिले त्यास असे कर्म केले त्याचे पारिपत्य व्हावें व पुढे

कोणी असे कर्म न करी असी दहशत सर्वांस पडावी हे कर्णें दोही सरकारास लाजीम आहे त्याव-रून त्रिंबकजी डेंगळे इंग्रजीसरकारचे हवालीं जाहले तेथून कैदेंतून निघोन गेले आणि बंड जमा करून लोकांस मारावे व लुटावें असें करूं लागले हा दुसरा अपराध केला त्यास श्रीमंत अंत:कर्णापासून स्वच्छ-तेनें करार करतात जे त्रिंबकजीस आश्रय न देतां तो मगदूर प्रेत्नें करून इंग्रजीसरकारचे हवालीं होईल याप्रमाणें याप्रमाणें करार करितात त्यास तो हातीं येईतोपर्यंत त्याचे कबिले व मुलें सरकार कंपि-णी इंग्रज याजवळ असावी व त्याचे बंडांत सामील आहेत त्याविसी श्रीमंतांनीं सनदा लिहिल्या आहेत त्याप्रमाणें जे सरकारांत रुजू न होतील त्याचे पारि-पत्य चांगले तऱ्हेनें होईल याप्रमाणें श्रीमंताचे सर-कारांतून होत आहे

२ वसईचे मुकामी येकुणीस कलमाचा तहनामा व पुणें मुकामीं सात कलमांचा जाहला आहे त्यांतील कल-मास हलींचे तहनाम्यांतील कलमाने व्येत्यये न येई तीं कलमें बाहाल आहेत

३ वसईचे तहनाम्यांतील आकरावे कलमांत लिहिलें आहे जे फिरंगस्थानचे कोणी दौलतदार इंग्रजी सर-कारासीं लढत आसतील त्याची रयत श्रीमंताचे सरकारांत येऊन इंग्रजी सरकारचे नुकसानाची तजवीज करतील त्यास श्रीमंत आपले मुलकांतून दूर करतील हाली श्रीमंताचे सरकारांतून करार होत आहे जे फिरंगस्थानचे येंगी दुनियापैकीं किते-क सरकारवाले आहेत त्याजकडील रयत वगैरे कोणी

श्रीमंताचे सरकारचे मुलकांत आल्यास इंग्रजी सरकारचे इतल्यासिवाये त्याजला जागा देणार नाहीं

४ वसईचे तहनाम्याचे सतरावे कलमांत श्रीमंताचे सरकारांतून करार केला जे इंग्रजीसरकाचे इतला व सल्यासिवाय कोणीयेक सरदारासीं कांहीयेक जाबसाल कोणताही सुरू करणार नाहीं व ज्यारी ठेवणार नाहीं त्या कलमाचे मजबुदीकरितां श्रीमंत करार करितात जे सरदार दौलतदार कोणी येक याजवळ वकील व आकबरनवीस व हरकोणी कारकून कामदार ठेवणार नाहीं व कोणी सरदार व दौलतदार याजकडील वकील व आकबरनवीस व हरकोणी कारकून व कामदार आपले सरकारांत ठेवणार नाहीं जो कांहीं जबाब सवाल करणे असेल तो इंग्रजीसरकारचे वकिलाचे मारफतीनें करूं पहिले तमाम मराठे सरदारामध्यें इलाखा होता तो सुटला व त्या सरदारावर हरतऱ्हेचा दाया असेल तो सोडून दिल्हा तुंगभद्रा व नर्मदेच्या मध्यें व मोंगलाई मुलकाचे पछमेस जे सरदार श्रीमंतासी रुजू आहेत त्याजवर श्रीमंताचा दाया हक असेल त्यास वर लिहिलें आहे त्याणें खलेल येणार नाहीं माहाराज करवीरकर व सांवतवाडीकर यांज वर श्रीमंताचे सरकारचा दावा नाहीं सिंदे होळकर भोसले गाईकवाड यांचा जो मुल्लक वगैरे दाया तुंगभद्रा व नर्मदेच्या मध्यें व मोंगलाई मुलकाचे पछमेस इतक्यांत असेल त्याजवर श्रीमंताचे सरकारचा दावा नाहीं

५ वरचे कलमांत मराठे दौलतीचे सरदारांवर दावा अ-

सेल तो श्रीमंताचे सरकारांतून सोडून दिल्हा त्यांत गाईकवाड याजवर ही जो दावा व हुकमत कोण-तेही तऱ्हेचा असेल तो सोडून दिल्हा असें लिहिलें आहे व वसईचे तहनाम्यांत चवदावे कलमांत श्रीमं-ताचे सरकारचा गाईकवाड यांजवर कागदपत्राचे सइनें जो जाबसाल असेल त्याची दरयाफ्ती इंग्रज-सरकारचे मारफतीनें होऊन गाईकवाड याजकडे जे लागू होईल त्याप्रमाणें फडशांत येईल असें कलम लिहिलें आहे त्यास कागदपत्राचे सईनें श्रीमंताचे सरकारचा दावा आजपर्यंत जो लागू होईल तो बा-हाल आहे त्यास श्रीमंत करार करीत आहेत कीं गाईकवाड बेशर्थ साल दरसाल चार लक्ष रुपये द्यावयाचे कबूल करीत असल्यास हाई दावा सुटला कबूल करीत नसले तरी गाईकवाड याजवर श्रीमं-ताचे सरकारचा दावा जो असेल तो वसईचे चव-दावे कलमाप्रमाणें फडशा होईल सिवाय कोणताही दावा राहिला नाहीं

६ पुण्याचे मुकामीं सात कलमें करार जाहलीं त्यांत चवथे कलमांत करार कीं लढाईचे वेळेस पांच ह-जार स्वार व तीन हजार पायदळ बमय तोफा व सामान लढाईचे द्यावे व यासिवाय आणखी फौज द्यावी असें लिहिलें आहे ते महकूब होऊन त्या ऐवजीं करार जाले जे श्रीमंत करार करितात कीं पाच हजार फौज व तीन हजार पायदळ बमय तोफखाना व सामान याचा खर्च देऊं ह्मणजे पुण्यां-तील चवथे कलम दूर जालें लढाईचें वेळेस मुल-कांत जितकी फौज तामगदूर तयार होईल ती द्यावी

असा श्रीमंताचा करार आहे तो बाहाल आहे व इंग्रजीसरकारचा करार साहा पकटणें तैनाती आहेत त्या सिवाय लढाईचे वेळेस आणखी फौज पैदा होईल ती द्यावी असा करार आहे तोही बाहाल आहे

७ वरचे कलमांत खर्च द्यावयाचा करार जाहला आहे त्याचे बेगमीविसीं अलाहिदा कागद या तहनाम्याबरोबर दिल्हा आहे त्यांत मुलूख व आंमल लिहिला आहे तो हामेषाकरितां इंग्रजीसरकारांत श्रीमंताचे सरकारांतून दिल्हा आहे त्या मुलकावर श्रीमंताचे सरकारचा हक व दाया हरतऱ्हेचा जो असेल तो दरोबस्त सोडून दिल्हा व तेथील सरदार व भुमे जमीदार वगैरे याजवर इलाखा टेवणार नाहीं याप्रमाणें श्रीमंताचे सरकारांतून करार होत आहे

८ मुलूख द्यावयाचे कलम वर लिहिलें आहे त्यास जो मुलूख करार होईल त्यांत जो इंग्रजी सरकारचे उपयोगी नसेल तो फिरऊन त्याचे मोबदला दोनी सरकारची सरहद साफ होई असा लावून द्यावा सातवे व आठवे कलमाबरहुकूम मुलूख लावून दिल्हा जातो त्यांत इंग्रजी सरकारचा हुकूम राहील श्रीमंताचे सरकारचा दावा बिलकूल राहणार नाहीं.

९ मुलूख जो इंग्रजीसरकारांत दिल्हा त्याविसीं श्रीमंताचे सरकारातून आपले आंमलदारास हली तूर्त मुलूख हवालीं करावा याविसीं ताकीदपत्रें द्यावीं मृगसालापुढें त्या मुलकांतील ऐवज श्रीमंताचे सरकारचे आमलदारानीं वसूल केला असेल तो इंग्रजीसरकारांत परत द्यावा व बाकीविसी वगैरे दावा त्या मुलकावर करूं नये

१० आलाहिदा कागदांत जो मुलूख लिहिला आहे त्या मुलकांत जे किले असतील ते मुलकाबरोबर कुंपणी सरकारचे हावालीं होतील श्रीमंताकडून करार होत आहे जे किले जसे आहेत तसे हावाली होतील नुकसान करून हावाली करणार नाहीं

११ जो मुलूख इंग्रजी सरकारचे हावालीं होत आहे त्यांत फंद फितवा वगैरे जाहल्यास इंग्रजी लस्कर श्रीमंताचे सरकारचे तैनात आहे त्या पैकीं जितके कारण लागेल तितके पाठवावयाविसीं श्रीमंताचे सरकारांतून इजाजत होईल

१२ किले आमदानगर व त्याचे आसपास जे मईदान आहे त्या पैकीं रेवणीचे बाहेरचे हांदेपासून चौफेर च्यार हजार हात जमीन श्रीमंत इंग्रजी सरकारांत हामेषाकरितां देत आहेत व इंग्रजी लस्करचा मुकाम जेथें जेथें आहे त्याचे कही करितां छावणीजवळ कुरणें लागतील तीं श्रीमंताचे सरकारांतून इंग्रजी सरकारास लाऊन देत आहेत वसईचे तहनाम्याचे सईनें तहनामा अमलांत आणावयाकरिता जितके इंग्रजी लस्कर श्रीमंताचे मुलकांत आणावे लागेल तितके आणावें त्यांत शुबान राहावयाकरितां श्रीमंताचे सरकारांतून करार होत आहे कीं तैनाती लस्करासिवाये जितके लस्कर इंग्रजी सरकारचे श्रीमंताचे मुलुखांत राहील त्याविसीं मनाई नाहीं जाजती लस्कर येईल जाईल व मुलकांत राहील त्याचा खर्च या तहनाम्याचे सईनें श्रीमंताकडून इंग्रजी सरकार मागणार नाहीं

१३ सुभा बुंदलखंड मईसागर व झासी व गोविंदराव गंगाधर याचा मुल्लख याजवर श्रीमंताचे सरकारचा हक दाया व हुकमत जमिनीचा व ऐवजाचा असेल तो दरोबस्त श्रीमंत इंग्रजी सरकारांत हामेषाकरितां देत आहेत त्या जिल्ह्याचे सरदारासी श्रीमंताचा इलाखा कांहींयेक राहिला नाहीं

१४ श्रीमंताचे सरकारांतून हाली करार होत आहे जे माळवा वगैरे मुलकांत श्रीमंताचे सरकारचा दाया व हुकमत असेल तो व नरमदापारचे मुलकांत श्रीमंताचा दाया व हुकमत असेल ती सुभे गुजराथ खेरीज करून दरोबस्त श्रीमंत इंग्रजी सरकारांत हामेषाकरितां देत आहेत व पुढें इंदुस्थानचे मुलकांत मुदाखला करणार नाहीं असा करार करीत आहेत

१५ श्रीमंत यांणी शेहर व सुभे आमदाबाद काठेवाडचे खंडणीसमेत जितका श्रीमंताचा हिसा आहे त्याचा मखता गाईकवाड यास सालिना साडे चार लक्ष रुपये यास ठराऊन दिल्हा होता त्यापैकीं काठेवाड हल्लीं सातवे कलमाचे सईनें इंग्रजी सरकारांत दिल्हे आहे ते खेरीज करून श्रीमंताचे सरकारांतून गाईकवाड यास शेहर व सुभे आमदाबाद येथील सालिना साडे चार लक्ष रुपयाचा मखता करार करून देत आहेत शेहर व सुभे आमदाबादची जमा आधिक आहे व गाईकवाड याजवर श्रीमंताचे सरकारचा दावा होता तो आजपासून सुटला बाकी ऐवजी च्यार लक्ष रुपये सालिना गाईकवाड याजवर ठरत आहेत याणें श्रीमंताचे नुकसान होते याजवर नजर

देऊन काठेवाडचा मामला खेरीज करून साडे चार लक्ष रुपयांचा मक्ता ठरला आहे

१६ करनाटकचे जाहागीरदाराचे बंदोबस्ता करितां इंग्रजी सरकारांतून साहा कलमें तयार होऊन पेशजी श्रीमंताचे सरकारांत गुदरलीं आहेत त्या कलमाची श्रीमंताचे सरकारांतून कांहीं तबदील करून मंजूर केले ते कलम आतां या तहनाम्यांतील कलमाप्रमाणें बाहाल व बार करार त्यास पेशजीचे यादीची नकल या तहनाम्या बरोबर लागली आहे जहागीरदाराचे हजरी बरहुकूम व चाकरीचे मुदतीबरहुकूम तेव्हा पासून रदबदल बहुत पडली त्यास हलीं श्रीमंत कबूल करीत आहेत जे इंग्रजी सरकारचे सलेनें हजरीचा व चाकरीचा जबाबसवाल ठरेल त्याप्रमाणें श्रीमंताचे सरकारांतून केलें जाईल त्या सरदारावर इंग्रजी सरकारचे मसलती सिवाय हुकमत श्रीमंताचे सरकारांतून करूं नये सरदाराचे सनदेंतील जमीन श्रीमंताचे सरकारांत असल्यास ती जमीन त्या सरदारास द्यावयाचे श्रीमंत कबूल करीत आहेत माधवराव रास्ते याची जाहगीर सन खमसांत सरकार जफ्त केली आहे ती इंग्रजी सरकारचे सिफारशीवर नजर देऊन त्याजकडे बाहाल करीत आहेत जसे पेशजी इंग्रजी सरकारचे बाहादारीनें त्याजकडे चालत होते त्याप्रमाणें चालेल ह्मणोन श्रीमंत कबूल करीत आहेत

१७ मळेघाट व त्या इलाख्यांतील जो मुलूख इंग्रजी सरकारचे मसलतीसियावें श्रीमंताचे फौजेनें सन इहिदे अशीरचे सालांत घेतला आहे त्याणें मुशारीख यास

अनुक्रमणिका

बहुत इजा होत आहे याजकरितां त्याजवर नजर देऊन मळेघाटांतून लस्कर काढून आणऊन तो मुलूख सोडावयाचा करार श्रीमंत करीत आहेत व यासिवाये सन ईहिदे आशरचे सालांत आणखी मुलूख श्रीमंताचे फौजेनें घेतला असल्यास तोही सोडून द्यावयाचा कबूल करीत आहेत त्या मुलकावर श्रीमंताचा दावा राहणार नाहीं

१८ हा तहनामा आठरा कलमांचा लिहिला असे ता। १३ माहे जून सन १८१७ इसवी छ २६ रजब सन १२३२ इजरी मुकाम पुणें

तहनाम्यांतील सातवे कलमांत श्रीमंताचे सरकारांतून इंग्रजी सरकारांत मुलूख लावून द्यावयाचा करार जाला आहे त्याचा कागद या तहनाम्याबरोबर दिल्हा आहे असे कलमांत लिहिले आहे तो कागद मुलूख लाऊन द्यावयाची

बेरीज—३४००००० रुा

यासी कलमे—

१ तूर्त महाल हावालीं करावे

१ बेलापूर व आरगाव प्रांत कल्याण व त्याचे उत्तरेस गुजराथ पावेतो शेय्याद्रीचे घाटापासून समुद्रपर्यंत जितका श्रीमंताचे सरकारचा मुलूख व आमल आहे तो दरोबस्त

१ प्रांत गुजराथ येथील आमदाबाद व उरपाड व गाइकवाड याजकडील सालिना खेरीज करून बाकी जितका श्रीमंताचे सरकारचा मुलूख व आमल आहे तो दरोबस्त

१ काठेवाडची खंडणी खर्च खेरीज करून ठराव रुपयें ४०००००

---

१ तालुके धारवाड व कुसेगंज

२

२

१ वर लिहिल्याप्रमाणें हलीं महाल तुर्त हवाली करून येथील माहलमजकूर खर्च वाजवी वजा होऊन बाकी पक्की बेरीज ठरेल ती चवतीस लक्षांत वसुलीं पुरऊन चवतीस लक्षाचे भरतीची बाकी राहील त्यास जे माहल लागतील ते करनाटकपैकीं कुपणी सरकारचे उपयोगी व सरहाद साफ होई असे लाऊन द्यावे

१ हलीं माहल हवाली होत आहे त्याची पकी बेरीज ठरोन भरतीस माहाल करनाटकपैकी द्यावयाचे ठरतील तेथील मृगसालापासून श्रीमंताचे सरकारचे मामलेदारानीं वसूल घेतला असेल तो तहनाम्याचे नवे कलमाप्रमाणें कुंपणी सरकारांत परत द्यावा

१ माहल हलीं हवाली होत आहेत त्याची पकी बेरीज ठरावयाकरितां दफ्तरचे आजमास वगैरे कागद वीस वर्षांचे पलीकडील खातरजमेमाफक जे लागतील ते आजपासोन पाचवे रोजीं आणोन द्यावे

या प्रमाणें तहनामा ठरला

१ तहनाम्याचे भरवशाकरितां त्रिंबकजीची मुलेमाणसे कैदेंत ठेविली

१ वकील व आकबरनवीस व बाहेरचे सरदाराजवळ होते त्यास येण्याविसीं पत्रें पाठविलीं

१ पुण्यांत बाहेरचे सरदाराचे वकील वगैरे होते त्यास निघोन जावें ह्मणोन ताकीद केली

अनुक्रमणिका

१ त्रिंबकजीची मुले माणसें कैदेंत ठेविली व वकील आकबरनीस आणविले त्यावरून तिनी किले श्रीमंतास इंग्रजानीं परत दिल्हे

१ श्रीमंतास किले इंग्रजी सरकारांतून माघारे दिल्हावर जवाहीर व पैका वगैरे चीजवस्त सिंव्हगड रायेगड वगैरे किल्यास रवाना केली व वाड्यांतील देव व थोरली स्त्री वाराणसीबाई रायेगडास पाठविली धाकटी स्त्री सरस्वतीबाई व आप्पासाहेब याची स्त्री दोघी उभयता जवळ राहिल्या

१ तहनामा जाल्यावर श्रीमंताची स्वारी पंढरपुरास गेली तेथून सालाबादप्रमाणें पुण्यास यावें तें न करितां श्रावण मास आधिक आहे सबब कृष्णाश्नानाचे निमित्यानें माहुलीस जाऊन तेथें राहिले

१ श्रावणमासची दक्षणा पुण्यांत चौथाई दिल्ही

१ पेंढाऱ्यांचे बदोबस्ताचे बोलणें बोलावयाकरितां सरजेन मालकमसाहेब चिनापटणाकडून हैदराबादेकडून डाकेवर श्रावणमासीं पुण्यास आले त्यास रामचंद्रपंत करंदीकर सामोरे गेले स्वारी श्रीमंताची पुण्यास येत नाहीं याकरितां मालकमसाहेब माहुलीस गेले श्रीमंताजवळ बोलणें जालें कीं पेंढाऱ्याचे पारिपत्यास लाटसाहेब जातीनें आले व करनाटकातून जरनेल इस्लाफसाहेब येत आहेत फौज पेंढाऱ्यावर जाईल तेव्हां निघोन दुसरे मुलकांत सिरतील याकरितां आपले मुलकांत येऊं न पावत अशा बंदोबस्ताकरितां घोडनदीची फलटणें सरहादेवर जात आहेत व श्रीमंतानीं आपले कडील फौज द्यावी असें बोलणें पडलें फौज आधीक ठेवावी असा श्रीमंतांचा मनसबा होता व ठेवीतच होते याजकरितां सरहादेवर आह्मी ही आपली फौज ठेवितों असा रुकार देऊन उघडपणें फौज जमा करूं लागले मालकमसाहेब पुण्यास येऊन मोर दिक्षीत याचे घरीं मेजवानी घेऊन माळव्यांत गेले

१ इंग्रजासी बिघाड करावयाचा आपण आनकुल असावें अशी सातारकर माहाराज यास माहुलीस आणून बोलणें होऊं लागलें आणि माहराजाचे कबिले वगैरे ठेवावयास वासोट्यास जागा तयार केली

आणि माहुलीसच राहिले पुढें कार्तिकस्वामीस जावयाचें असा घाट बोलण्यांत आणूं लागले

१ श्रीमंतानीं गणपतीचा उछाहाही माहुलीसच केला फौज जमवितात यावरून त्याचे मनांत कसे आहे ते समजावे याकरितां आल्पिष्टण साहेब यांचें बोलणें पडलें कीं माहाराजाची स्वारी पुण्यांत येत नसल्यास आह्मीं तेथें येतों त्यावरून पुण्यास भाद्रपदमासीं आले

१ जनरेल इस्मीतसाहेब सरहादेवर जाऊं लागले त्याजबरोबर दोन हजार स्वार बाळाजी लक्षुमण निसबत विंचूरकर याचे पुतणे कुशाबा याजसमागमें देऊन पाठविले इंग्रजी लस्कर दूर जाईल तितके चांगलें असें मनांत होतें

१ तहनामा जाल्यावर पोटसाहेब व मोर दिक्षीत आल्पिष्टण साहेब याजवळ सफाईची बोलणीं बोलत असेत आंतून बापू गोखले याचे आनुमतें इंग्रजासी बिघाड करावा असा निछय करून बापु गोखले याजकडे मुखत्यारी दिल्ही कोट रुपये तूर्त तयारी करितां गोखले याजकडे देविले त्यांणी तोफा व बाण व फौजेची तयारी चालविली व सिंदे होळकर भोसले मीरखान वगैरे बंडवाले सुद्धां यांसी आपले संमतात मिळऊन घेऊन त्यांणींही इंग्रजाशी बिघाड करावा असा नकशा केला धुळपास सांगोन आरमारचे डागडोजीचें काम चालविलें व किल्यावर भरत्या गल्याच्या वगैरे व सिद्धीच्या भरत्या केल्या व गोविंदराव काळे व अन्याबा मेहेंदळे व दादा गद्रे व रात्रोपंत थत्थे वगैरे जे आलोभांत होते त्यांस लोभ दाखऊन सला मसलत त्यांसीं करूं लागले खंडो गोविंद निसबत भोसले यांजबरोबर मुधोजी भोसले यांस वस्त्रें इंग्रज बहादूर याचे सल्यासिवाये गुप्तरूपें पाठविलीं गोविंद केशव कारकून मीरखान याजकडे पाठविला इतकें कारस्थान माहुलीहून सिद्ध करून भाद्रपदमासीं पुण्यास आले

१ श्रीमंतांचें दुर्दैव उभे राहिले यामुळें जे आच्यार कधीं कोणी केले नसतील तसे करूं लागले माहुलीचे वाड्यांत गंगाबाई राजमाची

करीण विधवा बाईको तिचे अंगावर आपला मर्दानी पोशाख जवाहीर घालून तिला गादीवर बसऊन आपण खिसमतगार होऊन चवरी वारूं लागले असे आनेक प्रकारचे वेव्हार होऊं लागले ते कितेक ल्याहावे

१ सिंदे होळकर भोसले यांसीं बाजीराव याणीं कारस्थान केलें परंतु सिंदे याच्यालगत इंग्रजी सरकारची मोठी फौज आली तेव्हां त्याणीं श्रीमंताचा नाद भरल्यानें अगोदर मसलत आपल्यावर पडोन आपण बुडोन जाऊं इंग्रजी सरकारचे लढाईचा आनुभव त्यास पहिला आला होता यामुळें तह करावा असा विच्यार करून सिंदे याजकडील मुखत्यार रामचंद्र भास्कर व कंपिणी इंग्रजबहादूर याजकडील मुखत्यार कपतान लाटूष साहेब यांचे विद्यमानें तहनामा जाहला त्यांतील हसील कलमें

१ उभयता सरकारपैकीं हरयेकानीं आपलाली फौज व आपले शेरिकाची आणखी पदरच्याची फौज पेढार आथवा जितके मुफसदाची जमीयेत आहे त्याजवर तैनात करून त्यास उतरले स्थळाहून बाहेर करून द्यावे आणि त्याचा जमाव फोडून किरकोळ करावे फिरोन त्याचा जमाव होऊं न सके हे गोष्ट आमलांत आणावया कारितां दोनी सरकारी फौज व उभयतांचे शेरिकाचे फौजा समेत पेंढारी याचा व मुफसदाचा पिछा करून हा मतलब पुरता न होये तो पावेतो बसून राहावें याउपरी सिंदे करार कारितात जे पेंढारी सरदाराचे कुटुंबसुद्धां हस्तगत करावयाविसीं सही करून कंपणीसरकार याचे स्वाधीन केले जाईल

१ पेंढारी याची जमीयेत अलिज्याबहादूर याचे मुलकांत व आणखी नजीकचे प्रांतांत राहिली आहे

अनुक्रमणिका

यास्तव करार होत आहे कीं ।सिंदे याचे मुलकांतील जे माहल व परगणे व ताल्लुके पेंढाऱ्यांचे हातांत आहेत, ते त्याजकडून मोकळे होतांच सिंदे यार्णी त्वरित आपले कबज्यांत आणोन मुफसद व पेंढारी वगैरे यांस फिरोन प्राप्त न होत असा बंदोबस्त करावा जे मकान इतर रइसाचे पेंढाऱ्याचे हातांत आहे जर रईस पेंढारी वगैरे यास आश्रा न देई व मिलाफ न करी येथानशक्ती त्याचे बीबूड करण्यास व काढण्यास मेहनत करील तरी तो मकान त्याचे स्वाधीन करून रईसानें शेर्ता लिहिल्याप्रमाणें न केल्यास ते मकान अलिज्याबहादर याचे स्वाधीन केले जाईल ते मकान सदरचे शेरताआन्वये ।सिंदे याचे कबज्यांत राहील

३ अलिज्याबहादर करार करितात जे पेंढारी वगैरे मुफसदास व लुटारी यांस आह्मीं व आह्मांकडील सरदार पक्षपात व आश्रा देणार नाहीं व त्यास खराब करण्यास व बीबूड करण्याविसी आपले मुलकाचे आमलदार व फौजाचे सरदार यासी आज्ञा करून जो कोणी सरकार आज्ञा अमान्य करील तर त्याजकडून बहुत दंड घेतला जाईल याप्रमाणें ताकीद केली जाईल ऐसियास कोणी सरदार आथवा आमलदार हुकूम न मानील तो सिंदे याचा सरलास व कुंपणी सरकारचा दुस्मन तो आपले करतत्वाप्रमाणें फल पावेल

४ आलिज्याबाहादर करार करितात जे आमचे निसबतीचे फौजापैकीं चांगली फौज स्वार पांच हाजार पेंढारी व मुफसद वगैरे यांचे पारपत्यास व स्थळा-

हून काढण्यास तैनात होईल ते इंग्रजी फौजासी मिळोन राहील इंग्रजी फौजाचे सरदाराचे विच्याराप्रमाणें जें करणें तें करीत जाईल व आलिज्याबाहादर आणखी करार करितात जे आपल्याकडील सर्वत्र फौजाचे सरदार व मुलकाचे आहालकार इंग्रजी जमियेतीस जे गोष्टीची जे जिनसाची अगत्य पडेल त्यापैकीं जे सरबरा होऊ सकेल त्याप्रमाणें खुष खरीदी करून आणोन देण्यास तत्पर राहतील यांत अंतर व कसूर पडल्यास उभयता सरकारचा दुसमान आपलें केलें पावेल

५ आलिज्याबहादर करार करितात कीं आपले सरकारची फौज इंग्रजी सरकारचे फौजेस सामील तैनात होईल त्याचा सरंजाम घोडे व जवान चांगले राहतील व फौजास तलब दरमाहा खर्चास आमचे जातीचे व घरमंडळीचे व आहालकाराचे सालिना सरकार इंग्रजा कडून जे मुकर आहेत ते तीन वर्षांपावेतो सरकारदाखल न होतां इंग्रजी फौजाचे तैनातेचे सरदाराचे हातानें आमचे फौजेचे माहेवारींत खर्च होत असावे व सरकार इंग्रज करार करितात जे ऐवज सालियानाबाबत पेंढारी वगैरेचे मोहिमेकडून स्वस्त जाल्यावर फौजाचे माहेवारीचा खर्च जाऊन बाकी जे राहील तो ऐवज सिंदे यास पावता केला जाईल व फौजाचे माहेवारीचे बंदोबस्ताकरितां आलिज्याबाहादर करार करितात कीं इकडील मामला जोतपूर व बुंदीकोटाचे मुलकांत आहे तो दोन वर्षापावेतो एकंदर सरकार इंग्रज यांजकडे गुजारत केला आहे

६ आलिज्याबहादर करार करितात जे बाहेरील स्वार व पायेदल व तोफखाना याचा कुच मुकाम मोहिमे पावेतो सरकार इंग्रज याचे विच्यारा प्रमाणें करण्यास आंतर करणार नाहींत

७ कंपिणी इंग्रज याची जे फौज पेंढारी याचे मोहिमेस तैनात करतील व फौज तूर्त सिंदे याचे शेवेंत सिद्ध आहेत ते पेंढारी याचे पारपत्य करण्यास्तव तहना-म्याचा शेवट करण्याविसीं बहुत आहे आलिज्या-बाहादर करार करितात जे या मोहिमेपावेतो कदीम फौजाखेरीज सरकार इंग्रजाचे विच्यारा सिवाय सहसा ठेवणार नाहीं व आपलेकडील सरदारास ताकीद कीं पेंढारी व दिगर मुफसदाची हिमायत कीव्हा मित्रत्व सहसा न करणें व त्याचे फौजापैकी येकासही आ-पले फौजेंत सहसा जागा न देणें असी केली जाईल जो कोणी सरकार आज्ञा आमान्य करील तो स-रकारचा बागी व कंपणीचा दुस्मान होऊन फल पावेल

८ आलिज्याबाहादर कंपणीसरकारचे वचनावर व श्नेहा वर भरवसा ठेवून करार करितात जे या मोहिमे-कडून स्वस्त होईतोपावेतो हांडे अशरचे किल्यांत सरकार इंग्रजाचे ठाणें करऊन किले मजकूरची सर-कार इंग्रजाकडे गुजास्त करावी व सरकार इंग्रजाचे आहलकार यखत्यार ठेवितात जे नोकरखाना व जकीरा आह्मांस लागेल तो आह्मीं हरदू किलेमज-कुरीं ठेवूं किले अशर येथें झेंडा व येक किलेदार व पनास शिपाई आलिज्याबाहादर यांणीं ठेवावे परंतु अशेर व हांडे दोनी मकानांत सरकार इंग्रजाचा हुकूम चालेल सिंदे याजकडील जकीरा व जंगी

अनुक्रमणिका

सामान हरदू किल्यांत आहे त्याची मुखत्यारी इंग्रजबहादूर याजकडे राहील जोपावेतो किले इंग्रजाकडे राहितील तो पावेतो जर इंग्रजाकडे खर्च होईल किंव्हा नाश होईल तरी ही मोहीम जाल्यावर हिसेबाचे आन्वये जें मोल होईल तें सिंदे यास पावते केले जाईल किले मजकूर इंग्रजाचे कबज्यांत येतील तेव्हां उभयता सरकारचे जकिऱ्याचे आसबाबेचे फेरिस्त करतील सध्या सिपायाचे ठाणें हरदू किल्यांत आहे त्यास अशेरंचे तैनातीचे लोक खेरीज करून बाकी लोकांनीं बाहेर निघोन यावें सिंदे याजकडील पागा वगैरे किलेमजकुरीं आहे त्याणी या आहदनाम्याचे साहावे कलमाप्रमाणें जे ठिकाणीं कुंपिणी सरकार आज्ञा करतील ते ठिकाणीं राहावें हरदू किल्याचे जे माहल आहेत ते पहिल्याप्रमाणें सिंदे याचे आमलदाराकडे राहातील इंग्रजाकडून त्याचे संरक्षण होईल माहलचा ऐवज तहसिलीचा त्यापैकी दरोबस्त अथवा कांहीं लोक सिंदे याणी फौज इंग्रजी फौजेसमागमें तैनात होईल त्याचा खर्च जरूर होईल तर या आहदनाम्याचे पांचवे कलमाप्रमाणें इंग्रजाचे हातानें खर्चीत येईल या मोहिमेकडून स्वस्त जाल्यावर त्याचा वसूल व खर्चाचा वाजवी हिसेब सिंदे यास पावता केला जाईल पेंढारी वगैरे याचे मोहिमेकडून स्वस्त जाल्यावर दोनी किले माहालसुद्धां सिंदे याचे स्वाधीन केले जातील

९ उभयता सरकारचा मुख्य थोरला मतलब कीं हे वर्तणूक लुटीचा निस्तोष जात राहावी व उभयता सरकारास पूर्ण खातरजमा आहे कीं या धर्मकार्याचा

शेवट नीट करण्यास कदाचित सर्वत्र हिंदुस्थानी रईसास सरकार इंग्रजास सामील करून घेणें जरूर होईल यास्तव करार निछय ठरला कीं सन १८०५ इसवीचे सालांतील आठवे कलमांत इंग्रजी सरकारास मनाई सरदारमजकुरासी आहदनामा करण्याची लिहिली आहे तें कलम रद होईल व इंग्रज बहादूर येखत्यार ठेवितात जे उदेपूर व जोतपूर व कोटा व बुंदी येथील राजे व इतर रईस नामांकित ग्वाल्हेरपासून चबलपलीकडील मुलूख आपले हातांत ठेवितात त्यासी करार करतील व हें खरेंच कीं या कलमाअन्वयें कोणे प्रकारें सरकार इंग्रजीचा हक निछय ठरणें प्रांत माळवा व गुजराथ येथील राजे व रईस व ताल्लुकेदार जे सिंदे याजकडील निःसंषय आहेत त्यासी आहदनामा करण्यास्तव होणार नाहीं व आणखी निछय ठरला कीं सिंदे याचा हुकूम पूर्वींपासून मामलेदार वगैरे याजवर चालत आहे त्याप्रमाणें पुढें ही हुकूम बहाल राहील व सरकार इंग्रज करार करतात जे राजे व सरदार सदरीं लिहिल्याअन्वयें उदेपूर वगैरे यासी वचनप्रमाणें होई तर खंडणी मुकरर सिंदे याजकडील राज्याचे मुलुकांत आहेत अखंड बहाल राहील इंग्रजाचे आहालकार आपले विद्यमानें सिंदे याचे सरकारांत दाखल करीत जातील व आणखी सिंदे करार करितात कीं कोणे प्रकारे राजे व सरदार याचे कार्यासमंधी सहसा दखल करणार नाहीं

१० हरदू सरकारासी दुसरे जे सरकार वैरत्व करील व

अनुक्रमणिका

पेंढारी वगैरे मुफसदाची हिमायत व कुमक करील येणेकडून जर त्यासी युध्ये करणें पडेल तरी इंग्रजी सरकार युध्य करून फते पावेल त्यास ध्यानांत जर सिंदे याजकडून या आहदनाम्याचे कलमबदीप्रमाणें आमलांत येईल तर सिंदे यास त्याचा नफा व फायदा व मुलुकाचे बढतीचे अगत्य राखोन श्नेह व मुरबतीचे मार्गें अंमल करूं

११ सरजे आर्जून गावचे आहदनाम्यांत व सन १८०५ इसवीचे सालांतील आहदनाम्यांत या आहदनाम्या-प्रमाणें जे येक गोष्ट लबाड होत नाहीं ते बहाल राहील व हरदू सरकारांत कौल कराराप्रमाणें शेवट करणें लाजम आहे

१२ हा आहदनामा बारा कलमाचा पावला छ ५ माहे नवंबर सन १८१७ इसवी मुंा छ २४ जिल-ईज सन १२३२ हजरी आस्विन वा ११ मुकाम ग्वालेर

या प्रमाणें इंग्रजी सरकारासी तहनामा करून आपला बच्याव करून राहिले भोसले होळकर श्रीमंताचे मसलतीस आनकूळ झाले

१ सदाशिव माणकेश्वर भाद्रपद वा १३ छ २६ जिलकादीं मृत्य पावले त्याणी दत घेतले त्यांचे नाव लक्षुमणराव सदाशिव ठेवले

१ श्रीमंताची स्वारी पुण्यांत आल्यावर आलपिष्टण साहेब याची गाठ पडोन एकटेंच श्रीमंताचे त्याचे बोलणें झाले त्यांत सफा-ईच दाखविली

१ विनायकनाना श्रौती व वामनभट करवे व शंकराचार्य स्वामी असे इंग्रजी फलटणांत फितुर करावा असी मसलत श्रीमंतास देऊन त्याजपासून ऐवज घेऊन फितुर करावयास लागले

अनुक्रमणिका

१ दसऱ्याचे दिवशीं श्रीमंताची स्वारी सीमा उलंघनास गेली तेव्हां स्वारी जाताना सालाबादप्रमाणें इंग्रजी फलटणें व आलपिष्टण साहेब सलामास उभे होते त्या काळीं साहेबाकडे पाहिलें नाहीं बापू गोखले खवासींत होते त्यासी बोलत होते नंतर साहेबानी घोडे पिटून पुढें जाऊन फिरोन सलाम केला नारो विष्णु आपटे आपली फौज व बाणाच्या कैच्या असे जमेतीनें फळटणची लैन उभी राहिली होती त्याचे अंगाजवळून जाऊं लागले तेव्हां फळटणें मागें हटलीं नंतर स्वारी फिरोन येताना फलटणाकडून यावी त्याणी सलामीच्या तोफा माराव्या असी चाल असतां तिकडून स्वारी आली नाहीं परभारें जातो ह्मणोन विटोजी नाईक याजबरोबर सांगोन पाठविलें

१ गारपिरावर इंग्रजी फलटणाची छावणी होती त्याचे लगत आस्वीन वा। ४ बुधवारीं छ १७ जिल्हेजी गोसावी वगैरे लोक उतरविले त्याजवरून करनेल बारसाहेब याणीं फलटणचे छावणींतून बाहेर काढून तयार होऊन बाहेर उभे राहून आलपिष्टणसाहेब याजकडे सांगोन पाठविले त्याणी पोटसाहेब यास श्रीमंताकडे पाठवून सांगोन पाठविले कीं हरदू सरकारची दोस्ती झाल्यापासून सुरळीत चालत होतें हलीं दस्तुर सोडोन काम होऊं लागलें याणें दोस्तींत खलेल येईल दोन फौजा दोस्ताच्या असल्या तत्रापि केवळ जवळ उतरत नाहींत असा सांप्रदाय आहे याजकरितां फौज तेथून काडावी तसी मर्जी नसली खामाखाम बिघाड करावा असीच मर्जी असली तर तें तरी करावे इंग्रजी सरकारचे सोजेर लोकाचे फलटण मुंबईहून येत आहे ते येऊन पोचलें नाहीं तोंपावेतों माहाराजाचे फौजेची फते झाली तर होईल असें सांगोन पाठविलें व संगमावरील मडमा वगैरे दापुडीस पाठविल्या श्रीमंताकडून गोडीचेंच बोलणे आले त्यावरून मडमा वगैरे खटले संगमावर आणविले आणि फलटणचे लोक संगमावर कांहीं जाजती आणऊन बाकीची फलटणें तशींच बाहेर मुकाम करून राहिली नंतर शेनवारीं आस्वीन वा। ७ छ २० जिल्हेजीं सोजराचे फलटण मुंबईहून

आले तें गारपिरावर उतरलें श्रीमंताचे लोक जवळ आहेत माणसाचा माणसानसीं खटका होईल हें चांगलें नाहीं असें आलपिष्टणसाहेब याणीं मनांत आणोन फलटणें गारपिरावरची छावणी सोडून खडकीनजीक आस्वीन वा ९ रोज सोमवारीं छ २२ जिल्हेजीं आणऊन मुकाम केला दसऱ्याचे दिवशीं नारो विष्णु फलटणाचे जवळून जाऊं लागले सबब लैन मागें हटली व गारपिराजवळ लोक गेले तेव्हां फलटणें छावणीतून बाहेर निघोन खडकीवर गेलीं त्याजवरून भिऊं लागले असा निछय श्रीमंताचा होऊन जे बदसला देत होते त्यांचे बोलण्यावर भरवसा जाला

१ आस्वीन वा ८ रविवारीं शाहासाहेब संगमा वरून मुंबईस जात असतां गणेशखिंडीजवळ दिवसास श्रीमंताकडील स्वारानी भाला मारून त्यास जखमी करून घोडा नेहला नंतर त्यास संगमावर आणून श्रीमंताकडे परशरामपंत सावरकर याजबरोबर सांगोन पाठविलें परंतु त्यांणीं परत जाब येऊन सांगितला नाहीं त्याजवरून बाळाजीपंत नातू यास पाठविलें तेव्हां श्रीमंताकडून मोर दीक्षीत व बाळोबाबावा शुक्रु-वारचे वाड्यांत खालीं बोलण्यास आले ते चाल सोडून बोलूं लागले कीं जखम लागली ही खरी कशावरून आह्मीं तबीबापासून चौकशी करूं कोणी भाला मारिला हें ठिकाण कशावरून लागेल तेव्हां बाळा-जीपंत बोलले कीं आजपावेतों इंग्रजी सरकारचे बोलण्याचा भरवसा होता आता या बोलण्यावरून दिसत नाहीं त्यास माहाराजाची मर्जी असेल तसें उत्तर सांगावें त्याप्रमाणें साहेबास अर्ज करीन त्यावरून विठोजी नाईक गाईकवाड यास कोठे भाला मारिला यांचे चौकशी-करिता पाठविलें ते संगमावर येऊन गणेशखिंडीकडे गेले तो फिस्तु-लाची घरें सापडलीं नंतर साहेबाकडे येऊन माघारे श्रीमंताकडे गेले विश्रामसिंग ह्मणोन स्वार श्रीमंताचे हुजूर होता त्याणें भाला मारिला असें लोक बोलत होते

१ खांदेरी किला आंगरे यांजपासून चिटी लिहून घेऊन

त्याचे जिमेस ठेविला व कोंकणचे अवचितगड वगैरे किले बाबाजी बिवलकर याजकडे सांगितले व घाटबंदीचे काम त्याजकडेच सांगितलें

१ बापू गोखले याचे मनांत फलटणांत फितूर जाला आहे त्यापेक्षीं आपली फते होईल व फलटणें थोडीं आहेत तीं बुडवावीं आलपिष्टणसाहेब यास जाग्यावर गर्दी करावी असा मनांत निछय करून पटवर्धन याची फौज जवळ आली होती त्याजकडे सांडणी-स्वार पाठविला त्यास जलद आणविले व निपाणकर यासही आणविले पटवर्धनाची फौज येऊन पोचली निपाणीकर पोचले नाहींत घाटबंद्या केल्या व डाका उठवावयाविसीं माहलोमाहलीं ताकीद केली व मुंबईकडून कोणी येऊं न पावे याजकरितां स्वार पाठविले आणि आस्वीन वा। ११ बुधवार छ २५ जिल्हेज तारीख ५ सपटंबर सन १८१७ या रोजी सकाळीं बापू गोखले जातीनें फौजेंत जाऊन फौजेची हुशारी केली त्यामुळें पुणें शहरांत आवाई पडोन लोक भयाभीत होऊन लोकांनी दुकानें व दरवाजे लाविले नंतर फौज पर्वतीस स्वारी जाणार या बहाण्यानें तयार होऊन वाड्याजवळ आली व जागजागा आपापले गोटातून तयार जाले श्रीमंताजवळ शुक्रवारचे वाड्यांत बापू गोखले वगैरे जमा होऊन बि-घाड सांगोन पाठविण्याकरितां विठोजी नाईक गाइकवाड व परशराम-पंत सावरकर यास आलपिष्टणसाहेबाकडे पाठऊन आपण फौजसुद्धां फौजेंत परवतीस गेले गाइकवाड सावरकर याणीं साहेबाजवळ सांगि-तले कीं खडकीनजीक लस्कर उतरलें आहे तेथून काढून माजरीस जावे व गोऱ्याचे फलटण आहे तें पुण्याजवळ राहूं नये घोडनदीस जावें इंग्रजी सरकारचे दोस्तीकरितां जें ह्मटले ते आह्मी ऐकत गेलों हें साहेबांनी एकावें आलपिष्टणसाहेब बोलले कीं हे बोलणें दस्तुर सो-डून आहे याचा जाब काये द्यावा तेव्हां गाइकवाड बोलले कीं हे जर होत नाहीं तर महाराज आपले फौजेंत जातात तेव्हां साहेब बोलले कीं माहाराज आपले फौजेंत जात असल्यास आमचे येथें काम काये आह्मी ही आपले फौजेंत जातों याप्रमाणें विठोजी नाईक याचे बोलणें

होऊन ते मांघारे गेले ते श्रीमंतापासी पोचावयापूर्वीं श्रीमंत बमय फौज पर्वतीस जाऊं लागले तों पानशाचे वाड्याजवळ जरीपटक्याचा भाला मोडला मग दुसरा घालून पुढें गेले सारी बायका मंडळी सुद्धां दरोबस्त पर्वतीस गेले विठोजी नाइकाचे बोलणें होऊन ते संगमावरून जात तोंच श्रीमंताची तयार होऊन संगमाजवळ पोचली इतकियांत आल-पिष्टणसाहेब यांणीं फलटणाचे लोक तयार करून बाहेर आले तो फौज वाकडे याचे बागेच्या अलीकडे पोचली खडकीचा रस्ता बंद जाला तेव्हां आलपिष्टणसाहेब नदी उतरून खडकीचे पुलावरून खडकीकडे गेले संगमावरील सामान सरकारी व रयतेचे व चाकर लोकांचे दरोबस्त लुटलें गेलें इतकियांत फौज व तोफा श्रीमंताकडील तयार होऊन गणे-शखिंडीनजीक पोचल्या तें पाहून फलटणें खडकीवरून निघोन पुढें गेलीं त्यांत आलपिष्टणसाहेब जाऊन पोचले पांच गोळे श्रीमंताकडून आगोधर सुटल्यावर मग लढाई सुरू जाली श्रीमंताचे फौजेचा मोड जाला मोर दिक्षीत मराठे व पांडुरंगपंत सहस्रबुद्धे निसबत चिंतामण-राव पटवर्धन व कासीराव कोकरे याचे चिरंजीव ठार जाले व आणखी लोक मेले व घोडी पडलीं तोफा व फौज श्रीमंताकडील पळोन माघारे सरून गणेशखिंडीचे लगत राहिले इंग्रजी सरकारची फौज रात्रीस खडकीवर माघारी गेली संगमावरील बंगले श्रीमंताकडील लोकांनीं जाळले

१ मुंबईहून दोन साहेब सरदार येत होते त्यांस बिघाड जाला हें ठाऊक नाहीं सबब वडगावाहून तळेगावास येत होते त्यास बाबा-जीपंत गोखले फौज घेऊन मुंबईचे वाटेचे बंदोबस्ताकरितां गेले होते त्यांणीं सरदारांस धरून फासी दिल्हे व दोन सरदार हैदराबादेकडून पुण्यास येत होते त्यास उरलीस धरून कोंगारीख कैदेंत ठेविले तेथून काढून वासोट्यावर नेऊन ठेविलें जनरेल इस्मीतसाहेब लढाईचे वर्त-मानाचे पत्र पावलें नाहीं परंतु डाकेचे पत्र पोचणार नाहीं ते दिवसीं पुण्यास बिघाड जाला असे समजावे असा इसारा होता त्यावरून डा-केचे पत्र पावलें नाहीं इंचूरकराकडील फौज तैनातेस होती त्यांस सांगि-

तलें कीं पुण्याकडील वर्तमान पुर्ते समजत नाहीं परंतु बिघाड जाला असें दिसतें याजकरितां तुह्मीं लस्करांत राहूं नये निघोन जावें ह्मणोन सांगोन त्यास लाऊन देऊन आपण माघारे येऊं लागले त्याचे तोंडा-वर नारोपंत आपटे फौज घेऊन गेले त्याणी वाटेनें इंग्रजाचे बंगले होते ते जाळले इस्मितसाहेब याची फौज येऊन पोचू नये असें श्रीमंताचे मनांत होतें परंतु इंग्रजी फौजे पुढे याच्याने कांहीं जालें नाहीं फौज खंडेरायाच्या माळावर येऊन पोचली अकलकोटकर सरदार नारो-पंत आपटे याजबरोबर होता तो ठार पडला आपटे याणी लस्करचे बैल कांहीं आणले

१ कार्तिक शुा ६ शुक्रवारीं रात्रीस इंग्रजी फौज छापा घाला-वयाकरितां तयार होऊन नदींत आली परंतु तोफा जाण्यास मार्ग नाहीं सबब माघारे गेले

१ कार्तिक शुा ८ रविवार छ ६ मोहरमी येलवाड्यावर श्रीमं-ताकडील फौज आरब व गोसावी होते व बापू गोखले फौजेसुद्धां होते इंग्रजी सरकारची फलटणें चालून आली त्यांची मारागिरी भारी जाली आरब व गोसावी कांही मारले गेले बाकी फौज पळून माघारी आली श्रीमंत त्याच वेळेस रात्रीं निघोन आपासाहेब सुद्धां सासवडास गेले फौजा झाडून उधळल्या दुसरे दिवशीं गोखले वगैरे फौजा जमा होऊन सासवडास गेले तेथें राहून कांहीं जाबसाल करावा असें श्रीमंतांचे म-नांत होतें परंतु भोसले होळकर शिंदे यांचा भरवसा होता व बापू गोखले याचा ही रुकार न पडे सबब श्रीमंत फौजसुद्धां पुढें माहुलीस गेले इंग्रज बहादर यांणीं शेहरांत शेनवारचे वाड्यांत झेंडा कार्तिक शुा ९ सोमवारीं लाऊन शेहरचे लोक हवालदील होऊन पळों लागले त्यांस दीलभरवसा देऊन वाणी उदमी सावकार वगैरे सर्व रयतेचा बच्याव केला पुण्याचे कामावर राबिसनसाहेब यास ठेविले आणि आल-पिष्टणसाहेब व इस्मितसाहेब फौज घेऊन श्रीमंताचे पाठलागास गेले

१ पटवर्धन निपाणीकर रास्ते वगैरे जाहगीरदार यांस पत्रें पाठविलीं कीं श्रीमंतांनीं कांहीं कारण व जाबसालाची तकरार नसतां इंग्रजी सरकारासीं बिघाड केला त्यामुळें सरदार लोकांचे नुकसान व्हावें असें सरकारचे दिलांत नाहीं याजकरितां आमेहरबानानीं आपले जाग्यावर राहावे ह्मणजे लढाईपावेतो चालत आहे तसें चालेल

१ करवीरकर माहाराज यासही सदरहूप्रमाणें पत्र गेलें ते दोस्ती राखोन आपले जाग्यावर कायम राहिले

१ श्रीमंत पुढें मागें इंग्रजी लस्कर याप्रमाणें फिरत होते श्रीमंतास निपाणकर कोरेगावकर येऊन भेटले वासोट्यास सातारकर माहाराज यांस ठेविले होते त्यांस आणावयाकरितां श्रीमंतांनीं नारो विष्णु यांस स्वार सुद्धां पाठविलें त्याणीं जाऊन माहाराजांस गारदवडे जवळ लस्करांत आणलें श्रीमंताच्या माहाराजाच्या भेटी जाल्या नंतर त्रिंबकजी डेंगळा फौजसुध्दां नारायणगावांस येऊन श्रीमंतास भेटोन लस्करांत उघडपणें राहिला श्रीमंत ब्राह्मणवाड्याकडे गेले त्यावरून इंग्रजी फौज घोडनदीकडून नगरावरून संगमनेरावर गेली बापू गोखले याचा पुत्र ब्राह्मणवाड्यास वारला त्याची स्त्री सती गेली यामुळें मुकाम होते इंग्रजी लस्कर संगमनेराकडून आलियाची बातमी लागल्यावरून माघारे फिरोन फुलगावास आले पुण्याकडून घोडनदीवर सरंजाम जात होता तो वाघोलीस गेला त्याजवर नारो विष्णु फौज घेऊन गेले तेथे गोळागोळी जाली पटारा सिलेदार नारो विष्णू कडील तेथें पडला व घोडीं व लोक जखमी ठार जाले घोडनदीकडून फलटणचे लोक च्यार पांचशें पुण्यास येत होते त्यांस श्रीमंताचे लश्कर फुलगावावर आहे ही बातमी नवती व श्रीमंतास ही त्यांची बातमी नवती कोरेगावाजवळ येतांच श्रीमंताकडील फौजेनें पाहून सारी फौज तयार होऊन त्याजवर गेली ते गावांत सिरले आणि लुटूं लागले त्याणीं फार मारगीर केली श्रीमंताचे मोठे लस्कर असता इलाज चालला नाहीं फलटणचे फार मेले इतक्यांत इंग्रजी लस्कर ब्राह्मणवाड्याचा घाट चढोन चाकणेकडे आल्याची बा-

तमी श्रीमंतास लागल्यावरून फौजसुद्धां निघोन बोरघाटानें राजवाडीस गेले फलटणचे लोक जे शाबूद होते ते जमेतीनें निघोन घोडनदीस गेले श्रीमंत पाडळीस गेले इतकियांत करनाटकाकडील जनरेल फ्रिजलरसाहेब फौजसुद्धां आले ते सालप्याचे घाटानें चढोन गेले पाडळीवरून श्रीमंत निघोन पुढें गेले ते गोकाके कडून फिरून मिरजेकडोन सातारियास आले फ्रिजरेलसाहेब त्याचे लस्कर त्याचे मागें होतें तें दूर राहिले इतकियांत इस्मितसाहेब याचें लस्कर आथणीजवळून श्रीमंताचे पिछयावर येत होतें तें सातऱ्यानजिक येऊन पोचताच श्रीमंत आदरकीचे घाटानें पळोन गेले इतकियांत इस्मितसाहेब याचे फौजेची व गोखले याचे फौजेची गाठ नादगिरीजवळ पडली तेथें गोखले निपाणकर त्रिंबकजी सुद्धां होते त्याजवर गोळे मारल्यावरून सारी फौज पळोन गेली इंग्रजाचे लस्करचा मुकाम देवरावर जाहला तों गोखले चेदनवंदनचे अंगानें फौजसुद्धां जाऊं लागले त्याजवर तुरुप स्वार जाऊन बुणगे लुटून आणिले गोखले पळोन गेले नंतर इस्मितसाहेब कणेदावर गेले तेथें पुण्याकडून करणेल बेलसाहेब याचे लस्कर मोठ्या तोफासुद्धा येऊन पोचल्यानंतर फ्रिजरेलसाहेब याचे लस्कर पुढें सावळीकडे आलें याजकरितां आलपिष्टणसाहेब व इस्मितसाहेब सारी फौजसुद्धां रहिमतपुरावर गेले तेथें फ्रिजरेलसाहेब यांच्या भेटी होऊन सातान्यास सारे फौजसुद्धां आले तेथें छ ४ राकर माघ शुा ५ सातारा किला घेऊन पहिल्यानें इंग्रजी निशाण चढवून लागलेच माहाराज याचे निशाण लाविलेवर इंग्रजी सरकारची फौज राहिली आणि माहराजाकडील विठलपंत माहजनी व सिरके वगैरे लोक यास खर्चास व वस्त्रें देऊन त्यांस माहराज लौकरच येतील असें सांगोन सातारा शेहरचे रखवालीस लोक ठेवण्याकरितां विठलपंत यास ऐवज दिल्हा व बाजीरावसाहेब याचा जाहिरनामा केला कीं:—जाहिरनामा सरकार दौलतमदार कंपणी इंग्रज बहादूर सुरुसन समान अशेर मया तैन व अलेफ तमाम लोकांनी जाहिरनामा समजोन त्याप्रमाणें वर्तणुक करावी

याजकरितां लिहिलें जातें जे बाजिरावसाहेब राज्यावर आल्यापासून नाना प्रकारचे बखेडे व बंडें होत होतीं राज्यांत व मुलकावर हुकमत कधींही चालली नाहीं पुढें होळकर याचा दंगा जाहला तेव्हां राज्य सोडून पळोन वसईस जाऊन खंडेराव रास्ते याचे मदतीनें गुदराज करुन राहिले नंतर कंपणी सरकारची दोस्ती केली त्याजवरुन कंपणी सरकारची फौज येऊन बाजीरावसाहेब यास गादीवर बसऊन तमाम बंडे व बखेडे होते ते मोडून मुलकांत बाजीरावसाहेब याचा हुकूम सुरळीत चालू करुन दिल्हा पहिल्यानें दंग्यामुळें व पुढें दुष्काळ पडला त्याणें मुलूख बहुतेक उद्वस्त जाला होता तो कंपणी सरकारचे भरवसियावर आबाद जाहला बाजिरावसाहेब याणी मामलती मखत्यानें लाविल्या ते मखत्येदार रइतेपासून जाजती ऐवज घेत गेले तत्राप बहुत आबादी जाहली जे मुलकाचा ऐवज जमा जाहला त्याजवर बाजीरावसाहेब याणीं दौलतीचा खर्च व आयषअराम करून खजिना बहुत जमा केला मराठे सरदार याजवर बाजीरावसाहेब यांचा दाब बहुत दिवसापासून नवता तो लागू करावा असे कंपिणी सरकारांतून कबूल केले नवतें जे वाजवी असेल ते चालतें करून द्यावे असी कंपणी सरकारची खायश होती त्याजवरून गाइकवाड याजकडील जाबसाल ठरवावया करिता गाइकवाड याणी आपले कारभारी गंगाधर शास्त्री यासी कंपणी सरकारचे बाहेदारीवर पुण्यास पाठविले ते येऊन बहुतेक जाबसाल लौकर उलगडावा असे जाले होते त्यांत बाजीरावसाहेब याची किफायत बहुत होती इतक्यांत गंगाधरशास्त्री यास बाजीरावसाहेब याचे कारभारी याणीं पंढरपुर क्षेत्रीं मारिलें त्या वेळेस तमाम रयत व यात्रेकरू वगैरे ह्मणत होते कीं शास्त्री यासी त्रिंबकजीनें बाजीरावसाहेब याचे हुकुमासिवाय मारिले नाहीं असे असता बाजीरावसाहेब दोस्त मोठे दौलतदार असे करवितील हा गुमान मनांत न आणितां ज्या त्रिंबकजीनें मारिलें त्यास हावालीं करून घ्यावा असा कंपणीसरकारचा विच्यार होऊन त्रिंबकजीस हावाली करावा असें बोलणें पडलें

अनुक्रमणिका

तेव्हांच हावालीं करावा तो न केला याजकरितां कंपणी सरकारची फौज बहुत जमा जाहली नंतर त्रिंबकजीस हावालीं केला त्या समई कंपणी सरकारास खर्च बहुत जाला तो दोस्तीवर नजर देऊन न मागतां त्रिंबकजीस हावाली करून घेतला आणि दोस्ती पहिली चालत होती त्याप्रमाणें कायम ठेविली नंतर बाजीरावसाहेब याणीं बाहेरचे सरदार यासी पत्र पाठऊन त्याची फौज तयार करावी असी तजवीज केली व आपले राज्यांत बंड उभे करून बंडाचे कुमकेकरितां आपली फौज तयार करून कंपणी सरकारासी लढाई पडावी आणि नुकसान व्हावें असी तजवीज करूं लागले त्याजवरून बखेडा मोडावा याजकरितां कंपणी सरकारची फौज तयार होऊन पुण्यास आली आणि बाजीरावसाहेब यासी शेहराभोवती तंबी केली त्या वेळेस बाजीरावसाहेब हातीं सापडले होते व मुलकाचा बंदोबस्त करावयाजोगी कंपणी सरकारची फौज बहुत तयार होती परंतु तहनामा झाल्यापासून हरवक्त बाजीरावसाहेब यांचे बोलणें पडत होते जे आह्मास राज्य प्राप्त जाले व आह्मीं आयषअराम करितों हें सर्व देणें कंपणी सरकारचे आहे आमचा शुकरगुजारा कंपिणी सरकारचे भरवसियावर होत आहे असे बहुत तऱ्हेनें बोलत होते याजकरितां गादी कायम ठेऊन पुढे त्याचे हातून फिसाफ न व्हावा याजकरितां वसईचा तहनामा कायम ठेऊन नवा तहनामा जाहला पाच हजार स्वार व तीन हजार पायेदळ मदतीस देत जावें असा बाजीरावसाहेब याचा पहिलाच करार होता ती फौज कंपणी सरकारांतून ठेवावी असें होऊन फौजेचे खर्चास मुलुक लावून दिल्हा तेव्हापासून दोस्ती पहिल्याप्रमाणें चालली नंतर पेंढारी चौकडे रयतेस दरसाल उपद्रव कारितात त्यांत बाजीरावसाहेब याचे मुलकास बहुतच उपद्रव होता याजकरिता पेंढारी याचा बंदोबस्त व्हावा असी कंपणी सरकारांतून तजवीज जाहली तेव्हां बाजीरावसाहेब याचे बोलणें पडलें जे पेंढारी याचा बंदोबस्त जाल्यानें आमची बहुत किफायत आहे आह्मीही फौज सामील देतों असें खातरजमेने बोलले त्या बाहाण्यानें कंपणी सरकारचे आश्र-

यावर जो खजिना जमा केला होता तो ऐवज बाहेरचे सरदारास पाठऊन त्यास बिघडविलें व आपली फौज तयार केली कंपणी सरकारची फौज जवळ होती ते दूर जावी याकरिता दोन हजार स्वार कंपणी सरकारचे फौजे बरोबर देऊन फौज दूर गेली असी संधी पाहून येकायेकी काही कारण व जाबसालाची तकरार नसता फौज तयार करून चालून येऊन कंपणी सरकारचे फौजेसी लढाई केली व कोणत्याही चाल नाही तसी चाल करून इंग्रजी वकिलाचे बंगले व छावणीची जागा लुटून जाळली व कंपणी सरकारचे मुलूकची रयेत व वाटसरू सल्याचा भरवसा धरून येत होते त्यास धरून कैद केले व कितेक लुटले व दोन इंग्रजी सरदार मुंबईकडून येत होते त्यास तळेगावाजवळ चोराचेही पारपत्ये करात नाहींत त्या तऱ्हेनें मारिले ते मारणार अद्यापि चाकरीवर आहेत त्याजवरून बाजीरावसाहेब याचे हुकमासिवाय मारिले नाहींत असा निछय होतो व ज्या त्रिंबकजीनें गंगाधरशास्त्री यास मारिले त्यास जवळ आणून कारभारांत वागऊं लागले त्यावरून बाजीरावसाहेब याचे हुकमासिवाये त्रिंबकजीनें शास्त्री यास मारिले नाहीं असें पहिल्यापासोन लोक बोलतात तो मुद्दा शाबूद करून घेतला व पेंढार बोलाऊन मुलूख लुटवावा असी तजवी करू लागले या तऱ्हेचे दौलतदारीचे सांप्रदाय सोडून वतर्णूक करून कंपणी सरकारास बुडवावे असे केले त्यावरून कंपणी सरकारांतून निछये जाला जे बाजीरावसाहेब या राज्याचे उपयोगी नाही याजकरितां त्यास बिलकुल राज्यांतून काढून कंपणी सरकारांतून मुलूख व किले काबीज करून अंमल करावा असी तजवीज होऊन येक सडी फौज बाजीरावसाहेब याचे मार्गे रवाना करून येक फौज किले घ्यावयाकारिता जात आहे व दुसरी येक फौज आमदानगराजवळ येऊन पोचली आहे व येक मोठी फौज खानदेशांत आली आहे व जनरेल मनेरासाहेब कर्नाटकाचा बंदोबस्त करीत आहेत व मुंबईकडून फौज येऊन कोकणचे किले घेऊन त्या प्रांताचा बंदोबस्त होत आहे आतां थोडे दिवसांत बाजीरावसाहेब याचा ठिकाण

नाहीं असें होऊन माहराज छत्रपती सातारकर बाजीरावसाहेब याचे कैदेंत आहेत त्यास सोडऊन घेऊन मोकळे करून त्यांचे व त्यांच्या मंडळीचे शानशौकती करितां कांही राज्य त्याजकडे चालेल असी तजवीज कंपणी सरकारची होऊन सातार किल्यावर माहराज याचा झेंडा काइम करून त्याचे तर्फेचे लोक होते त्याची खातरी केली आहे त्यास जो मुल्ख माहराज याजकडे होईल त्यांत न्याय इनसाफ व हुकमत व अंमल ते करतील कंपणी सरकारांत मुल्ख राहील तेथें सरकारचा अंमल होईल परंतु कोणाचे वतनास व इनामास व वर्षासनास व देवस्थानचे खर्चास व खैरातीस व कोणाचे ज्ञातीचे धर्मास खलेल न होता वाजवी असेल तसें सुरळीत चालेल व बाजीराव साहेब मखत्येदारास मामलती देत होते ते महकूब होऊन कमावीसदार याजकडे मामलती सांगोन जो वाजवी ऐवज असेल त्याचीच उगवणी होईल कोणावर जुलुम जाजती कांही येक होणार नाहीं येविसी कोणीही अंदेशा घेऊं नये बाजीरावसाहेब याजकडे जे चाकरीस असतील त्याणी चाकरी सोडून आजपासून दोन महिन्यांत आपले घरीं यावें जे कोणी न येतील त्याचे वतन जफ्त होऊन खराबी जाहल्यासिवाय राहणार नाहीं. जमेदार याणी आपापले परगण्यांतील जे कोणी बाजीरावसाहेब याजकडे चाकरीस असतील त्याची नावनिसीवार याद तूर्त समजवावी व चाकरी सोडून जसजसे घरीं येतील ते वेळेस समजावीत जावें. बाजीरावसाहेब याची कुमक करूं नये व त्याजकडे वसूल येकंदर देऊं नये न दिल्यास सालमजकुरी मुलकास उपद्रव लागला आहे त्याची दरयाफ्ती होऊन सूट मिळेल बाजीराव साहेब याजकडे वसूल दिल्यास तो ऐवज मजुरा न देता दरोबस्त ऐवज घेतला जाईल व जे जमीदार कुमक करतील व ऐवज देतील त्याची वतनें व जमिनी त्याजकडे चालणार नाहींत लस्करवाले व हरयेक जे कोणी मुल्ख लुटतील व वाटा मारतील ते जिवानिशी गेल्या-

अनुक्रमणिका

शिवाय राहणार नाहीं तारीख ११ माहे फेबरवारी सन १८१८ इसवी मुा छ ५ राकर

यामप्रमाणें जाहिरनामा केला आणि सारे लस्करपैकीं सडी फौज तुरुक स्वार घेऊन इस्मितसाहेब बाजीरावसाहेब याचे मागे गेले बाकी फौज मोठ्या तोफासुद्धा आलपिष्ठणसाहेब व जनेरल फ्रिजरेलसाहेब किले घ्यावयाकरितां सिंहेगडास आले सिवापुराकडून कल्याणदरवाज्या खालीं लस्कर उतरोन मोरचे किल्यास दिल्हे

१ इस्मीतसाहेब याचें लस्कर श्रीमंताचे मागें जावयाचें बातमीवर श्रीमंत निघोन सोलापुरास गेले तेथे सदाशिवपंत भाऊकडील आबा पुंडले मामलेदार व मल्हारराव बाजी वगैरे मंडळीस कैद करून त्याचा ऐवज धोत्रीस होता तो काढून किल्यांत विसाजी देवराव यास ठेवून फौजसुद्धां टेंभुरणीकडून गोपाळाच्या आष्टीवर मुकामास गेले ती बातमी इस्मितसाहेब यास वेळापुरास समजली तेथून रातोरात जाऊन माघ शुा १४ सह पोर्णिमा शुक्रवारी छ १२ राकरी जाऊन दोन गोळे श्रीमंताचे लस्करावर मारिले श्रीमंतास बातमी नवती त्यामुळें हवालदील होऊन पळो लागले बापू गोखले तयार होते ते पुढें आले त्यास गोळ्या लागून ठार जाले आनंदराव बाबर गोविंदराव घोरपडे त्याजबराबर पडले व आणखी काही लोक पडले व जखमी जाले बुणगे श्रीमंताचे लुटले गेले श्रीमंत निघोन गेले सातारकर माहराज यास इसारा होता त्यावरून ते मागे राहिले त्यास इस्मितसाहेब याणी आपले लस्करांत आणून मुकाम केला नंतर त्याची व आलपिष्ठणसाहेब याची भेट करावयाकरिता माघारे बेलसरावर आले

१ सिंहगड किला दिवस लढला नंतर छ २३ राकर माघ वा ९ रविवारीं सर करून फौज फ्रिजरेल साहेब याजबराबर पुरंदरास पाठऊन आलपिष्ठणसाहेब माहराजाचे भेटीकारिता थोडीसी सडी फौज घेऊन गेले छ २५ राकरी माहराजाच्या व त्याच्या भेटी होऊन माहराज आलपिष्ठणसाहेब याचे लस्करांत आले इस्मीतसाहेब श्रीमंताचे

मागे गेले आलपिष्टणसाहेब माहराज यास घेऊन जेजोरीस जाऊन सिरवाल्यावर गेले तेथें फिजरेलसाहेब लस्करसुद्धां आले त्यासुद्धां पुरंदराखालीं आले सासवडास आबा पुरंदरे याचे वाड्यांत लोक होते त्याणी गोळे मारिले सबब त्याची हत्यारे घेऊन त्यास काढून दिल्हे नंतर पुरंदर किला घेतला

१ मुंबईकडून फौज घेऊन कोकणचे किले सर केले व जनरेल मनेरासाहेब कर्नाटकातून फौज घेऊन येऊन बदामी बागलकोट बेलगाव वगैरे किले घेऊन तिकडील बंदोबस्त संस्थानीक सुद्धां केला

१ मानाजी आंग्रे मृत्य पावले त्याचे पुत्र सेधोजी आंग्रे यास श्रीमंतानीं पळत फिरत असतां वस्त्रें पाठविलीं

१ भोसले याणी जनकीनसाहेबासी लढाई करावयाचा मुलाह्म नसता बाजीरावसाहेब याचे संकेतावरून आपण होऊन चालोन जाऊन लढाई केली जनकीनसाहेब याजवळ थोडी जमेत असतां हाला केलियामुळें भोसले सिकास्त जाले नंतर बोलणे लाविले आणि पळोन जावयाची तजवीज केली ही बातमी समजतांच कैदेंत ठेवून प्रयागास रवाना करीत असता मार्गांत पारा फिताऊन रात्रीस पळोन गेले रघोजी भोसले याच्या बायका वगैरे याचा बच्याव इंग्रजानी करून त्याचे मांडीवर दत्तपुत्र गुजरकन्येचा देऊन त्याचे नांव रघोजी भोसले ठेऊन त्यास अधिकार देऊन इंग्रजी सरकारचे विच्यारें संस्थान चालविलें

१ येशवंतराव होळकर याचा लेक मल्हारराव याणी बाजीराव साहेब याचे संकेतावरून माळवे प्रांतीं मालकमसाहेब यासी लढाई केली त्या लढाईंत होळकर सिकस्त जाले मलमसाहेब याणीं त्यासी सहनामा करून बंदोबस्त केला

१ गोपाळराव मुनसी मार्गशीर्ष शुा। ७ छ ५ सफर मुकाम वाई येथे मृत्य पावले

अनुक्रमणिका

शके १७४० बहुधान्यनाम सवत्छरे सुरू तिसा आशेर मया तैन व आलफ सन १२२८ संवत १८७५ राजशक १४५ इसवीसन १८१८ व १८१९

(१) वासोट्या किल्यावर माहाराज सातारकर याचे कबिले होते व इंग्रजी दोन सरदार बाजीराव साहेब याणी कैदेत ठेविले होते त्याची बरदास्त किलेदार भास्करपंत मराठे होते त्याणी चांगली राखली होती याजकरिता आल्पिष्टण साहेब याणी त्यास माधवराव सहस्त्रबुधे याजबरोबर पत्र पाठविले की तुह्मी लढाई केल्यासिवाय किला हावाली केल्यास तुमचे हुकमतीप्रमाणें बंदोबस्त होईल असे पाठविले तो लाखोटा किल्यावर पाठविला तेव्हा सारे लोक मिळोन निश्चय केला की इंग्रज पत्र पाठवितात त्यात जादू असते याकरितां लाखोटा फोडू नये असे ठरविल्यावरून लाखोटा माघारा पाठविला नंतर फौज तोफा जाऊन जुन्या वासोट्यावर तोफ चढऊन मारगिरी केली तेव्हां किल्यावरचे लोक याणी मसलत केली कीं इंग्रज गाईचे रक्तात गोळा भिजवून मारतात यामुळें त्याची फत्ते होते याजकरितां आपण गाढवाचे रक्तांत गोळा भिजवून मारला ह्मणजे आपलीहि फत्ते होईल असी मसलत करून तांबाचे घिसाड्याचे गाढव मारून त्याचे रक्तात गोळे भिजवून मारले इंग्रजी सरकारचे गोळे किल्यावर जाऊन पडले त्याणे किल्यावरील लोक हावालदील होऊन बोलणे लाविले त्यावरून कौलाने किलेदार यास लोकसुधा खाली उतरून चैत्र शुद्ध १ प्रतीपदेस माहाराज यांची मुलेमाणसे व चीजवस्त व साहेब वर होते त्यास लस्करात आणिले

(१) चैत्र शुद्ध ५ पंचमी छ ३ जमादिलाखरी सातारकर माहाराज यास समारंभाने बरोबर सारे साहेब लोक जाऊन तख्तावर बसविले दुसेर रोजी साहेबानी माहाराज यास मंडळी सुद्धा मेजवानी केली त्याचे दुसरे रोजी माहाराजानी साहेबास मेजवानी केली साताऱ्याचे कामावर ग्रांट साहेब यास ठेविले

(१) श्रीमंत बाजीराव साहेब याजवर गोपालाचे आष्टीचे मुकामी इस्मीत साहेब याणी छापा घातल्यावर श्रीमंत निघोन गंगेकडे गेले तेव्हां पटवर्धन मंडळी आपली फौज सुद्धा बाजीरावसाहेब यास सोडून राहिले श्रीमंत गंगेचे पलीकडे मुलकात् फीरत असता होळकर याजकडून रामदिन व भोसले यांजकडील सखाराम नारायण व गणपतराव सुभेदार फौज सुद्धा येऊन श्रीमंतास भेटले नंतर श्रीमंत वासीबाकडून वऱ्हाडातून गोंडवणचे सदरेस गेले तेथे गाराचा पर्जन्य पडोन फौजेत खराबी फार जाली इंग्रज बाहादर याच्या फौजा मागे लागल्या होत्या नंतर श्रीमंत उमरखेडा कडून पाढंरकवड्याकडे गेले त्याचे मागे दपटण साहेब फौज सुद्धा होते त्याणी पांढरकवड्यावर छापा घातला श्रीमंताचे मेण्यास गोळा लागान मेणा फुटला चैत्र वा। ११ फौजेची फाटाफुट होऊन ज्यास जिकडे मार्ग सापडला तिकडे पळोन गेले माधवराव रास्ते व पांडुरंगपंत ढमढेरे सावदे जामनेरास राहिले विसाजीपंत गोखले उमरखेडापासून पंढरपुराकडे आले त्याजबराबर आणखी लोक व विठोजी नाईक आले श्रीमंत जी फौज जमली ती घेऊन सातपुड्याकडे गेले ते समई आपासाहेब निपाणकर व नारो विष्णू असे पुण्याकडे आले श्रीमतानी त्रिंबकजीस काढून दिल्हा तो वणदिंडोरीस इंग्रजबहादुर यास सापडला श्रीमंतानी अनंदराव चंदावरकर व हणमंतराव लिमये हे दोन आसामी मालकम साहेब यांजकडे बोलण्यास पाठविले नंतर सर्जन मालकम साहेब याणी बाजीराव साहेब यांजकडे साहा कलमांची दरखस्तनामा पाठविला ती कलमे

(१) श्रीमंत बाजीरावजीनें आपणाकरीतां व आपले लिला (मुला) करितां सरकार पुणेचे ज्यासत व जितके हाक पातशाहाचे असतील तितके सोडणे कबूल व्हावे जलदीने मलकम साहेबाचे लस्करांत यावे

(२) बाजीराव याणी आपले लोक नोकरचाकर बायका बचेसुद्धा जितके येतील तितक्या सहित माफ जातीनें लस्कर देऊन मलकम साहेब

याणी पाठवितील व हिंदूस्थानी कासी व प्रयाग व आणखी तिर्थचे जागा कोठे राहावे ह्मणतील तेथे याचे खातरे करिता गौरनरजनरेल कबूल करतील ते होईल

(३) हे गोष्ट श्रीमंत बाजीराव याणी जलदीने करावे येक दिवसाचे देरे न करावे काय सबब ह्मणजे दक्षणचे मुलकाचे आरामी व्हावे बरसातीचे दिवस नजीक आले याकरिता बहुत जलदीने व्हावे एखादे त्याचे बाप व इलाखेवाले कोणी मागे राहातील तरी त्यासही खुमी व आरामीकडून येऊन पोचे जसे मलकम साहेब याणी रवाना करतील

(४) सदरी लिहील्या प्रमाणे श्रीमंत बाजीराव याणी सलीसीचे तौराने व बहुत जलदीचे तौराने कबूल करतील तरी आलबता कुंपणी सरकारातून मदत त्याचे इलाखे वालेम सुध्या बुजरूग गेले चालेल जैसे मोकर करून देतील मोबलगही गौरनर जनरल याणी ठरावितील तूर्त मलकम साहेब याणी आठ लाख रुपये सालीना उणे हाऊ देणार नाही येवढे करतील

(५) श्रीमंत बाजीराव याणी रत्फाव चांगले येखत्यार केले ह्मणोन कंपणी सरकारात खातर जमा होईल तरी कोणी जाहागीरदाराकरिता व पुराणे लोक त्या सांघाते खराब जाहाले त्या करिता व आपले खानदानावरी काही गाव वगैरेस चालत आहे त्या लोका करिता पैगाम लाबून सांगितले तरी आलबता त्याचे खातरे करिता गौरनरजनेरल साहेब याणी मेहरबानगी करतील

(६) सदरीलिहील्या प्रा कबूल करणे हे पत्र पोचले बाद (ज) चोवीस घटकेचा वाईदा दिल्हा आहे तरी तितकेत मलकम साहेबाचे लस्करात श्रीमंतानी येऊन हजर व्हावे या कबूल तरी करावे दोनी न होता वायदा चुकले तरी लढाई नमुद आहे मागुन सवाल जबाब होणार नाही

सदरहू प्रमाणे याद पाठविली ती कबूल करून त्याचे लस्करात गेले राज्याचा बेदावा लिहून घेऊन आठलक्ष रुपये सालीना नेमणूक करून घेऊन ब्रह्मावर्तास जाऊन राहावयाचे ठरले तेव्हा पुरंदरे विंचूरकर व नाना पुरंदरे हे श्रीमंताचा निरोप घेऊन शामराव पिंगळे वगैरे लहान मोठे सर्व निघोन देसी आले आरबाचे धरणे बसले त्यास मालकम साहेबानी ऐवज देऊन लोकाची समजूत करून लावून दिल्हे

(१) वरकड किले सारे सर जाले माळव्यातून सरतामस इसलाफ साहेब फौज सुध्धा येऊन गाळणा वगैरे किले घेतले

(१) आलपीष्टिण साहेब याणी माहाल मुलकात आमल बसऊन रयेतेस दिल भरवसा देऊन श्रीमंताचे जितके राज्य होते त्याचा बंदोबस्त केला सातारे यांचे राज सातारे यास कायम करून त्याजला खर्चास माहाल मुल्क लावून देऊन ती दौलत कायम केली व सचीव येऊन भेटले त्याचा मुल्क त्याजकडे ठेविला व पटवर्धन याचा सरंजाम त्याजकडे येऊन प्रतीनिधी यास दोन लक्षाचा सरंजाम बाजीराव याणी दिल्हा होता तो बहाल केला राजे महाराज करवीरकर याणी इंग्रज बहादरासी दोस्ती ठेविली होती त्याचे संवस्थान त्याजकडे राखले व ज्याजती पांच लक्षाचे महाल त्यास दिल्हे आकलकोटकर भोसले याचा सरंजाम त्याकडे कायम केला निपाणकर व रास्ते व विंचूरकर व पुरंदरे ढमढेरे वगैरे खास जातीचे सरंजाम होते ते त्याजकडे चालविले झाडून दौलतीतील माणसे याच्या गुजाऱ्याचा बंदोबस्त करून देऊन सर्वांचा संतोष ठेविला इनाम धर्मादाय व वर्षासने देवस्थाने श्रावणमासची दक्षणा वाड्यातील वगैरे पूर्ववत प्रमाणे चालविली

(१) रायगडावर बाजीराव याची जेष्ठ स्त्री सौभाग्यवती वाराणसी बाई होती त्यास किला घेतला तेव्हा त्याची चीज वस्त सुद्धा पुण्यात आणून त्यास खर्चास देऊन माहेरी बाईस राहण्यास पाठविली पुढें बाजीराव याजकडे रवाना केली

अनुक्रमणिका

१ बाजीराव साहेब याणी आपले कारकिर्दीत पागा व संरंजाम नवे दिल्हे त्याची नावनिसी

१ पागा:—

१ बाळाजी रघुनाथ पटवर्धन
१ भिवजी नाईक कोळते
१ सदासीव भास्कर उगले
१ आपाजीराम सहस्त्रबुध्ये
१ बाणाजी सेव्ये
१ शाहाजी पवार
१ इमाम भालदार
१ मलोजी पवार
१ मालजी गांगरे
१ माहादजी जोयनाक
१ आपाजी सिंदे
१ मल्हार आनंदराव
१ नारायणराव कुंजीर
१ अमृतराव धुमाळ
१ खंडेराव निगडे
१ खंडोजी जाधव
१ संताजी नीकम
१ भगवंतराव महादेव बर्वे
१ रूपराम चौधरी
१ मनोहरगीर गोसावी
१ गोविंदराव येशवंत काटीकर
१ श्रीनीवास नारायण काटीकर
१ माणकोजी सिंदे
१ आपाजी बहीरट

अनुक्रमणिका

१ बळवंतराव नीकम
१ जानोजी गाईकवाड
१ आपाजी कोंडे

२०

१ सरंजाम दिल्हे तेः—

१ सदासीव माणकेश्वर
१ खंडेराव निलकंट
१ माणकोजी सिंदे
१ दौलतराव घाटगे
१ सदासीवराव चव्हाण
१ रघुनाथराव जनार्दन
१ बाळाजी कुंजीर
१ निंबाजी भास्कर
१ येशवंतराव पाटणकर
१ माधवराव देशमुख

१०

१ गाडदीः—

१ रूपराम चौधरी
१ मनोहरगीर गोसावी
१ आबा काळे
१ शीवसिंग
१ धोंडापंत गोडबोले
१ आपाजीराम सहस्त्रबुध्धे

६

३

अनुक्रमणिका

पत्ता ह्या पुस्तकांत बिलकुल नाहीं. शातवाहनांचें किंवा चालुक्यांचें किंवा यादवांचें साम्राज्य कसें व कां गेलें व एकांतून दुसरें कसें व कां निघालें, या बाबींचें दिग्दर्शन करण्याचें स्वप्न हि ग्रंथकाराला पडलेलें नाहीं. अ, ब, क हे प्रसंग झालें एवढें सांगून इतिहासाला इतिहासत्व येत नाहीं. उत्तरप्रसंग पूर्वप्रसंगांतून कसा निघाला हें कथन केल्यानें इतिहासाला इतिहासत्व येतें. पूर्वापरप्रसंगांचें जन्यजनकत्व जेथें पहावयास मिळत नाहीं, तो इतिहासाचा ग्रंथ च नव्हे, त्याला history ह्मणण्यापेक्षां misstory ह्मणणें न्याय्य होईल. तिसरें, लेखकाला इतिहासाला योग्य अशी गंभीर, साधी व वजनदार इंग्रजी भाषा लिहिण्याचें सामर्थ्य नाहीं. चौथें, लेखकाला रस परिपोष करतां येत नाहीं. १९१८ तल्या पुण्याचें वर्णन स्वातंत्र्योन्मुख शिवकालीन पुण्याच्या वर्णनाच्या शेजारीं बेडौल भासतें व pathos च्या ऐवजीं bathos ची निर्मिति वाचकांच्या मनांत करतें. पांचवें, भरतखंडांत शिवछत्रपतीचें अवतारकृत्य प्राधान्यें करून कोणतें होतें त्याचा नामनिर्देश हि ग्रंथांत नाहीं. सहावें, राज्यपरंपराद्वारा केवळ वंशेतिहास ह्या ग्रंथांत फाटकातुटका पहावयास मिळतो; सामाजिक, धार्मिक, वाङ्मय, वगैरे इतिहासाचे प्रांत या ग्रंथांत स्पर्शिले सुद्धां नाहींत. असले नाना प्रकारचे दोष या पुस्तकांत असल्या मुळें तत्संबंधानें टीकाटकिकेला व्यर्थ शीण देत न बसतां, एका बऱ्या ग्रंथाचा आस्वाद घेण्यास आमचें मन सोल्हास प्रवृत्त होतें. रा. वैद्य यांचा भारताचा उपसंहार हा ग्रंथ बऱ्याच बाजूंनीं बहुमोल आहे. ग्रंथकाराचा भारता वर व्यासंग गेली दोन तीन तपें चालला असून, भारता वर ग्रंथकार जे कांहीं लिहितील तें एकाएकीं क्षुद्र ह्मणून झिटकारण्याची सोय नाहीं. प्रस्तुत ग्रंथ सामान्य वाचकां करितां लिहिला असल्या मुळें, त्याला शास्त्रीय प्रामाण्य असावें तितकें नाहीं. तत्रापि वेबर, हाफकिन्, वगैरेंचे प्रलाप ग्रंथकारानें नामी खोडून काढिलेले आहेत. भारती युद्धाचा काल ग्रंथकार शक पूर्व ३१०४ धरतात तो वादग्रस्त आहे. महाराष्ट्रांतील मराठे आर्य व नाग यांच्या मिश्रणा पासून झाले आहेत. असें जें ग्रंथकारानें ह्मटलें आहे तें अंशतः बरोबर आहे. महाराष्ट्रांतील मराठे केवळ दोन वंशांचें च मिश्रण आहेत असें नव्हे; मराठ्यांत सूर्यवंश, सोमवंश, अग्निवंश व नागवंश ऊर्फ शेषवंश असें चार वंशांचें मिश्रण आहे हें शहाण्णवकुळींच्या सर्व मराठ्यांना मान्य आहे. पैकीं मूळ आर्यवंश कोणता, सोमाचा, सूर्याचा, अग्नीचा कीं नागाचा, या बाबीचा खुलासा अद्याप व्हावयाचा आहे. हें महाराष्ट्रांतील क्षत्रिया संबंधानें झालें, महाराष्ट्रांतील ब्राह्मणांचा ह्या चार वंशांशीं संबंध लावीत नाहींत. ब्राह्मण सप्तर्षींची प्रजा समजण्याची चाल आहे. तत्रापि महाराष्ट्रांतील व इतर ब्राह्मणांत सूर्य, सोम, अग्नि व नाग या वंशांचें किंचित् स्त्रीद्वारा, पुरुषद्वारा नव्हे मिश्रण झालेले आहे यांत संशय नाहीं. क्षत्रियांत पुरुषद्वारा हि गार्दीचें मिश्रण झालेले मोतलीवरान्वेषणा वरून सिद्ध करतां येण्या सारखें आहे. तात्पर्य, महाराष्ट्रांतील आर्य

Registered No. B 1320.

आर्यसंकर हे सोमसूर्याग्निनाग ह्या चार वंशांचें मिश्रण आहेत. आणि अनार्यसंकर ह्मणजे पतित ह्मणून ज्यांस ह्मणतात त्यांपैकीं कांहींत अनार्यांचें ह्मणजे भिल्ल, कातकरी, ठाकूर, वारली, कोळी, इत्यादिचें मिश्रण आहे. आर्यानार्यसंकरांत पूर्वींचे सोमादि चार व भिल्लादि पांचवा अशा पांच वंशांचें मिश्रण आहे. असे नाना मनोरंजक प्रश्न रा. वैद्यांच्या उपसंहारां पासून सुचण्या सारखे आहेत. मराठींत किंवा इंग्रजींत इतका उत्तम ग्रंथ आमच्या वाचनांत गेल्या दहा वीस वर्षांत आलेला नाहीं. बहुतेक दर अधिकरणाला, इकडे वळूं, तिकडे वळूं, वगैरे कंटाळवाण्या पुनरुक्त्या भाषेला किंचित् कमीपणा आणितात, परंतु, असल्या कंटाळवाण्या च त्या पुनरुक्त्या मूळ संस्कृत भारतांत तर शेकडींनें मोजण्याचा प्रसंग येतो. भूवर्णन, चालीरीती, राज्यव्यवस्था, विवाह, कायदा, युद्ध, इत्यादि अनेक भारतकालीन विषयां वरील वैद्यांचें विवेचन कमजास्त विचारार्ह आहे, मेरुपर्वत, प्लक्षादिद्वीपें वगैरे प्राचीन भारतीय व पौराणिक भूवर्णनांचा अभ्यास वैद्यांनीं करावा तितका केलेला नाहीं. ह्या कामीं प्राचीनतम इतिहाससाधनांच्या आधुनिक नवनवीन शोधांचा जितका ज्याचा अभ्यास जास्त तितकें त्याचें पौराणिक व वेदकालीन उल्लेख उकलण्याचें सामर्थ्य अधिक, हा नियम समजावा. हा ग्रंथ आहे ह्या हून हि प्रमाण झाला असता व केलें आहे त्याहून हि सूक्ष्मतर विवेचन ग्रंथकाराला करतां आलें असतें, जर द्रव्यादि उपकरणें वैद्यांच्या हाताशीं असावीं तशीं सज्ज असतीं. पृथक्करण, संकलन, संक्षेप, सूचिकरण व संदर्भण वगैरे आनुषंगिक जिगजिगीचें काम शिताफीनें, सोशीकपणें व कष्टाळुतेनें करणारे दोन तीन सुबुद्ध व सुविद्य उच्च पदवीधर हाता खालीं पांच चार वर्षे राबविण्यास जर सांपडतील ह्मणजे दरमहा हजार पंधराशे रुपये खर्चण्याचें सामर्थ्य पांच सहा वर्षे जर वैद्यांना धनिकांच्या, संस्थानिकांच्या किंवा विश्वविद्यालयाच्या कृपेनें येईल तर त्यांच्या हातून अत्यन्त प्रमाणभूत असा माहाभारतावर ग्रंथराज खचित निर्माण होईल. Respect for expert knowledge, हा समाजोन्नायक गुण अद्याप या देशांत निर्माण व्हावयाचा आहे.

भारतेतिहाससंशोधकमंडळाच्या पांचव्या संमेलनवृत्ताविषयीं आमचें ह्मणणें वेळ आल्यास, पुढें.

अनुक्रमणिका